**MAPOL 1.1M**

# एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - I

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

# राजकीय सिद्धांताचा परिचय - I

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई



| | | |
|---|---|---|
| **कार्यक्रम समन्वयक** | : | **प्रा. अनिल आर बनकर**<br>**सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख मानव्यविद्या शाखा**<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **अभ्यास समन्वयक** | : | **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**<br>सहायक प्राध्यापक<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| | : | **डॉ. क्षिप्रा वासुदेव**<br>सहायक प्राध्यापक<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **संपादक** | : | **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**<br>सहायक प्राध्यापक<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **लेखक** | : | **डॉ. निलेश पाटील**<br>सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग<br>गोगाटे पाटील महाविद्यालय, रत्नागिरी |
| | : | **डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे**<br>सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग<br>स्व अण्णासाहेब आर डी देवरे  कला व विज्ञान महाविद्यालय,<br>म्हासाडी, साक्री, जि. धुळे |
| | : | **डॉ. अजिंक्य गायकवाड**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>एस आई ई एस कला व विज्ञान महाविद्यालय, सायन, मुंबई |



**जून २०२४, मुद्रण - १**    ISBN 978-81-978283-7-9

**प्रकाशक**
**संचालक,** दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र
मुंबई विद्यापीठ,  विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय. विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राजकीय सिद्धांत - अर्थ आणि दृष्टिकोन | १ |
| २अ | लोकशाही- नागरिकत्व | १६ |
| २ब | नागरिकत्व | ५० |
| ३ | नवीन सैद्धांतिक चौकट | ६४ |
| ४ | आधुनिकता व उत्तर आधुनिकतावाद (अर्थ, व्याख्या, संकल्पना, संरचना मूल्यमापन) | ८० |

# एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - I

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

## राजकीय सिद्धांताचा परिचय - I

## अभ्यासक्रम

**धटक 1 - अर्थ आणि दृष्टिकोन**

अ) अर्थ, स्वरूप, आाणि व्याप्ती

ब) ब. सामान्य / मानक आणि अनुभवजन्य

क) उदारवादी, मार्क्सवादी, स्त्रीवादी दृष्टिकोण

**धटक 2 - लोकशाही आणि नागरिकत्व**

अ) लोकशाहीचे प्रतिमान (प्रतिनिधि/ संसदीय, सहभागी, व चर्चात्मक)

ब) नागरिकत्वाचे प्रकार (उदारमतवादी, रिपब्लिकन, सार्वत्रिक भिन्नता)

क) लोकशाही, नागरिकत्व, बहुसंस्कृतीकता

**टधटक 3 - नवीन सैद्धांतिक चौकट**

अ) आधुनिकतावाद, उत्तर आधुनिकतावाद

ब) संरचनावाद, उत्तर संरचनावाद

क) विखंडन

**घटक 4 - समकालीन राजकीय सिद्धांत**

अ) संस्कृती आणि धुरिणत्व

ब) उत्तर-आधुनिक काळातील सत्ता ही संकल्पना

क) वसाहतिकता, उत्तर- वसाहतिकता आणि निर्वसाहतिकता

## M.A. (Political Science) - Semester I (Programme code: 3233761)
## Mandatory Papers

### Subject code: C50111
# Introduction to Political Theory I
### (4 Credits, 60 Hours)

**Course Objectives:**

1) To introduce students to different approaches of the political theories
2) To acquaint students to debate about democracy and citizenship
3) To understand emerging theoretical frameworks

**Module 1: Meaning and Approaches**

a) Meaning, Nature and Scope
b) Normative and Empirical
c) Liberal, Marxist, Feminist

**Module 2: Democracy and Citizenship**

a) Paradigms of Democracy (Representative, Participative, Deliberative)
b) Forms of Citizenship (Liberal, Republican, Universal, Differentiated)
c) Democracy, Citizenship and Multiculturalism

**Module 3: New Theoretical Frameworks**

a) Modernism, Postmodernism
b) Structuralism, Post Structuralism
c) Deconstruction

**Module 4: Contemporary Political Theory**

a) Culture and Hegemony
b) Power in Postmodern Times
c) Coloniality and Post Coloniality

**Course Outcomes:**

1) The students will be able to understand major approaches and paradigms
2) It will enable students to develop broad understandings of democracy
3) Students can build a strong theoretical foundation for research in the discipline of political science

**Reading List:**


1. Dryzek, J. S., Honig, B., & Phillips, A. (2008). The Oxford handbook of political theory. Oxford University Press.
2. Farrelly, C. (Ed.). (2003). Contemporary political theory: a reader. Sage.
3. Gaus, G. F., & Kukathas, C. (Eds.). (2004). Handbook of political theory. Sage.
4. Delanty, G., & Turner, S. P. (Eds.). (2011). Routledge international handbook of contemporary social and political theory (p. 510). New York, NY: Routledge.
5. Held, D. (2013). Political theory and the modern state. John Wiley & Sons.
6. Barry, N. P. (1989). An introduction to modern political theory. Springer.
7. Bhargava, Rajeev, What is Political Theory and Why Do We Need it?, Oxford University Press, New Delhi, 2010, pp. 3-55.
8. Goodin, Robert E., and Pettit, Philip (Ed.), A Companion to Contemporary Political Philosophy, Oxford, Blackwell, 2006.
9. Held, David, Models of Democracy, Third Edition, Polity Press, London, 2006
10. Hoy, David Couzens, and McCarthy, Thomas, Critical Theory, Blackwell, Oxford, 1995.
11. Kymlicka, Will, Multicultural CitizenshipA Liberal Theory of Minority Rights, Oxford University Press, Oxford, 1995.
12. Lyon, David, Postmodernity, Second Edition, Open University, Buckingham, 1999.
13. Marsh, David, and Stoker, Gerry, Theory and Methods in Political Science, Macmillan, Houndmills, 1995.
14. Marshall, T.H., Citizenship and Social Class and Other Essays, Cambridge University Press, Cambridge, 1950, pp.1-75.
15. McQuillan, Martin, The Politics of Deconstruction Jacques Derrida and the Other of Philosophy, Pluto Press, London, 2007.
16. Rush, Fred, The Cambridge Companion to Critical Theory, Cambridge University Press, Cambridge, 2004.
17. Young, Iris Marion, Inclusion and Democracy, Oxford University Press, Oxford, 2002.
18. लोखंडे भगवान , (संपादन) ' राजकीय सिद्धांत ' दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ ,मुंबई,2022
19. फड,'उच्चतर राजकीय सिद्धांत ' विद्या प्रकाशन, नागपूर
20. भोळे भा.ल. ' राजकीय सिद्धांत ' विद्या प्रकाशन, नागपूर
21. घांग्रेकर चि.ग., 'राजकिय सिद्धांत ' साईनाथ प्रकाशन नागपूर

# १

# राजकीय सिद्धांत - अर्थ आणि दृष्टिकोन

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ राजकीय सिद्धांत-अर्थ व्याख्या

१.४ राजकीय सिद्धांताचे दृष्टिकोन

१.५ आदर्शवादी आणि अनुभववादी दृष्टिकोन

१.६ उदारमतवादी आणि मार्क्सवादी दृष्टिकोन

१.७ स्त्रीवादी दृष्टिकोन

१.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१.९ संदर्भग्रंथ

## १.१ उद्दिष्टे

- राजकीय सिद्धांत म्हणजे काय ? ते समजून घेणे.
- राजकीय सिद्धांताच्या अभ्यासविषयक पारंपाकि आणि आधुनिक दृष्टिकोन समजून घेणे.

## १.२ प्रस्तावना

राज्यशास्त्राच्या लेखनात थियरी (Theory) फिलॉसॉफी (Philosophy) आयडिऑलॉजी (Ideology) या संकल्पना विभिन्न अर्थाने वापरल्या जातात. त्यामुळे त्यांचा स्पष्ट, काटेकोर अर्थ मांडणे अशक्य आहे. सर्वसाधारणपणे राजकीय सिद्धांताचा संबंध राज्यशास्त्राच्या पारंपरिक दृष्टिकोनाशी येतो. राज्यशास्त्राच्या पारंपरिक दृष्टिकोनात आदर्शवादी विचारांना महत्त्व दिले जाते `काय आहे' ? या पेक्षा `काय असावे' ? हे सांगण्यावर भर दिला जातो.

ॲड्र्यू हॅकर या विचारवंताच्या मतानुसार, ``ज्या तत्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकलनामुळे ते केव्हाही आणि कुठेही केलेले असो - आजच्या आणि उद्याच्या जगाविषयीची समजूत वाढते त्याला `राजकीय सिद्धांत' म्हटल जाते.

सर्वसाधारणपणे राजकीय सिद्धांत म्हणजे राजकीय विषयांवर केलेले तत्वज्ञानात्मक चिंतन. त्यामध्ये तत्वज्ञान, विचारप्रणाली आणि विज्ञान इ.च्या मूलतत्वांच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते. वास्तविक पाहता राजकीय सिद्धांताने माणसाला दैनंदिन जीवनातील

व्यवहारिक प्रश्नांचा उलगडा करण्यासाठी वेळोवेळी मदत केलेली असते. राज्यशास्त्र विषयातदेखील राजकीय सिद्धांताने मोलाची भर घातली आहे.

## १.३ राजकीय सिद्धांत - अर्थ व्याख्या

सर्वसाधारणपणे राजकीय सिद्धांत म्हणजे राजकीय विषयांवर विचारवंतांनी केलेले राजकीय चिंतन होय ? विविध विचारवंतानी राजकीय सिद्धांत म्हणजे काय ? हे आपापल्या परीने समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

१) सेबाईन -

``राजकारणाविषयीचे किंवा राजकारणाशी प्रस्तुत असलेले चिंतन म्हणजेच राजकीय सिद्धांत होय".

``राजकीय प्रश्नांचा शिस्तबद्ध शोध म्हणजे राजकीय सिद्धांत होय"

२) राजकीय सिद्धांत म्हणजे माणसाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय.

थोडक्यात राजकीय सिद्धांत एक बौद्धिक परंपरा असून तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नांवर जे विचार मांडले त्यातुन राजकीय सिद्धांताचा उगम-विकास झालेला आहे.

अनेक राज्यशास्त्रज्ञांनी, राजकीय विचारवंतांनी राज्यशास्त्राच्या ऐतिहासीक दृष्टीकोनाला महत्त्व दिले आहे. परिणामी राजकीय सिद्धांत समजून घेण्यासाठी तत्कालीन स्थळ- काळ-परिस्थितीचे संदर्भ समजून घ्यावे लागतात. तसेच कोणताही राजकीय सिद्धांत समकाळातही (आजचा काळ) आपल्याला मार्गदर्शक ठरतो. उदा. आज समाजात ज्या सामाजिक-राजकीय चळवळी उभ्या राहत आहेत. त्यांचा आधार कार्ल मार्क्सचे राजकीय विचार आहेत.

## १.४ राज्यशास्त्राच्या अध्यनाचे दृष्टीकोन / राजकीय सिद्धांताच्या अध्ययनाचे दृष्टीकोन

सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रात पद्धती (Method) आणि दृष्टीकोन (Approach) या संज्ञांचा वापर नेहमीच केला जातो. पद्धत हा सामान्य शब्द असुन ज्याद्वारे एखादे कार्य करण्याच्या विशीष्ट पद्धतीचे आकलन होते. सुव्यवस्थित अभ्यासासाठी पद्धत म्हणजे सत्य शोधण्याची अशी प्रक्रिया की ज्याद्वारे विश्वसनीय ज्ञान प्राप्त होऊन अचूक निष्कर्ष काढले जातात. उदा. वैज्ञानिक पद्धत, तुलनात्मक पद्धत इ.

दृष्टीकोनामध्ये घटनेच्या सर्वांगीण आकलनासाठी उपयुक्त पद्धती ठरवून अभ्यासाविषयक प्रमुख राजकीय सिद्धांत-अर्थ आणि दृष्टिकोन समस्या ठरवली जाते. आपल्याला कसा आणि कोणत्या विषयाचा अभ्यास करायचा आहे याचाही विचार केला जातो.

वाना डाईक या विचारवंताच्या मते, दृष्टीकोन म्हणजे असे मानदंड की, ज्याच्या आधारावर

विचार करता येईल अशा समस्या, प्रश्नांची निवड केली जाते त्यासाठी उपयुक्त साधनसामग्री (Data) निवडला जातो. दृष्टीकोन म्हणजे महत्त्वाची समस्या तसेच उपयुक्त माहिती कोणत्या आधारावर निवडावी याचा विचार तर पद्धत म्हणजे माहिती प्राप्त करण्याचे आणि वापरण्याचे प्रकार होय.

**१) राजकीय सिद्धांताच्या अध्ययनाचे दृष्टीकोन -**

इतर सामाजिक शास्त्राप्रमाणे राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी विभिन्न दृष्टीकोनाचा अवलंब केला जातो. प्रामुख्याने राज्य शास्त्राच्या अध्ययनासाठी दोन प्रकारचे दृष्टीकोन वापरले जातात.

१) पारंपारिक दृष्टीकोन

२) आधुनिक दृष्टीकोन

राज्यशास्त्राच्या पारंपारिक दृष्टीकोनांतर्गत मुख्यतः तत्वज्ञानात्मक (Philosophical), ऐतिहासिक (Historical), वैधानिक (Legal) आणि संस्थात्मक (Institutional) पद्धतीचा वापर केला जातो.

पारंपारिक दृष्टीकोनात नैतीकता मूल्ये यांना प्राधान्य दिले जाते.

तर आधुनिक दृष्टीकोन अनुभव आणि वास्तवावर आधारित आहे त्यात तथ्थे, घटनांच्या वास्तवावर भर दिला जातो. त्यामध्ये मूल्यांना कोणत्याही प्रकारचे स्थान दिले जात नाही.

## १.५ आदर्शवादी / अनुभववादी दृष्टीकोन (Normative Approach)

राज्यशास्त्राचा आदर्शवादी दृष्टीकोन मूल्ये आणि आदर्शावर आधारलेला असतो. भूतकाळात काय आणि आज काय आहे ? यापेक्षा उद्या काय असावे ? यावर हा दृष्टीकोन भर देतो. आदर्श समाजरचनेचे कसे असावे ? मानवी जीवनाची उद्दिष्टे कोणती असावी या प्रश्नांना या दृष्टीकोनामुळे महत्त्व प्राप्त होते.

राज्याशास्त्राचा अभ्यास तत्वज्ञान आणि नीतीशास्त्राचा एक भाग म्हणून केला जातो. उदा. राजा हा नीतीवंत असावा. राज्याने जनतेसाठी हितकर कार्ये केली पाहिजे. या दृष्टीकोनाला तत्वज्ञानात्मक, पारंपारिक दृष्टीकोन असेही म्हटले जाते.

सामाजधारणेची काही मूलतत्वे गृहीत धरून त्याआधारे समाजात काही आदर्श उभे केले जातात. सर्वसाधारण तत्वाकडून विशिष्ट आदर्शापर्यंत जाणे हा या दृष्टीकोनाचा गाभा आहे. राजकीय विचारवंत आपापल्या प्रतिमा, बुद्धी किंवा तर्कशक्तीच्या बळावर आदर्शाची उभारणी करतात आणि ते आदर्श समाजात प्रत्यक्षात उतरवण्याचा मार्गाचा शोध घेतात. राज्यसंस्थेचे स्वरूप कसे असावे ? नागरिकांशी तिचे संबंध कसे असावे? या प्रश्नांच्या मुळाशी एक नैतिकता आधारभूत असते. माणसाच्या आणि समाजाच्या दृष्टीने कोणती गोष्ट योग्य, मौल्यवान आहे ? है नैतिक निकषांवर ठरते. सत्य, शिव आणि सुंदरम या तत्वांना या दृष्टीकोनात प्राधान्य दिले जाते. न्याय, सत्वशील, नीतीपारायण समाजासाठी आदर्श म्हणून स्वातंत्र्य, समता आणि न्याय या आदर्श मूल्यांचा पुरस्कार करतात.

### ◆ आदर्शवादी दृष्टीकोनाची वैशिष्टये -

१) **मुल्यप्रधान -** आदर्शवादी दृष्टीकोनात मूल्यांना महत्त्व दिले जात असल्याने तो मूल्यप्रधार मानला जातो. वाल्डो या विचारवंताच्या मतानुसार `ऐतिहासीक विकास, संस्थात्मक क्रियान्वयन आणि सार्वजनिक अपेक्षा या तीन्ही दृष्टींनी राज्यशास्त्राची पाठमुळे आदर्शवादी दृष्टीकोनात खोल रूजली आहे".

२) **काय आहे ? या पेक्षा काय असावे ? यावर भर -** आदर्शवादी दृष्टीकोनात काय आहे ? यापेक्षा काय असावे ? यावर भर दिला जातो. थोडक्यात, वास्तवापेक्षा भविष्याकडे, आदर्शाकडे लक्ष दिले जाते. उदा. प्लेटो या ग्रीक विचारवंतांने आदर्श राज्याची लोकसंख्या ५०४० असावी, असे म्हटले आहे.

३) **राजकीय तत्वज्ञानाला मध्यवर्ती स्थान -** राजकीय सिद्धांताचा आदर्शवादी दृष्टीकोन राजकीय तत्वज्ञानाला महत्व देतो. या दृष्टीकोनात तत्वज्ञान अभ्यासाचा केंद्रबिंदु मानला जातो. सर्वसाधारण राजकीय निर्णय देणे, त्यांचे तर्कशुद्ध विश्लेषण करणे, त्या समर्थनार्थ युक्तिवाद करणे या गोष्टी राजकीय विचारवंत करतात. तसेच मूल्यांना ते प्राधान्य देतात. मूल्यांबाबत उदासीन व तटस्थ राहून चालत नाही. राज्यशास्त्राचा अभ्यास मूल्यांना सोडून केला जाऊ शकत नाही. असे या दृष्टीकोनाचे पुरस्कर्ते मानतात.

प्लेटो, ॲरिस्टॉटल, सामाजिक करारवादी विचारवंत थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, जीन जॅक कर्से हेगेल या विचारवंतांनी आपल्या राजकीय विचारांत आदर्शांना महत्त्व दिले आहे. या विचारवंतानी त्याला महत्त्व दिलेच परंतु `जे असावे' या बद्दलची विचार केला निरीक्षण आणि तुलना या अभ्यास पद्धतीचा अवलंब करून तत्वज्ञानावरची श्रद्धा त्यांनी ढळू दिली नाही.

उदा. प्लेटोने तत्वज्ञानी राजाच्या नेतृत्वाखालील आदर्श राज्याची कल्पना मांडली. माणसाच्या योग्यते प्रमाणे त्याचे समाजात समायोजन होणे याला त्याने न्याय म्हटले आणि पात्रतेनुसार प्रजाजनांचे वर्गीकरण केले.

असोने आपले प्रतिपादन मानवी स्वभाराच्या विश्लेषणाने सुरू केले आणि सर्वसाधारण सामूहिक ईहेची सत्सकल्परूप संकल्पना मांडली. तिला सर्वहितकारी म्हणून सर्वश्रेष्ठ ठरवली.

हेगेलच्या राजकीय विचारांमध्ये राज्यसंस्थेचे दैवतीकरण केलेले दिसते. राज्यात राहून आणि राज्यामार्फत माणूस स्वतंत्र मिळवू शकतो, राज्यसंस्था हे स्वातंत्र्याचे मूर्त स्वरूप असते. तिला स्वतःचे व्यक्तिमत्व आणि ईहा (इच्छा) असते सर्व नागरिकांच्या ईहेची ती गोळा बेरीज नसते.

### ◆ आदर्शवादी दृष्टीकोनावरील टीका -

आदर्शवादी दृष्टीकोन वास्तवापेक्षा कल्पनेला, व्यवहारापेक्षा स्वप्नरंजनाला आणि वर्तमानापेक्षा भविष्याला अधिक महत्व देतो, अशी टीका या दृष्टीकोनावर टीकाकारांनी केली आहे. अतिसैद्धांतिक, अवास्तव, एकांगी या दोषामुळे आदर्शवादी दृष्टीकोनांची उपयुक्तता

काहीशी कमी होते, असाही आक्षेप घेतला जातो.

असे असले तरी हा दृष्टीकोन उपयुक्त ठरतो. राजकीय तत्वज्ञांच्या आदर्शात्मक चिंतनामुळे राज्यशास्त्रीय विचारांना नैतिक प्रतिष्ठा प्राप्त होते व त्याचा नैतिक दर्जा उंचावतो. राजकीय विचारवंताच्या आदर्श चिंतनातून राज्यकर्त्यांना राजकाणासदंर्भात नव्या दिशा मिळता.

उदा. सुप्रसिद्ध इटालियन विचारवंत मॅकियाव्हॅलीने आपल्या `The Prince' या ग्रंथात राजाला राज्यकारभारा संदर्भात उपदेश केला आहे. त्याचे राजकीय विचार आजही उपयुक्त ठरतात.

कौटिल्य / आर्य चाणक्य यानेदेखील आपल्या `कौटिल्याचे अर्थशास्थ` या ग्रंथात राज्यकारभारासंबंधी राजाला मार्गदर्शन केले आहे.


तसेच स्वार्थी, संकुचित, विकारग्रस्त मानवी समाजाचे उन्नयन व उदात्तीकरण करून समाजजीवनाला परिपूर्णतेच्या दिशेने नेण्यास आदर्शवादी दृष्टीकोन उपयुक्त ठरतो. मूल्ये, तत्वे आणि आदर्शांना समाजजीवनात महत्व दिले नाही तर व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर अधःपतन होण्याचा धोका असतो.

### १.५.२ अनुभववादी दृष्टीकोन -

अनुभवनपूर्व चिंतन आणि निगमनावर आधारित आदर्शवादी दृष्टीकोन राज्यशास्त्रात प्लेटो-ऑरीस्टॉल पासून १९ व्या शतकाच्या शेवटपर्यंत वापरला जातो. ऐतीहासिक आणि तौलानिक पद्धतीचा अवलंब केला असला तरी मुख्य लक्ष तत्वज्ञानावर होते.


१९८० मध्ये ग्राहाम वॉलसचे `Human Nature in Politics` हे पुस्तक प्रसिद्ध झाले. ते अनुभववादाच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल होते. त्यात ग्राहम बालासने मानसशास्त्रीय अंगाने राजकारणाचा अभ्यास केला. ऑर्थर बेन्टलेने या पुस्तकात समाजशास्त्रीय अंगाने राजकारणाचा अभ्यास केला. त्यानंतर मॅक्स वेबरने अनुभववादी पद्धतीचा अवलंब करून नोकरशाहीचा अभ्यास केला काय असावे ? या पेक्षा काय आहे ? यावर भर दिला.

वास्तविक पाहता १९४० नंतरच्या काळात अनुभववादाचा विशेष चालना मिळाली अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांनी या दृष्टिकोनाचा वापर करून राजकीय जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास केला. प्रत्यक्षवाद व्यवस्थात्मक विश्लेषण वर्तनवाद ही सर्व अनुभववादाची रूपे आहेत. वस्तुस्थितीची जशी आहे तशी नोंद करावी. ती करताना मूल्यांना स्थान असू नये अध्यापन वस्तुनिष्ठ असावे, वस्तुनिष्ठ नसावे ही अनुभववादाची त्रिसूत्री आहे



राजकीय क्षेत्रात अनुभवाच्या आधारावर काढलेले निष्कर्ष, माहिती संकलन, त्यानुसार तयार केलेले सिध्दांत म्हणजेच अनुभववाद होय.

थोडक्यात, प्रत्यक्ष अवलोकन, निरीक्षण, वर्गीकरण, मोजमाप इ. च्या आधारे मानवाच्या राजकीय वर्तनाचा, राजकीय घटनांचा कार्यकारण नाव संबंध प्रस्थापित करून त्याच्या आधारे सिद्धांत प्रस्थापित करणे, त्याची पुर्नपाल करणे व सिद्धांताची मांडणी करणे म्हणजे अनुभववाद होय.




अनुभववादी विचारवंतांनी आदर्शवादी दृष्टीकोनाची संकल्पनात्मक आणि सैद्धांतिक चौकट पूर्णपणे नाकारली. सुरूवातीच्या काळात हा दृष्टीकोन पारंपारिक दृष्टीकोनाला पूरक मानला गेला. मात्र नंतर या दोन्ही सिद्धांतांना अंतविरोध निर्माण झाला. पारंपारिक विचारवंतांना गृहितकांची अनुभवलक्षी तपासणी अपूर्ण व अनिर्णायक वाटली तर पारंपरिक पद्धतीने टाळा बंद खोलीत बसून केलेले चौकटीतील तत्वज्ञानात्मक चिंतन अनुभव वाद्यांनी अमान्य केले. तरीसुद्धा अनुभववादाकडे अभिजात (परंपरागत) राजकीय चिकीत्सेचे पुढचे पाऊल म्हणून पाहीले जाते.

अनुभववाद सिद्धांताच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करीत नाही तर ज्ञान आणि उपलब्ध चौकशीच्या तंत्रावर भर देतो. सिद्धांताच्या पुनरूज्जीवनाची गरज अनुभववाद्यांनी नंतरच्या काळात मान्य केली. डेव्हिड ईस्टन सारख्या विचारवंतांनी स्वतःची सिद्धांते आणि प्रतिमाने विकसित केली. अतिअनुभववादी विचारवंत पारंपरिक राज्यशास्त्रातील मूल्याभिमुखता मध्यवर्ती मानतात.

अनुभववादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणेः

१) **आंतरराष्ट्रीय -** अनुभववादी विचारवंत आंतरशास्त्रीय दृष्टीकोन स्वीकारून अन्य सामाजिक शास्त्रातील संकल्पना व अभ्यासपद्धतीचा अवलंब करून अभ्यास करतात. उदा. निवडणूकांच्या विश्लेषणासाठी संख्याशास्त्राचा आधाल केला जातो. मानवी वर्तनाच्या अभ्यासासाठी मानसशास्त्राचा आधार केला जातो.

२) **व्यावहारिक प्रश्नांवर भर -** अनुभववादी दृष्टीकोन आदर्शवादापेक्षा वास्तवावर भर देतो. व्यावहारिक प्रश्नांच्या अभ्यासाला महत्व देतो.

३) **अनुभव व अवलोकनाला महत्व -** अनुभववादी राजकीय सिद्धांत घटना व घडामोडींचे प्रत्यक्ष निरीक्षण, अवलोकन करून तथ्यविश्लेषर करून राजकीय सिद्धांताची मांडणी करतो.

४) **मुल्यनिरपेक्ष दृष्टीकोन -** संशोधन हे मुल्यनिरपेक्ष दृष्टीकोनातुन केले जावे. अनुभववादात मुल्यांना प्रतिक्षेची कोणत्याही प्रकारचे महत्व दिले जात नाही.

५) **पुर्नतपासणी -** जे सिद्धांत, निष्कर्ष काढले जातात त्याची पुर्नतपासणी करून सिद्धांताची निश्चित मांडणी केली जाते.

६) **क्षेत्रीय संशोधनाला महत्व -** अनुभववादात तथ्यसंकलनासाठी अत्याधुनिक व शास्त्रीय साधनांचा आधार घेतला जातो. क्षेत्रीय संशोधनाला महत्व दिले जाते.

७) **आधुनिक अध्ययनापद्धतीचा अवलंब -** अनुभववादात अभ्यासाठी निरीक्षण, परिक्षण, तुलना, सर्वेक्षण, मुलाखती, नमुना पाहण्या, संख्याशास्त्रीय तंत्र अशा आधुनिक पद्धतींचा अवलंब केला जातो.

**अनुभववादी दृष्टीकोनातील दोष / टीका -**

अनुभववादाला प्रतिवाद म्हणून काही विचारवंतांना अतिअनुभववाद ही संकल्पना मांडली. रॉबर्ट डहाल हा या संकल्पनेचा जनक मानला जातो. या दृष्टीकोनातील दोष खालीलप्रमाणे-

१) **अचुकता कमी -** अनुभववादी सिद्धांतात अचुकता कमी असते त्याचे निष्कर्ष सर्वत्र सारखेच असतील असे नाही मानवी वर्तन सतत बदलणारे असते. परिणाम निष्कर्ष सिद्धांत अचूक असत नाही.

२) **आदर्शाकडे दुर्लश -** अनुभववादी दृष्टीकोन वास्तवावर भर देतो. परिणामी आदर्शाकडे दुर्लक्ष केले जाते. मानव हा समाजशील, सचेतन असल्याने मानवी जीवनात वास्तवाद आदर्शालाही स्थान असते.

३) **शास्त्रीय पद्धतीचा अतिरेक -** अनुभववाद्यांनी संपूर्ण लक्ष व्यावहारिक तथ्य संकलन आणि त्यासाठी नवीन पद्धतींचा शोध घेण्यावर केंद्रित केले. यामुळे सिद्धांत निर्मितीचे फारसा विचार झाला नाही. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यामुळे राज्यशास्त्रातून सैद्धांतिक बाबी नष्ट झाल्या. त्यातून सिद्धांताची निर्मिती होऊ शकली नाही.

४) **संकलित ज्ञान यथायोग्य असेलच असे नाही -** मानवी वर्तनप्रक्रियेचा शोध घेऊन त्यात पुर्नप्रत्यक्ष येईलच असे निश्चितपणे सांगता येत नाही. लिओ स्ट्राअसच्या मते, प्रस्तुततेच्या दृष्टीकोनावर निकषावर अनुभववादी दृष्टीकोन कचकामी ठरतो.

अतिअनुभववाद्यांच्या दृष्टीने पारंपारिक राजकीय तत्वज्ञानातील नैतिक आणि ज्ञानमीमांसा शास्त्रीय चिकित्सा हेच ज्ञानसाधनेचे एकमेव रास्त क्षेत्र आहे. अनुभववाद आणि अतिअनुभववाद यो दोन्ही दृष्टीकोनात सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न ईस्टन आणि डहाल यांनी केला आहे.

ईस्टन आणि डहाल यांच्या मते राजकीय सिद्धांतात विचार आणि विश्लेषणाबरोबर सर्जनशील नैतिक चिकीत्सा अंर्तभूत असते. राजकारणाची तटस्थ वस्तुनिष्ठ स्पष्टीकरणे शोधणार्यांनी मूल्यांविषयी उदासीन राहण्याची गरज नाही. अनुभववादी ज्ञान ही चांगल्या नैतिक निवडीची

आवश्यक पूर्वअट मानावी लागते. वस्तुनिष्ठ ज्ञान नैतिक निर्णयाचा पर्याय होऊ शकणार नाही. मात्र ते नैतिक निर्णयाची पूर्वगरज असते.

आदर्शवादी आणि अनुभववादी दोन्ही दृष्टीकोनाचे लक्ष्य राज्यशास्त्राच्या अध्ययनाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. दोन्ही दृष्टीकोनांचा अवलंब करून अभ्यास पूर्ण करता येतो. मानव समाज समाजात कसे वागतात हे अनुभववादी दृष्टीकोन सांगतो तर त्यांनी कसे वागावे? हे आदर्शवादी दृष्टीकोन सांगतो.

## १.६ उदारमतवादी आणि मार्क्सवादी दृष्टीकोन

### १.६.१ उदारमतवादी दृष्टीकोन

व्यक्तीस्वातंत्र्याला सवौच्च मूल्य मानणारी व व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळेल अशा रीतीने समाजाचे संघटन करणे हे मूलभूत ध्येय मानणारी विचारप्रणाली म्हणून उदारमतवादाकडे पाहिले जाते. उदारमतवाद ही तर्क आणि मानवी मूल्यांवर आधारित असलेली विशिष्ट व्यवस्था आणि जीवनाचे मार्ग स्पष्ट करणारी विचारधारा आहे. उदारमतवाद हा स्वातंत्र्य आणि सहिष्णुतेचे समर्थन करतो. त्यात प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाची प्रतिष्ठा व नैतीक मूल्य महत्वाचे मानले जाते. उदारमतवादात व्यक्तीस्वातंत्र्याला अंतीम मूल्य मानले जाते. सामाजिक आणि आर्थिक संस्थांनी व्यक्तीवर लादलेल्या बंधनांना उदारमतवादाने विराषध केला आहे. राज्यसंस्था, धर्मसंस्था व पारंपरिक निरंकुश सत्तेलाही उदारमतवाद विरोध करतो.

उदारमतवादाचा प्रारंभ युरोपात १७ व्या शतकात झाला. शास्त्रीय-विज्ञानातील शोधांमुळे युरोपात औद्योगिक उत्पादन पद्धतीची सुरूवात होत होती. धर्मसत्तेच्या क्षेत्रात पोपच्या सत्तेला आव्हान देण्यात आले. नव्या मूमीच्या, खंडांच्या शोधामुळे व्यापार-उदिम वाढत होता. सरंजामशाही व्यवस्था कोलमडून पडत होती. भांडवलशाहीच्या स्थापनेस सहाय्यकारी ठरणार्या बाबींना चालना देणे हे उदारमतवादाचे ध्येय होते. पारंपरिक उदारमतवादात व्यक्तीला संपूर्ण समाजजीवनाचे केंद्र मानन्यात आले. त्यातून व्यक्तीवादाला चालना मिळाली. जॉन लॉक, ॲडम स्मिथ, जेरेमी बेंन्थेम, जे.एस. मिल. थॉमस पेन या विचारवंतांनी व्यक्ती, व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तीचे हक्क विचारांना महत्व देऊन उदारमतवादात भर घातली. मर्यादित शासन, कायद्याचे अधिराज्य, खाजगी मालमत्तेच्या संरक्षणाची हमी, करार स्वातंत्र्य निर्णय स्वातंत्र्य ही पारंपरिक उदारमतवादाची वैशिष्टय़े आहे.

जॉन स्टुअर्ट मिल, कांट, ग्रीन, हॉवहाऊस या विचारवंतांच्या विचारांमध्ये आधुनिक उदारमतवाद दिसून येतो. आधुनिक उदारमतवादाने स्वातंत्र्य आणि मनुष्याची प्रगती यातील संबंध स्पष्ट केला आहे. त्यानुसार मनुष्यामध्ये स्वतःला विकसित करण्याची अपार शक्ती सामावलेली असते. पण त्याने दुसर्यांच्या क्षमतेला बाधा व पोहोचवता विकास साधला पाहिजे. व्यक्तीच्या खाजगी

मालमत्तेचे संरक्षण व्हावे परंतु त्याचबरोबर काही सामाजिक-आर्थिक समस्यांवर उपाय करण्याचे कर्तव्ये व आवश्यकता राज्याने पूर्ण करावी. असे या विचारवंतांचे म्हणणे आहे. आधुनिक उदारमतवादाने वितरणात्मक न्याय, कल्याणकारी राज्ये या संकल्पनांचे समर्थन

केले आहे. आधुनिक उदारमतवादानुसार प्रत्येक व्यक्तीमध्ये आपल्या आवडीनुसार पर्याय निवडण्याची आणि त्यासाठी उत्तरदायी असण्याची क्षमता आहे मात्र व्यक्तीने परस्परांचा आदर करावा. राज्याने त्यात हस्तक्षेप करून नये असा हा उदारमतवाद मानतो.

हॉब्जहाऊस या विचारवंताने उदारमतवादाची नऊ तत्वे सांगितली आहे.

१) कायद्याचे राज्य व कायद्यासमोर समानता

२) जबाबदार शासन

३) विचार, भाषण, लेखन, संघटन व धर्मस्वातंत्र्य

४) व्यवसाय स्वातंत्र्य व समान संधीचे तत्व

५) आर्थिक स्वातंत्र्य: अर्थव्यवस्थेतील शासनसंस्थेच्या हस्तक्षेपास विरोध

६) अधिकारवादी कुटुंबास विरोध, स्त्री-पुरूषांना समान स्वातंत्र्य

७) राष्ट्रीय स्वातंत्र्य

८) आंतरराष्ट्रीय राजकारणात सामर्थ्याच्या वापरास व परकीय हस्तक्षेपास विरोध

९) राजकीय स्वातंत्र्य: जनतेचे स्वातंत्र्य: प्रौढ मताधिकाराचे मानवाच्या सामाजिक-आर्थिक संबंधाचा आदर्श मानला जातो. जुन्या उदारमतवादात बाजारयंत्रणेतील मुक्त स्पर्धेच्या तत्वावर जोर दिला गेला. समकालीन उदारमतवाद हा नियंत्रित बाजार व्यवस्थेच्या आदर्शाला स्वीकृत करतो. म्हणून तो कल्याणकारी राज्याचा समर्थक बनला आहे.

## १.६.२ मार्क्सवादी दृष्टीकोन

मार्क्स थोर विचारवंत, व्यासंगी विद्वान, शास्त्रीय संशोधक, एक क्रांतिकारक विचारवंत होता. अन्य विचारवंतांनी जग समजून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु मार्क्सने जर बदलण्याचा विचार केला. सामाजिक परिस्थिती व मानवी जाणिवा यांच्यातील द्वंद्वात्मक संबंधातून विचार आणि सिद्धांत जन्माला येतात. जनसामान्यांच्या मनाची पकड जेव्हा सिद्धांत घेतात तेव्हा त्यांचे मोठ्या भौतिक शक्तीत रूपांतर होते आणि ही शक्ती जग बदलण्याची ताकद अंगी बाळगते, असा मार्क्सचा विश्वास होता त्यामुळे सामाजिक शात्रांच्या अभ्यासाकडे मार्क्सने मूर्त चिंतनाच्या दृष्टीने पाहिले, सप्तरंजनाच्या दृष्टीने न पाहता समाजातील वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला.

सामाजिक विचारांची सत्यासत्यता सैद्धांतिक पातळीवर तपासणे शक्य नसते, क्रांतिकारक कृतींच्या निकषांवर ती अजमवता येते. या सूत्रावर मार्क्सवादाची उभारणी झालेली आहे. द्वंद्वात्मक भौतिकवाद, वर्गसंघर्ष, सर्वहारा वर्गाची द्वंद्वात्मक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्य, वर्गसंघर्ष, सर्वहारा वर्गाची क्रांती, सर्वहारा वर्गाची हुकूमशाही त्यातून निर्माण होणारा वर्गविहीन समाज आणि समाजवादी व्यवस्था असा सैद्धांतिक प्रवास मार्क्स उलगडून दाखवतो. कार्ल मार्क्सने मांडलेले या सिद्धांतात पुढे लेनिन, स्टॅलिन, माओ-त्से-तुंग यांनी काही सैद्धांतिक सुधारणा करून मार्क्सवादात भर घातलेली आहे.

मार्क्सवादी विचारवंत राजकारणाला मानवी जीवनाची मूलभूत अथवा स्वायत्त कृती मानत नाही. त्यांच्या मते कोणत्याही समाजाचे, देशाचे राजकारण तेथील अर्थव्यवस्थेशी अत्यंत जवळून जोडलेले असते.

मार्क्सवादी विश्लेषण तीन गृहितकांवर आधारित आहे.

१) समाजातील समाजघटक, सदस्य स्वतंत्र्य, सुटय़ा सुटय़ा व्यक्तीच्या रूपामध्ये आपले हित साधण्यासाठी नागरी समाजाचे संघटन करतात. थोडक्यात नागरी समाज हे व्यक्तींच्या स्वहित साधनाचे क्षेत्र आहे. समाजाती, सदस्यांना परस्परांशी जोडण्याचे नागरी जीवन हे मुख्य सूत्र आहे. आपण केवळ राजकारणावर लक्ष केंद्रित केले तर समाजातील अंतविराधकांकडे दुर्लक्ष होईल. त्यामुळे वर्गसंघर्षाचे अस्तित्व समजू शकणारी नाही.

२) सामाजिक जीवनाच्या संरचनेतंर्गत पाया (Base) आणि इमला (Superstruc- ture) यात फरक करणे आवश्यक आहे. समाजाची आर्थिक रचना हा त्याचा पाया असून कुटुंब, धर्म, समाज, संस्कृती, कायदे हे त्याची अधिरचना आहे. सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रियेत मनुष्य अशा संबंधाची बद्ध होतो, ते त्याच्या इच्छापलीकडचे व अनिवार्य असतात. हे उत्पादन संबंध त्यांच्या भौतिक उत्पादनशक्तीच्या विकासाच्या निश्चित अवस्थेनुसार प्रस्थापित होतात. उत्पादन संबंधामध्ये बदल झाला की, वरच्या इमल्यात बदल होतो. थोडक्यात पायाच्या स्वरूपात बदल झाला की वरच्या अधिरचनेचे स्वरूप देखील बदलते. उत्पादक शक्तीच्या विकासाबरोबरच समाजाच्या वर्गचित्रातही बदल होतो. अशाप्रकारो सरंजामी समाज आणि भांडवलशाही समाजाच्या राजकारणात मूलभूत फरक आढळतो.

३) मार्क्सवादी दृष्टिकोन राजकारणाला क्रांतिकारक कार्यक्रमाच्या मागदर्शक रूपातही पाहतो. मार्क्स आणि टांगेल्सच्या मतानुसार भांडवलशाही व्यवस्थेअंतर्गत मजुरी पद्धती कामगारांच्या परस्परस्पर्धेंवर आधारित असून. तेच त्यांच्या शोषणाचे मूळ कारण आहे. त्यामुळे कामगार वर्गाने आपले शोषण करणार्या भांडवलदार वर्गाचा मुकाबला करण्यासाठी त्यांना लढा देण्यासाठी आपले क्रांतिकारी संघटन बनवले पाहिजे. क्रांतीकारक मार्गाने वर्गविहीत समाज अस्तित्वात येईल.

मार्क्सवादी विश्लेषणात मुख्यतः पुढील दोन उद्दिष्टे मानली जातात.

१) **सामाजिक रचना -** यात समाजव्यवस्थेच्या भिन्न रूपांचे वर्गीकरण अभिप्रेत आहे.

उदा. सरंजामशाही समाज, भांडवलशाही समाज, समाजवादी समाज

२) **कलानिश्चिती -** यात राजकीय पक्ष, दबावगट आणि अभिजन यांचा अभ्यास प्रस्तुत आहे. अभ्यास करताना ऐतिहासिक वर्णनात्मक शैलीचा वापर केला जातो. आधुनिक सामाजिक संशोधनाच्या पद्धतीचा आधार घेतला जात नाही.

मार्क्सवादी दृष्टिकोनाने अर्थकारण आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास करण्याबाबत अभ्यासकांमध्ये विशेष आवड निर्माण केली आहे.

मार्क्सवादी दृष्टिकोनाने राजकारणाला वर्गसंघर्षाचे परिक्षेत्र मानले आहे; राज्यसंस्थेकडे मार्क्सवाद शोषणाचे, दमनाचे साधन म्हणून पाहतो.

मार्क्स आणि टांजेल्सने संपूर्ण मानवी इतिहासांचे विश्लेषण करून हा विचार

मांडला की, खाजगी संपत्तीच्या मालकीच्या आधारे मानवी समाज धनिक आणि

निर्धन वर्गात विभागला आहे. धनिक वर्ग प्रभूत्वशाली वर्ग तर निर्धन वर्ग परावलंबी राहिला आहे. आधुनिक औद्योगिक समाजात राजकीयदृष्टय़ा सर्व मानवमात्रांच्या स्वातंत्र्याचा दावा केला जातो. परंतु सरंजामशाहीच्या पतनानंतर समाज आर्थिकदृष्टय़ा पुन्हा भांडवलदार वर्ग आणि कामगार वर्ग यांच्यात विभागला आहे. राज्याची सर्व सत्ता केवळ भांडवलदार वर्गाच्या हातात केंद्रित झाली असून, कामगारांचे स्वातंत्र्य निरर्थक बनले आहे. समाज जोपर्यंत आर्थिकदृष्टय़ा परस्परविरोधी वर्गामध्ये विभागलेला असेल तोपर्यंत राजकीय व्यवस्था कामगार वर्गाला परावलंवित्वाच्या शृंखलेतून मुक्त करू शकणार नाही. म्हणून मार्क्सवादाने वर्गसंघर्षाला महत्व देऊन असा विचार मांडला, या संघर्षात कामगार वर्गाला संघटित होऊन भांडवलशाहीचा अंत करावा लागेल. उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी प्रस्थापित करून समाजवादाची स्थापना करावी लागेल तेव्हाच वर्गविहीन समाजाचा उदय होऊ शकला.

थोडक्यात, मार्क्सवादाच्या मते, परस्परविरोधी वर्गीय हितसंबंधात राजकारणाच्या माध्यमातून समन्वय साधता येत नाही याउलट राजकारण हे वर्गसंघर्षाचा परिपाक असून वर्गकलहाचा अंत झाल्यानंतर राजकारण समाप्त होईल.

## १.७ स्त्रीवादी दृष्टिकोन

राज्यशास्त्राचा स्त्रीवादी दृष्टीकोन सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैधानिक अशा सर्व बाबतीत स्त्री-पुरष समतेचा पुरस्कार करणारा आणि लिंगाधारित विषमतेला विरोध करतो. त्यातून स्त्रीयांच्या प्रकट होणार्या राजकीय आकांक्षाची अभिव्यक्ती होते. राजकारण-सत्ताकारक म्हणजेच सार्वजनिक अधिकारपदप्राप्तीत स्त्रीयांना समान संधी प्राप्त व्हावी, स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात समान मानले जावे हा स्त्रीवादाचे प्रमुख आशय सूत्र आहे.

स्त्रीवादी सिद्धांताचे मुख्य प्रतिपादन म्हणजे समाजात सत्तेचा मोठय़ा प्रमाणात अवलंब केला जातो. सत्ता संकल्पनेच्या विश्लेषणात स्त्री हा एक शोषित वर्ग असून, हे शोषण सर्वव्यापी असून, स्त्रीच्या जीवनाच्या प्रत्येक आयामास ने प्रभावित करते. पुरूष हेच स्त्रीच्या शोषणाचे मूलस्त्रोत असून, पुरूषाचे अधिपत्य हे प्रभुत्वाचे सर्वात प्राचीन आणि सर्व परिचित असे रूप आहे. अशा या पुरूषी वर्चस्वापासून स्त्रीची मुक्तता झाली पाहिचे. समानतेच्या तत्वावर प्रतिष्ठतेचे व अधिकाराचे स्थान प्राप्त करण्यासाठी, स्त्रीयांनी संघठित होऊन लढा द्यावा, असे प्रतिपादन करणारी राजकीय विचारसरणी म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवादाचे ध्येय हे स्त्रीयांच्या जीवनाचे स्तर उंचावणे, त्यांची जीवनशैली संपन्न करणे हे आहे.

**स्त्रीवादाचा विकास -**

स्त्रीवादी दृष्टीकेनाचा उदय १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला. तत्कालीन समाजकारण-राजकारणावर ग्रीक विचारवंत ऍरिस्टॉटलचा प्रभाव होता, त्यांच्या मते, स्त्रीया भावनाप्रधान

असल्याने सामाजिक समस्यांचा विचार करून निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्याकडे नाही. थोडक्यात, हा विचार पुरूषसत्ताक व्यवस्थेचे आणि स्त्रीयांच्या दुय्यम स्थानाचे समर्थ करतो.

अमेरिकेने १७७६ मध्ये स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित केला. मानवी हक्कांचे समर्थन केले. मात्र त्यातून स्त्रीया आणि गुलामांना वगळण्यात आले. १७९१ मध्ये मूलभुत अधिकारांचा राज्यघटनेत समावेश करण्यात आला. मात्र हे अधिकार केवळ पुरषांनाच बहाल करण्यात आले. त्या विरोधात मेरी उलस्टोन क्रॉफ्ट या स्त्रीवादी लौखिकतेने `A Vindication of the rights of women` या पुस्तकात लेखन करून स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केला.

१९ व्या शतकात जगभरात मताधिकाराची व्याप्ती विस्तारत असताना लिंगाधिष्ठित भेदभावाच्या आधारे स्त्रीयांना मताधिकार देण्यात आला नाही. इंग्लंडमध्ये स्त्रीमताधिकाराच्या चळवळीचे नेतृत्व ब्रिटिश उदारमतवादी विचारवंत जे.एस. मिलने केले. स्त्री-पुरूष समानतेवर भर देणारे विचार मिलने मांडले. १८८० मध्ये स्त्रीवाद (Feminism) हा शब्द प्रयोग सर्वप्रथम वापरला गेला.

ब्रेटी फाइटन या अमेरिकन लेखिकेने कामाच्या ठिकाणी, राजकारणात, खाजगी जीवनात स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करणारे उपाय सुचवले.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी चळवळींना स्त्री मताधिकार, संततीनियमन विषयक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, स्त्री शिक्षणाचा प्रसार, स्त्रीयांच्या आरोग्य विषयक समस्या, नोकरी-व्यवसाय करणार्या स्त्रीयांसाठी चांगल्या सुविधांची मागणी केली. १९ व्या शतकात स्त्री मताधिकार मान्य करण्यात आला.

१९७० च्या दशकात मार्क्सवादी, उदारमतवादी, मानसशास्त्रीय चौकटीत पुरूष सलाह व्यवस्थेवर टीप करण्यात आली. १९८० च्या दशकात लिंगभेदभाव, विषमता, पुरूषी समानता आणि पुरूष केंद्रीभूत समाजरचना यांचा विरोध करणारे लेखन स्त्रीवाद्यांनी केले.

**स्त्रीवादी विचारप्रवाहाचे प्रमुख विचारसूत्र -**

१) स्त्रीवादी राजकीय विचारप्रणालीत सार्वजनिक क्षेत्र हे पुरूषांचे तर खाजगी क्षेत्र स्त्रीयांपुरतेच सीमित असणे ही विभागणी स्त्रीवादाला मान्य नाही. स्त्रीयांना पाहणार्या सार्वजनिक क्षेत्रात नोकण्या, पदे इ. मध्ये पुरूषी वर्चस्व संपवून स्त्रीयांना पुरूषांप्रमाणे वाटा मिळायला पाहिजे. ही स्त्रीवादाची प्रमुख मागणी आहे.

२) चूल आणि मुल या परंपरागत क्षेत्रात स्त्रीयांप्रमाणे पुरूषांनीही सहभागी झाले पाहिजे हे स्त्रीवादात अभिप्रेत आहे.

३) लिंगदृष्ट्या अंध समाजाची (Sexiblind Society) प्रस्थापना करणे हे स्त्रीवादाचे प्रमुख उद्दीष्ट आहे कारण लिंगाधिळित विषमतेद्वारे स्त्रीयांना शिक्षण, आरोग्य, वेतन, व्यावसायिक प्रगती इ. पासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जाते.

४) पुरूषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीयांची दडपणूक केली जाते. स्त्रीयांवर अन्याय करणार्या लिंगभेद विरहित नियमांना स्त्रीवादाचा विरोध आहे.

५) पुरूषकेंद्रित व्यवस्थेत, प्रातिनिधिक संस्थांमध्ये स्त्रीयांची दडपणूक केली जाते. त्यामुळे स्त्रीयांची स्वायत्तता लोप पारते आणि त्यांच्या आत्मसन्मानाला वाव राहत नाही. थोडक्यात, स्त्रीदेखील एक व्यक्ती असून, जन्माधिष्ठित आदर, प्रतिष्ठा स्त्रीला मिळाली पाहिजे. लिंगाधिष्ठित भेडभाव सर्वच क्षेत्रातून संपवला पाहिजे अशी स्त्रीवादयांची मागणी आहे.

थोडक्यात, समतेच्या दिशेने जाणारा आणि लैंगिक विषमतेला विरोध करणारा विचार स्त्रीवादी विचारधारेच्या केंद्रस्थानी आहे.

**स्त्रीवादी विचारप्रवाह -**

स्त्रीवादाचे उदारमतवादी, समाजवादी जहालवादी उत्तर-आधुनिक स्त्रीवाद असे वर्गीकरण केले जाते.

१) **उदारमतवादी स्त्रीवाद -** उदारमतवादी स्त्रीवादाचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्तिवादी आहे. स्त्री आणि पुरूष दोघेही विवेकी आहेत त्यामुळे त्यांच्यात समानता हवी, लिंगाधिष्ठित भेदभावाचे समूळ उच्चाटन केल्याशिवाय स्त्रीयांची प्रगती होणार नाही असे या विचारप्रवाहाचे म्हणणे आहे. स्त्रीशिक्षण, स्त्री-पुरूष वेतन समानता याविषयी स्त्रीवादी उदारमतवादी विचारवंत आग्रही होते.

मेरी उलस्टोन क्रॉफ्ट, जे. एस. मिल बेटी डायसन हे विचारवंत या विचारप्रवाहाचे मुख्य प्रवर्तक आहे.

२) **समाजवादी विचारप्रवाह -** समाजवादी विचारप्रवाहावर प्रामुख्याने कार्ल मार्क्स आणि त्याचा सहकारी केंद्रीक पॅजेल्स यांचा प्रभाव पडलेला आहे. त्यांच्यामते, स्त्री-पुरुष विषमतेचे मूळ संपत्ती हे आहे. संपत्ती धारक पुरुष हा अधिक सामर्थ्यशाली बनतो आणि उदरनिर्वाहासाठी स्त्रीला संपूर्णत ः पुरुषावर अवलंबून राहावे लागते. परिणाम स्वरुप, आर्थिकदृष्टय़ा ती कमकुवत बनते.

मार्क्सच्या मते, समाजवादाच्या स्थापनेनंतर समाजातून खाजगी संपत्तीचे उच्चाटन होईल आणि स्त्रीयांचे दास्यत्व संपुष्टात येईल. अशा समाजात स्त्री-पुरुषांचा दर्जा समान असेल कोणताही वर्ग अस्तित्वात राहणार नाही.

३) **जहालवादी स्त्रीवाद -** प्रामुख्याने समाजवादी आणि जहालवादी स्त्रीवादाची तत्वे समान आहेत, परंतु जहालवादय़ांनी समर्थन केलेली साधने अधिक उग्र-आक्रमक स्वरुपाची आहेत.

या विचारप्रवाहाच्या मते, स्त्रीयांच्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे पुरेसे नाही.

फ्रेंच विचारवंत सिमोन-दी-बूहाँ ने आपल्या मढहश डशलेपव डशुफ या पुस्तकात जहाल स्त्रीवादाचा पुरस्कार केला आहे.

जहाल स्त्रीवादय़ांच्या मते, स्त्रीत्व ही पुरुषांनी घडवलेली बाब आहे. स्त्रीमुक्तीचे ध्येय

गाठण्यासाठी स्त्रीयांनी विवाह, मातृत्वापासून मुक्त राहिले पाहिजे. स्वतःचे भवितत्व त्यांच्यात हातात असून, त्यासाठी सामर्थ्यशाली बनले पाहिजे. तसेच कामाची स्त्री-पुरुष विभागणी, अधिकार संरचनाश गर्भधारणा, बालक असावे किंवा नसावे, नको असल्यास स्त्रीयांना गर्भपात करण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य असले पाहिजे, अशा आशयाचे आक्रमक विचार मांडले आहे. तसेच श्रमविभागणी व प्रजोत्पादन यावरील पुरुषी वर्चस्वाचा धिक्कार केला. स्त्रीमुक्तीसाठी क्रांतीशिवाय दुसरा पर्याय नाही. असा विचार अग्रक्रमाने मांडला. सामाजिक - राजकीय - सांस्कृतिक संस्था पुरुषी वर्चस्वापासून मुक्त करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

४. **उत्तर आधुनिक स्त्रीवाद -** उत्तर आधुनिक स्त्रीवाद आधुनिकते पलीकडे जातो यात बुध्दिनिष्ठता प्रगतीबाबत सभोवतालच्या परिस्थितीची नव्याने मांडणी करावी असे सुचवले आहे. डेरिडा आणि फाऊलकांट या फेंच विचारवतांनी या विचारप्रवाहाचे विश्लेषण केले आहे.

हा विचारप्रवाह स्त्रीयांच्या विलगतेचा पुरस्कार करतो. स्त्री-पुरुषातील दरी मूलभूत स्वरुपाची असून ती कधीही न संपणारी आहे. त्यामुळे पुरुषी वर्चस्वा विरुध्द लढा उभारणे व्यर्थ आहे म्हणून स्त्रीयांनी स्वतःची वेगळी जीवनशैली तयार करावी. पुरुषांपासून वेगळे होऊन प्रेम, सहवास, वैवाहित संबंध यांना तिलांजली देऊन स्वतःच्या संस्था वसाहती स्थापन करावी. अपव्यप्राप्तीसाठी पुरुषांवर विसंबून न राहता कृत्रिम गर्भधारणा या आधुनिक शास्त्रीय प्रगतीचा फायदा घ्यावा. अशाप्रकारे पुरुषांपासून स्वतंत्र होऊन स्त्रीयांनी आपले वेगळे विश्व निर्माण करावे, असा हा स्त्रीवाद सांगता.

**सारांश -**

स्त्रीवादी विचारधारेने स्त्रीयांवरील होणार्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली आहे. त्यांनी लिंगाधिळित भेद लिंगभेदाचे स्वरुप भेदभावात्मक सामाजे वास्तव परिस्थिती पुरुषी समाजसत्ताक पध्दती, राजकीय सहभाग, सामाजिक न्याय अशा सर्व पैलुंवर प्रकाश टाकून नवीन राजकीय सिद्धांताची मांडणी केली आहे. त्यातून महिलांचे कल्याण व महिला सक्षमीकरणाबाबत नवनवीन धोरणे, कायदे करुन स्त्रीयांच्या प्रगतीस हातभार लावला आहे.

## १.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. राजकीय सिद्धांत म्हणजे काय ?

२. राजकीय सिद्धांताच्या / राज्यशात्राच्या अध्ययनाचा आदर्शवादी दृष्टिकोन स्पष्ट करा.

३. राजकीय सिद्धांताच्या अनुभववादी दृष्टिकोनाची चर्चा करा.

४. राजकीय सिद्धांताच्या उदारमतवादी दृष्टिकोन विशद करा.

५. राजकीय सिद्धांताच्या अभ्यासात मार्क्सवादी दृष्टिकोनाने मोलाची भर घातली आहे. तुमच्या मताचे समर्थन करा.

६. स्त्रीवाद म्हणजे काय ? ते सांगून स्त्रीवादाचे विविध प्रवाह स्पष्ट करा.

## १.९ संदर्भग्रंथ

१. राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण - डॉ. भास्कर लक्ष्मण मोळे, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

२. ॲड इंद्रडक्शन टू पोलिटिकल थिअरी राजनीतिशात्र परिचखय मूळ लेखक ओ.पी. गाबा, मराठी अनुवाद प्रा. तुकाराम जाधव, केसरकर प्रकाशन, पुणे

३. राजकीय सिद्धांत व संकल्पना, डॉ. अशोक व्ही जैन, सेठ प्रकाशन, मुंबई.

❋❋❋❋❋❋❋

# २अ

# लोकशाही - नागरिकत्व

**घटक रचना**

२अ.० उद्दिष्टे

२अ.१ प्रास्ताविक

२अ.२ विषय विवेचन

२अ.२.१ लोकशाही- अर्थ व व्याख्या
२अ.२.२ लोकशाहीची वैशिष्ट्ये/तत्वे
२अ.२.३ लोकशाहीचे प्रकार

२अ.३ प्रातिनिधिक लोकशाहीचे प्रकार
२अ.३.१ संसदीय लोकशाहीची वैशिष्ट्ये
२अ.३.२ संसदीय लोकशाहीचे गुण
२अ.३.३ संसदीय लोकशाहीचे दोष अथवा उणीवा
२अ.३.४ अध्यक्षीय लोकशाहीची वैशिष्ट्ये
२अ.३.५ अध्यक्षीय लोकशाहीचे गुण
२अ.३.६ अध्यक्षीय लोकशाहीचे दोष अथवा उणिवा

२अ.४ सहभागात्मक लोकशाही-अर्थ
२अ.४.१ सहभागात्मक लोकशाहीचे स्वरूप
२अ.४.२ सहभागात्मक लोकशाहीची वैशिष्ट्ये
२अ.४.३ सहभागात्मक लोकशाहीचे गुण
२अ.४.४ सहभागात्मक लोकशाहीचे दोष अथवा उणीवा

२अ.५ चर्चात्मक लोकशाही
२अ.५.१ चर्चात्मक लोकशाहीची वैशिष्ट्ये

२अ.६ सारांश

२अ.७ सरावासाठी प्रश्नसंच

२अ.८ अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ

## २अ.० उद्दिष्ट्ये

लोकशाही या घटकाच्या अभ्यासातून आपणास पुढील उद्दिष्टे साध्य करता येतील;

१) लोकशाही संकल्पनेची ओळख करून घेणे.

२) लोकशाहीच्या विविध प्रकारांची माहिती करून घेणे.

३) लोकशाहीच्या विविध प्रकारांचे वैशिष्ट्य आणि गुण-दोष स्पष्ट करणे.

४) लोकशाही संकल्पनेविषयी जाणीव जागृती वाढ करणे.

५) लोकशाहीच्या बदलत्या स्वरूपाचा आणि विकासाचा आढावा घेणे.

६) लोकशाहीतील जनतेची भूमिका स्पष्ट करणे.

## २अ.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून लोकशाही हा शासन प्रकार अस्तित्वात आहे, असे इतिहासातील विविध पुराव्यांवरून स्पष्ट होते. प्राचीन काळामध्ये गणराज्य अस्तित्वात होती. ही गणराज्य म्हणजेच लोकशाहीचे प्राचीन रूप होय. लोकांची सत्ता असलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. लोकशाही ही संकल्पना आता सर्वांच्या परिचयाची झालेली आहे. ग्रीक विचारवंत अरिस्टाॅटल यांच्या विचार व लिखाणातही लोकशाही संकल्पनेचा उल्लेख झालेला दिसून येतो. प्राचीन काळापासून ते आधुनिक म्हणजेच आजपर्यंतच्या काळात लोकशाहीचे स्वरूप सतत बदलत गेलेले आपणास दिसून येते. प्राचीन काळातील लोकशाही, मध्ययुगीन काळातील लोकशाही आणि आधुनिक काळातील लोकशाही यामध्ये बरीचशी परिवर्तने झालेली आपणास दिसून येतात. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाने जास्त असलेला भूप्रदेश यामुळे प्राचीन गणराज्यातील प्रत्यक्ष लोकशाहीची जागा आधुनिक काळात अप्रत्यक्ष लोकशाहीने घेतलेली आहे. इ. स.१२१५ मध्ये मॅग्नाचार्ट सनदेनुसार नागरिकांना काही अधिकार प्रदान करण्यात आले. तसेच इ. स. १६८८ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या रक्तहीन राज्यक्रांतीमुळे राजाच्या अधिकारांवर मर्यादा आल्या आणि यातून इंग्लंडची प्रजा सार्वभौम बनली. अशाप्रकारे लोकशाहीची सुरुवात इंग्लंडपासून झाली असल्यामुळे इंग्लंडला ‘लोकशाहीचे माहेरघर’ असे संबोधले जाते. यातूनच लोकशाहीचा विकास झाला. इंग्लंड नंतर जगातील अनेक नवस्वतंत्र राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केला आणि अशाप्रकारे सतराव्या शतकात इंग्लंडमध्ये उदयास आलेल्या लोकशाहीचा प्रसार आणि प्रचार १८ व्या आणि १९ व्या शतकापर्यंत संपूर्ण जगभर झाला. लोकशाहीचा आजचा विकास हा हजारो वर्षात झालेला विकास आहे.

लोकशाही ही एक निव्वळ राजकीय यंत्रणाच नाही, तर तो एक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. त्याचप्रमाणे लोकशाही हा एक जीवनमार्ग आहे, एक जीवनपद्धती आहे. व्यक्ती मात्रावर असणारी नितांत श्रद्धा आणि व्यक्तिमत्त्वाची सांभाळली जाणारी प्रतिष्ठा हा लोकशाहीचा आत्मा आणि लोकशाहीचे खरे अधिष्ठान आहे.

## २अ.२ विषय विवेचन

लोकशाही हा केवळ शासनाचा एक विशिष्ट प्रकार नसून तो एक जीवनविषयक दृष्टिकोन आहे. लोकशाहीचा विकास हा अति प्राचीन काळापासून होत आलेला आहे. प्राचीन ग्रीक नगर राज्यातील राज्यव्यवस्थेपासून लोकशाहीच्या विकासाला अनुकूल घडामोडी घडलेल्या आहेत. नागरिकांच्या हक्कांची सनद, इंग्लंडमधील रक्तहीन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती आशा घडामोडीतून लोकशाहीचा विकास हा काही शतकांपासून निरंतर होत आहे.

लोकशाहीमध्ये अंतर्भूत असणारी मानवतावादी तत्त्वेच लोकशाहीला अधिक प्रसारित करण्यास कारणीभूत ठरलेली आहेत. त्यामुळेच जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केल्याचे दिसून येते. आधुनिक काळात लोकशाहीला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे, कारण लोकशाही हा शासनाचा एक आधुनिक प्रकार म्हणून प्रसिद्ध आहे. जगातील नवस्वतंत्र राष्ट्रांनी लोकशाही शासन स्वीकारलेली आहे. तसेच लोकशाही शासन स्वीकारण्यात विविध राष्ट्र स्वतःचा गौरव समजत आहेत. नवस्वतंत्र प्रत्येक राष्ट्र स्वतःला लोकशाही राष्ट्र मानन्यात आज धन्यता मानत असल्याचे दिसून येते. राष्ट्र राज्याच्या उदयानंतर जगातील निरंकुश राज्यसत्तेविरुद्ध संघर्ष झालेले आहेत. इंग्लंड, फ्रान्स आणि युरोपातील विविध देशात निरंकुश राज्यसत्तेविरोधात अशाप्रकारचे संघर्ष झाल्याची इतिहासात नोंद आहे. राजसत्तेविरुद्धच्या संघर्षातूनच लोकशाही विचार उदयास आले आणि यातूनच लोकशाहीचा विकास झालेला आपणास दिसून येतो. लोकशाहीत परस्पर समता आणि सहकार यांवर भर दिला जातो. यातून जनता, समाज आणि देशाचा विकास सहज साध्य होतो. लोकशाहीत परमतसहिष्णुता सांभाळली जाते म्हणून मतभिन्नता असली तरी मतभिन्नतेतूनही एकतेला प्राधान्य दिले जाते. लोकशाही शासन प्रकारात बंधुत्वाचा महत्त्व असून कोणत्याही प्रकारच्या मानव निर्मित भेदभावाला स्थान नाही. त्याचप्रमाणे लोकशाही हा शासनाचा असा एक प्रकार आहे की, ज्यामध्ये शासक वर्ग हा लोकांद्वारे निवडला जातो आणि लोकांना जबाबदारही धरला जातो. म्हणूनच लोकशाही हा शासन प्रकार आधुनिक काळात अत्यंत लोकप्रिय झालेला आहे.

### २अ.२.१ लोकशाहीचा अर्थ व व्याख्या:-

लोकशाहीच्या विकासाचा हजारो वर्षांचा इतिहास आहे. स्थळ, काळ आणि परिस्थितीनुसार लोकशाही विकसित होत आलेली आहे, म्हणून लोकशाहीत सतत परिवर्तने झालेली आपणास दिसून येतात. त्यामुळे लोकशाही ही एक गतिमान स्वरूपाची संकल्पना असून त्याबाबतीत अनेकांची विविध मते असलेले आपणास दिसून येतात. त्यामुळे लोकशाहीचा अर्थ बघत असतांना लोकशाहीची निश्चित व्याख्या करणे अतिशय कठीण आहे, कारण प्रत्येक विचारसरणी धारण करणारी व्यक्ती तिला अनुकूल असे लोकशाहीचे स्पष्टीकरण करीत असते. कोणत्याही एका वाक्यात लोकशाहीची व्याख्या करणे अतिशय कठीण आहे. ‘लोकशाही’ हा शब्द इंग्रजीतील ‘Democracy’ या शब्दाचे प्रतिरूप आहे. Democracy (डेमाक्रॉसी) या मूळ इंग्रजी शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील ‘Demos’ (डेमास) म्हणजे लोक अथवा ‘जनता’ व ‘Crocia’ (क्रोशिया) म्हणजे ‘सत्ता’ या शब्दांपासून झालेली आहे. Demos+Crocia= Democracy (लोक+ सत्ता= लोकांची सत्ता) यावरून लोकशाही म्हणजेच जनतेची किंवा लोकांची सत्ता होय.

लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य एवढाच अर्थ घेऊन लोकशाहीची व्याख्या पूर्ण होत नाही. तर लोकांसाठी असलेले आणि लोकांकडून त्याचा कारभार चालणारे राज्य म्हणजे लोकशाही, असे अब्राहम लिंकनने लोकशाही विषयी आपले मत व्यक्त केलेली आहेत. वास्तवात अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकांचे शासन, लोकांकडून चालविण्यात येणारे शासन व लोकांकरिता करण्यात येणारे शासन या अर्थाने केलेली लोकशाहीची व्याख्या राजकीय बाबतीत संयुक्तिक वाटते. लोकशाहीच्या व्याख्या अनेक अभ्यासकांनी आणि विचारवंतांनी आपापल्या दृष्टिकोनातून केलेल्या आहेत, त्या सर्वांचा विचार करणे जरी शक्य

नसले तरी त्या व्याख्यांमध्ये असलेल्या समान विचारधारेतून साधारणपणे लोकशाहीचा अर्थ समजून घेणे सोयीचे ठरते. लोकशाहीचा सर्वव्यापक अर्थ समजून घेत असताना आपण पुढील विचारवंतांच्या व्याख्यांचा थोडक्यात आढावा घेऊ;

१) **हिरोडोटस** यांच्या मते, "लोकशाही म्हणजे शासनाचा असा प्रकार की, ज्यात राज्याची सर्वोच्च सत्ता लोकांच्या हाती असते."

२) **लास्की** यांच्या मते, "लोकशाही हे केवळ शासनाचे स्वरूप नाही, तर ते समाजाचे, राज्याचे तसेच आर्थिक व नैतिक सुव्यवस्थेचे स्वरूप आहे."

३) **अब्राहम लिंकन** यांच्या मते, "लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय." (Democracy is the Government of the people, for the people and by the people)

४) **जे. एस. मिल** यांच्यामते, "लोकशाही ही एक अशी शासन पद्धती आहे कि, ज्यामध्ये संपूर्ण लोक शासन सत्ता स्वतः निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी मार्फत उपभोगत असतात."
(Democracy is the form of government in which the whole or the majority of the people exercise the governing power through that is personally elected by them.)

५) **हेनरिमन** यांच्या मते," लोकशाही म्हणजे शासनाचा असा प्रकार होय कि, ज्या शासन प्रकारात लोकांच्या हातात राजकीय नियंत्रण असते."

६) **प्रा. मेकआयव्हर** यांच्या मते, "लोकशाही हा केवळ बहुमतानुसार चालणारा शासन कारभार नसून शासन कारभार कोण करतो व त्याने कशाप्रकारे शासन कारभार करावा, हे ठरविणारा एक मार्ग होय."

७) **प्रा.सिली** यांच्या मते," लोकशाही हे एक असे शासन आहे कि, ज्यामध्ये सहभाग घेण्याची संधी प्रत्येकाला मिळत असते."
(Democracy is government in which everyone has share.)

८) **बेंथम** यांच्या मते," ज्या शासन पद्धतीत प्रत्येक व्यक्तीची गणना एक अशीच असते व एकापेक्षा कोणाचीही गणना जास्त नसते, त्या शासनपद्धतीला लोकशाही असे म्हणतात." (Democracy is the form of government in which everyone is counted as one and not more than one.)

९) **चार्ल्स मेरियम** यांच्या मते,"लोकशाही म्हणजे एखाद्या सूत्रांचा संच किंवा संघटनेचा एखादा नकाशा नाही, तर ती एक अशा विचारांची मूस आणि आचारांची रिती आहे की, जी सर्वसामान्यांच्या दुःखाला सामान्य इच्छेच्या मार्गदर्शनाने दूर करण्याचा प्रयत्न करीत असते."

१०) **प्रा. डायसी** यांच्या मते," संपूर्ण राष्ट्राच्या मानाने फार मोठ्या अंशाकडून कारभार चालणारा शासन प्रकार म्हणजे लोकशाही होय." (Democracy is that form of

government in which the governing body is comparatively a large fraction of the entire nation.)

११) **लॉर्ड ब्राईस** यांच्या मते," ज्या राज्यात शासन सत्ता कोणत्याही एका वर्गाच्या हातात नसून समाजातील सर्व लोकसमूह रूपाने असते ते लोकशाही शासन होय."

१२) **गिडिगज** यांच्या मते,"लोकशाही हे शासनाचे, राज्याचे तसेच समाजाचे एक स्वरूप आहे. एवढेच नव्हे तर या तीनही ते मिश्रण आहे."

१३) **ग्रीक तत्त्वज्ञांच्या** मते, "लोकांची सत्ता म्हणजे लोकशाही होय."

अशाप्रकारे लोकशाही या संकल्पनेचा अर्थ प्रत्येक विचारवंताने वा अभ्यासकाने एक शासनपद्धती म्हणून, एक जीवनपद्धती म्हणून, शासनाचा प्रकार म्हणून स्पष्ट केलेला आहे. वास्तवात लोकशाही ही एक केवळ राजकीय संकल्पना नसून सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था व्यापून घेणारी एक व्यापक संकल्पना आहे. कारण आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात जर लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाहीला काहीच अर्थ राहत नाही, असे प्रा. लास्की यांनी स्पष्ट केले आहे. लोकशाहीच्या वरील व्याख्या आणि त्यांचा अर्थ पाहता आपणास असे म्हणता येईल की, लोकशाहीत केवळ राज्यकारभाराला आणि सरकारला जनतेची मान्यता असून चालत नाही, तर त्यात जनतेच्या मान्यतेबरोबरच जनतेचा सक्रीय सहभागही महत्त्वपूर्ण असतो.

लोकशाहीच्या वरील विविध व्याख्या आणि त्यांचा अर्थ उलगडून पाहिल्यानंतर आपणास लोकशाहीची खालील काही तत्वे किंवा वैशिष्ट्ये सांगता येतील;

### २अ.२.२ लोकशाहीची तत्वे किंवा वैशिष्ट्ये:-

**१) सत्तेचे विकेंद्रीकरण:**

लोकशाहीमध्ये जास्तीत जास्त लोकांनी राजकीय सहभाग घ्यावा या उद्देशाने शासन सत्तेचे अधिकाधिक विकेंद्रीकरण केले जाते. शासन सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यामुळे व्यक्तीविकासाला संधी मिळते. याउलट शासन सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण झाल्यास तिथे व्यक्तिविकास खूंटण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून लोकशाहीमध्ये सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा जास्त महत्त्व देऊन सत्तेच्या विकेंद्रीकरणातून जास्तीत जास्त जनतेला हा राजकीय सहभाग घेण्याची संधी दिली जाते.

**२) लोककल्याणकारी शासन:**

लोकशाहीत लोककल्याणावर अधिकाधिक भर दिला जातो. कारण लोकशाही शासनाचा उद्देशच लोककल्याण करणे हा असतो. लोकांचा सर्वांगीण विकास कसा करता येईल येईल या दृष्टिकोनातून लोकशाहीमध्ये लोककल्याणकारी कार्य शासनामार्फत केली जातात. म्हणून लोकशाहीला लोककल्याणकारी शासन असेही म्हटले जाते.

**३) जनशक्ती हाच लोकशाहीचा आधार:**

लोकशाही म्हणजे लोकांचे शासन होय. लोकशाहीत जनतेला विश्वासात घेतल्याशिवाय लोकांचे सहकार्य मिळू शकत नाही म्हणून लोकांच्या सहकार्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही म्हणूनच म्हटले जाते की जनशक्ती हा लोकशाहीचा आधार आहे. लोकशाही हे लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून चालवले जाणारे शासन असल्यामुळे लोकशाहीचा जनशक्ती हाच प्रमुख आधार आहे.

**४) शांततेच्या मार्गाने परिवर्तन:**

लोकशाहीमध्ये कोणतेही बदल वा परिवर्तन शांततेच्या मार्गानेच होतात. लोकशाहीत परिवर्तनासाठी अथवा क्रांतीचा मार्गा अवलंबला जात नाही.तसेच लोकशाहीत कोणत्याही प्रश्नांची व समस्यांची सोडवणूक शांततेच्या मार्गाने केली जाते. म्हणूनच लोकशाहीत शांततेला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**५) न्यायमंडळाचे स्वातंत्र्य:**

लोकशाहीमध्ये न्यायमंडळाला नि:पक्षपातीपणे आणि निर्भीडपणे न्याय देता यावा यासाठी न्यायमंडळाला स्वातंत्र्य देणे अत्यंत आवश्यक असते. म्हणून लोकशाहीत कायदेमंडळाने केलेले कायदे देशाच्या राज्यघटनेशी सुसंगत आहेत किंवा नाहीत, हे तपासून पाहण्यासाठी तसेच कायदेमंडळाने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी कार्यकारीमंडळ योग्य पद्धतीने करीत आहे किंवा नाही, हे पाहण्यासाठी न्यायमंडळाला स्वातंत्र्य देणे अत्यंत आवश्यक असते. म्हणून लोकशाहीत न्यायमंडळाचे स्वातंत्र्य मान्य केलेले असते.

**६) व्यक्तित्वाची प्रतिष्ठा:**

लोकशाहीमध्ये व्यक्ती आणि व्यक्ती विकास हा घटक केंद्रीभूत घटक मानला जातो. म्हणून लोकशाहीमध्ये व्यक्तीला साधन न मानता साध्य मानले जाते आणि प्रत्येक व्यक्तीचे मूल्य देखील समान मानले जाते. थोडक्यात लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिष्ठा व तिचे श्रेष्ठत्व जपले जाते.

**७) जनतेचे सार्वभौमत्व:**

लोकशाहीत जनता सार्वभौम असते. कारण लोकशाहीत आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार जनतेला असतो. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत लोकशाहीमध्ये देशाचा राज्यकारभार चालवला जातो. म्हणूनच लोकशाहीवादी देशात तेथील जनता सार्वभौम असणे आवश्यक मानले जाते.

**८) स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय तत्वास महत्व:**

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही लोकशाहीची पायाभूत तत्त्वे आहेत. या तत्वांशिवाय लोकशाहीचा विचार आपण करू शकत नाही. म्हणून नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि विविधता असणाऱ्या देशात परस्परांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करण्यासाठी लोकशाहीमध्ये या तत्त्वांना महत्त्वाचे स्थान आहे. लोकशाहीमध्ये निश्चित मर्यादेत प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य प्राप्त होत असते. त्याचप्रमाणे लोकशाहीत कायद्यासमोर सर्व व्यक्तींना समान मानले

जाते. थोडक्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हे लोकशाहीचे मूलभूत आधार आहेत.

**९) अल्पसंख्यांकांना महत्व आणि संरक्षण:**

लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्व असले तसेच लोकशाही हे बहुमताचे शासन असले तरीही देशातील अल्पसंख्यांकांवर बहुमतवाल्यांची हुकूमशाही प्रस्थापित होणार नाही, याची दक्षता लोकशाहीमध्ये घेतली जाते. लोकशाहीमध्ये म्हणूनच अल्पसंख्यांकांना संरक्षणाची हमी दिली जाते, तसेच त्यांचे अहित होणार नाही, याची दक्षता घेतली जाते.

**१०) राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व:**

लोकशाहीमध्ये राज्यघटनेला सर्वश्रेष्ठ स्थान प्रदान केले जाते. राज्यघटना सर्वश्रेष्ठ असून राज्यघटनेला विरोध करणारा कायदा लोकशाहीत कोणालाही करता येत नाही. कारण लोकशाहीवादी देशात राज्यघटनेचे सर्व श्रेष्ठत्व सर्वमान्य केलेले असते. त्यामुळे नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन करणारे कायदे कायदेमंडळाला करता येत नाहीत, तसेच राज्यघटनेच्या श्रेष्ठत्वामुळे शासन किंवा जनता एकमेकांच्या अधिकारावर अतिक्रमण करू शकत नाही.

**११) प्रभावशाली विरोधीपक्ष:**

लोकशाहीत विरोधी पक्ष प्रभावशाली असणे अत्यंत आवश्यक असते. सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांकडून होणाऱ्या चुका जनतेच्या नजरेस आणून देण्यासाठी विरोधी पक्षांची भूमिका महत्त्वपूर्ण असते.लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष प्रभावशाली असण्याबरोबरच विरोधी पक्षाने केवळ विरोधासाठी विरोध न करता जनतेच्या भल्यासाठी शासनाच्या योग्य निर्णयाला पाठिंबा देणेही अपेक्षित असते.

**१२) सहिष्णुतेला महत्व:**

लोकशाहीत सहिष्णुता महत्त्वपूर्ण मानली जाते. लोकशाहीमध्ये इतरांच्या मताचाही आदर केला जातो. म्हणून लोकशाहीत मतभिन्नता असली तरी सहिष्णुताही महत्त्वाची मानली जाते. परमतसहिष्णुतेचा लोकशाहीमध्ये आदर केला जातो. लोकशाही विचार स्वातंत्र्य असल्यामुळे परस्परांची मते जाणून घेतली जातात आणि परस्परांच्या मतांचा आदरही लोकशाहीमध्ये केला जातो. तसेच बहुसंख्यांकांप्रमाणे अल्पसंख्यांकांनाही आपले मत अथवा विचार व्यक्त करण्याची संधी लोकशाहीत प्राप्त करून दिली जाते.

**१३) प्रौढ मताधिकार:**

लोकशाहीमध्ये जनतेला आपले प्रतिनिधी निवडून द्यायचे असतात. म्हणून लोकशाहीमध्ये प्रौढ नागरिकांना मताधिकार बहाल केलेला आहे. या मताधिकारानुसार पात्र स्त्री-पुरुषांना मतदानाच्या अधिकाराद्वारे आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो. उदा.भारतामध्ये वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रौढ स्त्री-पुरुषांना मताधिकार देण्यात आलेला आहे.

**१४) नागरिकांचे मूलभूत अधिकार:**

लोकशाही असणाऱ्या देशांमध्ये नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नागरिकांना मूलभूत हक्क देण्यात आलेले आहेत. भारतीय राज्यघटनेनुसार भारतीय नागरिकांना सहा प्रकारचे मूलभूत हक्क देण्यात आलेले आहेत. या मूलभूत होताना न्यायालयाचे संरक्षण देखील देण्यात आलेले आहे.

**१५) राजकीय पक्ष व निवडणुका:**

लोकशाही असणाऱ्या देशांमध्ये विशिष्ट कालखंडानंतर निवडणुका पार पाडल्या जातात.या निवडणुकीमध्ये जनता राजकीय पक्षाच्या माध्यमातून राजकीय सहभाग नोंदवत असते. निवडणुकीच्या माध्यमातुन जनता आपले प्रतिनिधी निवडून देत असते तसा अधिकार जनतेला लोकशाहीमध्ये प्राप्त असतो. लोकशाही निवडणुका जितक्या प्रमाणात स्वच्छ आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न होतील, तितक्या प्रमाणात त्या देशातील लोकशाही यशस्वी मानली जाते. लोकशाहीवादी देशात निवडणुकीचे संचलन करण्यासाठी स्वायत्त यंत्रणा उभारली जाते.

अशाप्रकारे लोकशाहीची काही सर्वसाधारण वैशिष्ट्ये आपणास दिसून येतात. या वैशिष्ट्यांनुसार लोकशाही हा एक शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यामध्ये जनतेकडून प्रतिनिधींची निवड केली जाते आणि हे प्रतिनिधी जनतेला जबाबदार मानले जातात. लोकशाहीमध्ये परस्पर सहकार्य आणि समता यावरही भर दिला जातो त्याचप्रमाणे न्याय, स्वातंत्र्य, बंधुता ही तत्वे ही महत्त्वपूर्ण मानली जातात. लोकशाहीत जनतेचा राजकीय सहभाग महत्त्वपूर्ण मानला जातो. जनतेच्या राजकीय सहभागाशिवाय किंवा सहकार्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही.

### २अ.२.३ लोकशाहीचे प्रकार:-

लोकशाहीचे सर्वसाधारणपणे पुढील दोन मुख्य प्रकार आहेत;

१) प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy)

२) अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाही (Indirect or Representative Democracy)

लोकशाहीच्या वरील प्रकाराबरोबरच लोकशाहीचे पुढील प्रकारही आहेत;

३) सहभागी लोकशाही

४) चर्चात्मक लोकशाही

**१) प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy):**

प्रत्यक्ष लोकशाहीला खूप मोठा इतिहास आहे. प्राचीन ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. प्राचीन ग्रीक आणि रोम या नगरराज्यातील नागरिक एकत्र येऊन शासनासंबंधीच्या कार्याविषयी चर्चा करीत असत आणि एकत्रितपणे चर्चा करून निर्णय घेत असत. प्राचीन काळात प्रत्यक्ष लोकशाहीला 'गणराज्य' या नावाने संबोधले जात होते. प्राचीन

ग्रीस व रोममधील तत्कालीन नगरराज्यांचे मर्यादित क्षेत्रफळ, मर्यादित लोकसंख्या आणि मर्यादित नागरिकत्व यामुळे प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. तत्कालीन प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये शासन कारभाराविषयीचे निर्णय घेण्यासाठी लोक निश्चित केलेल्या दिवशी आणि ठरविलेल्या ठिकाणी एकत्रित येत होते आणि विचारविनिमय करुन शासन कारभाराची ध्येयधोरणे ठरवित होते. ग्रीसमधील तसेच रोमन गणराज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. तसेच अथेन्स मधील नागरिक एकत्रितपणे शासन कारभाराचे धोरण ठरवत होते. प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनता स्वतः सक्रियपणे शासन कारभारात सहभाग घेत होती. तसेच शासन आणि जनता यांच्यामध्येही प्रत्यक्षपणे संबंध प्रस्थापित झालेले होते. जनता एकत्र येऊन सर्वांसाठी कायदे बनवीत होती आणि धोरण निश्चित करण्याची कार्य करीत होती.

थोडक्यात ज्या शासनपद्धतीत राज्यातील सर्व नागरिक शासन कारभारामध्ये प्रत्यक्षपणे सहभागी होतात, त्या शासनपद्धतीला प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. जीन जॅक रुसो या राजकीय विचारवंताने प्रत्यक्ष लोकशाहीचे समर्थन करून प्रत्यक्ष लोकशाही ही एक उत्तम शासनपद्धती असल्याचे म्हटलेले आहे. रुसो यांच्या मते, व्यक्ती दुसऱ्याचे प्रतिनिधित्व कदापिही करू शकत नाही, कारण व्यक्तीचे आचार-विचार, आकांक्षा तसेच प्रश्न प्रतिनिधींना निश्चितपणे समजू शकत नाहीत. म्हणूनच रूसो या विचारवंताने प्रत्यक्ष लोकशाहीचे समर्थन करत प्रत्येक व्यक्तीने शासन कारभारात प्रत्यक्षपणे सहभाग घेण्याचे समर्थन केलेले आहे. प्रत्यक्ष लोकशाहीत शासन कारभार प्रतिनिधीमार्फत चालवला न जाता जनता स्वतः शासन कारभारात सहभागी होत असते. प्रत्यक्ष लोकशाहीत नागरिक स्वतः निर्णय घेत होते. विविध प्रश्न व समस्यांवर स्वतः चर्चा करीत होते. प्रत्यक्ष लोकशाहीत जनता स्वतः राजकीय सहभागात सक्रिय असल्यामुळे ही एक उत्तम पद्धती मानली जात होती.

### २) अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाही (Representative Democracy):

प्राचीन काळात मर्यादित लोकसंख्या, मर्यादित भौगोलिक क्षेत्रफळ आणि मर्यादित नागरिकत्व यामुळे सर्व लोक एकत्र बसून चर्चा, विचारविनिमय करू शकत होते म्हणून या काळात प्रत्यक्ष लोकशाही शक्य होती. परंतु आधुनिक काळात वाढलेली लोकसंख्या, वाढलेले भौगोलिक क्षेत्रफळ आणि नागरिकत्वामध्ये झालेली वाढ यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीप्रमाणे सर्व लोकांना एकत्र बसून निर्णय घेता येणे शक्य नाही. आधुनिक काळात राष्ट्र राज्य निर्माण झाली. राष्ट्र राज्यांचा विस्तीर्ण भूप्रदेश, वाढती लोकसंख्या तसेच कल्याणकारी राज्याचा स्वीकार केल्यामुळे राज्याचे वाढलेले कार्यक्षेत्र या सर्व कारणांमुळे प्रत्यक्ष लोकशाही राबवणे जवळ-जवळ अशक्यच झाले आहे. म्हणून आधुनिक काळात प्रत्यक्ष लोकशाही शक्य नसल्यामुळे प्रातिनिधिक लोकशाहीचा पर्याय पुढे आलेला आहे. थोडक्यात प्रत्यक्ष लोकशाहीची संकल्पना निरुपयोगी ठरल्यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीची जागा आधुनिक काळात अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीने घेतलेली आहे. अप्रत्यक्ष लोकशाहीत जनता आपला प्रतिनिधी मतदानाद्वारे निवडून देते. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत जनता शासनात सहभागी होत असते, म्हणून या लोकशाहीला प्रातिनिधिक लोकशाही असे म्हणतात.

### ३) सहभागी लोकशाही (Participatory Democracy):

लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाहीची कल्पनाही करणे शक्य नाही. अरिस्टोटल या राजकीय विचारवंताने नागरिकत्वाची व्याख्या करताना म्हटले आहे की," जो राज्यकारभारात सहभागी होतो, तोच नागरिक." ॲरिस्टॉटल यांच्या या व्याख्येवरून नागरिक होण्यासाठी राज्यकारभारात सहभाग घेणे महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट होते. म्हणून या अर्थाने सहभागी लोकशाही नागरिकांचा सक्रिय राजकीय सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. थोडक्यात ज्या लोकशाहीत नागरिकांचा प्रत्यक्षपणे जास्तीत जास्त प्रमाणात राजकीय सहभाग असतो त्या लोकशाहीस सर्वसाधारणपणे सहभागी लोकशाही असे म्हणतात.

"लोकशाही म्हणजे राज्यकारभाराची अशी एक यंत्रणा असते की, ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो." लोकशाहीच्या या व्याख्यामधूनही लोकशाहीतील सहभागाचे महत्त्व अधोरेखित होते. लोकशाहीमध्ये सरकारला लोकांची केवळ मान्यता असून चालत नाही, तर त्यामध्ये लोकांचा सहभागही महत्त्वाचा असतो. म्हणून लोकशाहीमध्ये सहभागाची संकल्पना महत्त्वपूर्ण मानली जाते.

लोकशाही व्यवस्थेचा विकास होण्यापूर्वी राजकीय सहभाग हा काही व्यक्तीपुरता किंवा क्षेत्रापुरताच मर्यादित होता. परंतु काळाबरोबर लोकशाही व्यवस्थेचा विकास होत गेला तसे राजकीय सहभागाचे प्रमाण वाढत गेले. निवडणुकीची पद्धती, राजकीय पक्षपद्धतीचा झालेला विकास तसेच नवनवीन संसूचन माध्यमांमध्ये झालेला विकास यामुळे लोकशाहीतील सहभाग वाढत गेला. सहभागी लोकशाहीत लोकांचा राजकीय सहभाग हा केवळ मतदानापुरताच मर्यादित न राहता सभा-संमेलने, चर्चा, चळवळी, वाद-विवाद, निदर्शने, मतमतांतरे यासारख्या विविध माध्यमातून वाढत गेला. लोकशाहीमध्ये राजकीय सहभागाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. म्हणून लोकशाही राजकीय सहभागाची अत्यंत आवश्यकता असते. कारण लोकशाहीतील सहभागामुळे जनतेमध्ये सुस्पष्ट जाणीव निर्माण होत असतात, तसेच आत्मीयतेची भावनादेखील वाढीस लागते.

लोकशाहीच्या प्रत्येक प्रकारांमध्ये नागरिकांचा राजकीय सहभाग महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. लोकशाहीच्या काही प्रकारात जनतेचा सहभाग कमी प्रमाणात तर काही प्रकारात जनतेचा सहभाग अधिक प्रमाणात असलेला आपणास दिसून येतो. प्राचीन काळात प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग असला तरीही त्या सहभागाचे प्रमाण मात्र एका निश्चित मर्यादेमध्येच होते.

### ४) चर्चात्मक लोकशाही (Deliberative Democracy):

चर्चात्मक लोकशाही म्हणजे अशी लोकशाही की, ज्या लोकशाहीमध्ये सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विचारविनिमय, चर्चा अथवा संबंधित बाबींवर उहापोह करण्यावर अधिक भर दिला जातो. थोडक्यात चर्चात्मक लोकशाहीमध्ये सार्वजनिक हित साधण्यासाठी सार्वजनिकरित्या विचारविमर्श, चर्चा करण्यावर अधिकाधिक भर दिला जातो.

## २अ.३ प्रातिनिधिक लोकशाहीचे प्रकार:-

प्रत्यक्ष लोकशाहीला पर्याय म्हणून प्रातिनिधिक लोकशाही अस्तित्वात आली. प्रातिनिधिक लोकशाहीचे संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही असे दोन प्रकार आहेत.

**१) संसदीय लोकशाही (Parliamentary Democracy):**

ज्या लोकशाहीमध्ये जनता मतदानाद्वारे आपले प्रतिनिधी कायदेमंडळात निवडून देते आणि या प्रतिनिधींकडून कार्यकारी मंडळाची निवड होत असते त्या लोकशाहीला संसदीय लोकशाही असे म्हणतात.

संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळाची निवड ही विधिमंडळाच्या सदस्यांद्वारे होत असते. केंद्रीय विधिमंडळात ज्या राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत असेल त्या पक्षाचे मंत्रिमंडळ निर्माण होते. त्यामुळे संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यात परस्पर संबंध प्रस्थापित झालेला असतो. त्याचप्रमाणे संसदीय लोकशाहीत मंत्रिमंडळ आपल्या कार्याप्रती विधिमंडळाला सामूहिकरित्या जबाबदार असते. म्हणून एका मंत्र्याचे यश म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचे यश आणि एका मंत्र्याचे अपयश म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचे अपयश मानले जाते. थोडक्यात संसदीय लोकशाहीत निर्णय सामूहिकपणे घेतले जातात. जोपर्यंत मंत्रिमंडळावर विधिमंडळाचा विश्वास असतो, तोपर्यंतच मंत्रिमंडळाला अधिकार पदावर राहता येते, अन्यथा नाही. संसदीय लोकशाहीत नामधारी आणि वास्तविक असे दोन प्रकारचे कार्यकारी प्रमुख असतात. तसेच या लोकशाहीत विधिमंडळ मंत्रिमंडळाच्या इच्छेनुसार कार्य करीत असते. संसदीय लोकशाहीचे उदाहरण म्हणजे इंग्लंड, जपान व भारतातील संसदीय लोकशाही होय.

**२) अध्यक्षीय लोकशाही (Precidential Democracy):**

ज्या लोकशाहीमध्ये जनता प्रत्यक्षपणे मतदानाद्वारे आपले प्रतिनिधी कार्यकारी मंडळामध्ये निवडून देत असते, त्या लोकशाहीस अध्यक्षीय लोकशाही असे म्हणतात.

अध्यक्षीय लोकशाहीत कार्यकारी मंडळाची निवड ही विधिमंडळाच्या सदस्यांकडून होत नसते, तर ती जनतेकडून मतदानाद्वारे प्रत्यक्षपणे होत असते. म्हणजेच संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळाची निवड विधिमंडळाकडून होत असते तशी ती अध्यक्ष पद्धतीत होत नाही. अध्यक्षीय लोकशाहीत जनतेकडून अप्रत्यक्षपणे निवडला गेलेला प्रतिनिधी देशाचे अध्यक्षपद सांभाळत असतो. हा देशाचा अध्यक्ष म्हणजेच देशाचा वास्तविक शासन प्रमुख असतो. अध्यक्षीय लोकशाहीत संसदीय लोकशाहीप्रमाणे कार्यकारी प्रमुखाचे नामधारी आणि वास्तविक असे दोन प्रकार नसून अध्यक्ष हेच एकमेव वास्तविक शासन प्रमुख असतात. अध्यक्षीय लोकशाहीत अध्यक्ष हा कार्याप्रती विधिमंडळाला जबाबदार नसतो, त्यामुळे अध्यक्षांवर विधिमंडळाला अविश्वास व्यक्त करता येत नाही. त्याचप्रमाणे अध्यक्ष विधिमंडळाच्या कायदेविषयक कार्यात हस्तक्षेप करीत नाहीत. अध्यक्षीय लोकशाहीत अध्यक्ष हे आपल्या मर्जीनुसार विविध पदांवर अधिकाऱ्यांची नेमणूक करीत असतात. तसेच या लोकशाहीत कार्यकारीमंडळातील प्रत्येक मंत्री हा व्यक्तिगतरित्या अध्यक्षांना जबाबदार असतो. त्यामुळे अध्यक्ष मंत्र्यांच्या खात्यात बदल किंवा मंत्रिमंडळातून एखाद्याची

हाकालपट्टीही करू शकतात. अध्यक्षीय लोकशाहीचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेतील अध्यक्षीय लोकशाही होय.

### २अ.३.१ **संसदीय लोकशाहीची वैशिष्ट्ये:-**

प्रातिनिधिक लोकशाहीचा संसदीय लोकशाही अथवा शासनपद्धती हा एक लोकप्रिय प्रकार आहे. संसदीय शासनपद्धतीचा उदय आणि विकास हा इंग्लंडमध्ये झाला. म्हणून इंग्लंडला संसदीय लोकशाहीचे उगमस्थान म्हटले जाते. इंग्लंडनंतर संसदीय शासनपद्धतीचा प्रसार आणि प्रचार भारत, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फ्रान्स, जपान अशा जगातील अनेक राष्ट्रांमध्ये झाला. संसदीय लोकशाही म्हणजे अशी शासनपद्धती की, ज्या शासनपद्धतीमध्ये शासनाची वास्तविक सत्ता कायदेमंडळाला जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाच्या हाती असते. तसेच राज्यप्रमुख नाममात्र शासक असून तो जबाबदारीपासून पूर्णपणे मुक्त असतो. आधुनिक काळात संसदीय शासनपद्धती हा लोकशाहीचा प्रकार सर्वाधिक लोकप्रिय प्रकार म्हणून ओळखला जातो. अशा संसदीय शासनपद्धतीची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत;

**१) मंत्रिमंडळ कार्याप्रती विधिमंडळाला जबाबदार असते:**

संसदीय शासनपद्धतीमध्ये मंत्रिमंडळ हे आपल्या कार्याप्रती विधिमंडळाला सामूहिकरीत्या जबाबदार असते. त्यामुळे मंत्रीमंडळाचे कार्य सामूहिक जबाबदारीच्या तत्वानुसार चालत असते. साहजिकच सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वामुळे 'एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक' या तत्त्वानुसार एका मंत्र्याचे यश म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचे यश आणि एका मंत्र्याचे अपयश म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचे अपयश मानले जाते. संसदीय शासनपद्धतीत विधिमंडळाला विश्वासात घेऊन मंत्रिमंडळ कार्यरत असते. विविध खात्याच्या मंत्र्यांना त्यांच्या कार्याविषयी विधिमंडळात जाब विचारण्याचा अधिकार विधिमंडळाला आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ जबाबदारीच्या भावनेतून संसदीय शासनपद्धतीत कार्य करीत असते.

**२) शासन प्रमुखाचे दोन प्रकार:**

संसदीय शासनपद्धतीमध्ये दोन प्रकारचे कार्यकारी प्रमुख असतात. एक नाममात्र किंवा नामधारी कार्यकारी प्रमुख आणि दुसरे वास्तविक कार्यकारी प्रमुख. नाममात्र कार्यकारी प्रमुख हे त्या पदावर वंशपरंपरेने आलेले असो किंवा जनतेद्वारे निवडलेले असो, ते पंतप्रधान व त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या इच्छेनुसार कार्य करीत असतात. संसदीय लोकशाहीत नाममात्र कार्यकारी प्रमुखाकडे सत्ता सोपवलेली असली तरी त्या सत्तेचा वापर मात्र ते मंत्रिमंडळाच्या इच्छेनुसार वा सल्ल्यानुसार करीत असतात. या शासनपद्धतीत पंतप्रधान व मंत्रिमंडळ हेच वास्तविक कार्यकारी प्रमुख असल्यामुळे शासनविषयक सत्तेचा वापर तेच करीत असतात. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये नाममात्र आणि वास्तविक कार्यकारी प्रमुख असे कार्यकारी प्रमुखाचे दोन प्रकार अस्तित्वात असतात.

**३) मंत्रिमंडळाचा कार्यकाल अनिश्चित असतो:**

संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळाचा कार्यकाल सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा असला तरी कार्यकाळाची निश्चित शाश्वती नसते. कारण या लोकशाहीमध्ये जोपर्यंत मंत्रिमंडळावर विधिमंडळाचा विश्वास आहे, तोपर्यंतच ते अधिकार पदावर राहू शकतात. म्हणजेच

मंत्रिमंडळावर या लोकशाहीत विधिमंडळ अविश्वास व्यक्त करू शकत असल्यामुळे मंत्रिमंडळाला कार्यकाळाची शाश्वती नसते. विधिमंडळाने अविश्वास ठराव बहुमताने मंजूर केल्यास मंत्रिमंडळाला अधिकार पदावरून पायउतार व्हावे लागते. म्हणून संसदीय लोकशाहीत मंत्रिमंडळाचा कार्यकाल अनिश्चित स्वरुपाचा असतो.

**४) शांततेच्या मार्गाने परिवर्तन:**

संसदीय लोकशाहीत विशिष्ट कालावधीनंतर स्वच्छ वातावरणात निवडणुका घेतल्या जातात. या निवडणुकीत जनता मताधिकाराद्वारे आपला प्रतिनिधी निवडून देत असते. आपला प्रतिनिधी निवडताना मतदारांवर कोणतेही दडपण नसते. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींमधूनच देशाचे पंतप्रधान व मंत्रिमंडळाची नियुक्ती होते. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये लोकमताच्या आधारावर सरकार शांततेच्या मार्गाने स्थापन होत असते. म्हणून संसदीय लोकशाहीत होणारे परिवर्तन कोणत्याही प्रकारची हिंसा, रक्तपाताशिवाय म्हणजेच शांततेच्या मार्गाने होते. निवडून आलेल्या शासनाला संसदीय लोकशाहीत जनहिताचे निर्णय घेऊन कार्य करावी लागतात, अन्यथा येणाऱ्या निवडणुकीत मतदानाद्वारे जनता राजकीय सत्तेत शांततेच्या मार्गाने परिवर्तन करू शकते.

**५) कायदेमंडळ -कार्यकारी मंडळ यांच्यातील घनिष्ठ संबंध:**

संसदीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळामध्ये घनिष्ठ संबंध प्रस्थापित झालेले असतात. कारण मंत्रीमंडळांमधील प्रत्येक सदस्य हा कायदेमंडळाचाही सदस्य असतो. संसदीय शासनपद्धतीत संसदेमध्ये ज्या पक्षाचे स्पष्ट बहुमत असेल त्या पक्षाच्या नेत्याची निवड पंतप्रधान म्हणून केली जाते आणि पंतप्रधान संसदेच्या सदस्यांमधूनच मंत्रीमंडळाच्या सदस्यांची नियुक्ती करित असतात. थोडक्यात मंत्रिमंडळाचे सदस्य हे विधिमंडळाचे सदस्य असतात. एखादा मंत्री मंत्रीपदाची शपथ घेताना विधिमंडळाचा सदस्य नसल्यास शपथ घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत विधिमंडळ सदस्य होणे आवश्यक असते. थोडक्यात संसदीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ विशेषतः मंत्रिमंडळ यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध प्रस्थापित झालेले असतात.

**६) पंतप्रधानांचे एकमुखी नेतृत्व:**

संसदीय शासनपद्धतीमध्ये मंत्रिमंडळाने पंतप्रधानांचे एकमुखी नेतृत्व मान्य केलेले असते. पंतप्रधान हे मंत्रिमंडळाचे प्रमुख असतात. मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीच्या अध्यक्षस्थानी पंतप्रधान असतात. पंतप्रधान मंत्रिमंडळातील मंत्र्यांची नियुक्ती आणि त्यांचे खातेवाटपही करीत असतात. मंत्रिमंडळातील एखाद्या मंत्र्याचे पंतप्रधानांशी मतभेद निर्माण झाल्यास त्या मंत्र्याला मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागतो किंवा पंतप्रधान त्या मंत्र्याला मंत्रिमंडळातून काढून टाकतात. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये पंतप्रधान हे पद केंद्रस्थानी असून पंतप्रधानांभोवती संपूर्ण मंत्रिमंडळ फिरत असते, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

**७) राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची:**

संसदीय लोकशाहीत राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. कारण ज्या राजकीय पक्षाचे संसदेमध्ये जास्त लोकप्रतिनिधी असतील, त्या राजकीय पक्षाचे सरकार निर्माण होत

असते आणि इतर राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी संसदेत विरोधी पक्षाची भूमिका पार पाडत असतात. संसदीय लोकशाहीत राजकीय पक्ष मग तो सत्ताधारी असो किंवा विरोधी पक्षातील त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष सरकारचे दोष दाखवून सरकारने योग्य मार्गाने राज्यकारभार करावा यासाठी कार्यतत्पर असतो. विरोधी पक्ष सरकारच्या हुकूमशाही प्रवृत्तीला आळा घालण्याचे कार्य करीत असतो. थोडक्यात संसदीय लोकशाहीत राजकीय पक्षांची भूमिका खूपच महत्त्वपूर्ण असते.

**८) जनमताचा आदर:**

संसदीय लोकशाहीमध्ये सरकारची स्थापना जनमताच्या आधारावर होत असते. सरकारने जनमताची अवहेलना केल्यास त्यांना आगामी निवडणुकीत जनमताच्या आधारे जनता पदावरून दूरही करू शकते. म्हणून संसदीय लोकशाहीत सरकारची निर्मिती आणि परिवर्तन या बाबी जनमतावर आधारित घडत असल्यामुळे संसदीय लोकशाहीत जनमताचा आदर केला जातो.

## २अ.३.२ संसदीय लोकशाहीचे गुण:-

संसदीय लोकशाही हा शासन प्रकार आधुनिक काळात लोकप्रिय ठरण्यापाठीमागे या लोकशाहीत असणाऱ्या खालील गुणांचा समावेश आहे;

**१) जबाबदार शासनपद्धती:**

संसदीय लोकशाही शासनपद्धती ही जबाबदारी शासनपद्धती आहे. कारण या शासनपद्धतीत जोपर्यंत कायदेमंडळाचा मंत्रिमंडळावर विश्वास आहे, तोपर्यंतच मंत्रिमंडळ अधिकार पदावर राहू शकते, मंत्रिमंडळाने कायदेमंडळाचा विश्वास गमावताच मंत्रिमंडळाला पदावरून पायउतार व्हावे लागते. म्हणजेच संसदीय लोकशाही शासनपद्धतीत मंत्रिमंडळ हे आपल्या कार्याप्रती कायदेमंडळाला सामूहिकरीत्या जबाबदार राहत असल्यामुळे अथवा मंत्रिमंडळाला ह्या जबाबदारीची जाणीव असल्यामुळे मंत्रिमंडळ प्रत्येक कार्य विचारपूर्वक आणि जबाबदारीपूर्वक पार पाडत असते. या जबाबदारीच्या जाणिवेतून मंत्रिमंडळ हुकूमशाही वृत्तीने न वागता जनहिताच्या दृष्टीने कार्य करीत असते.

**२) विरोधी विचारांचा आदर:**

संसदीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी हे विरोधी विचारांचा आदर करीत असतात. या लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची असते. कारण विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर वेळोवेळी जी टीका करीत असतो किंवा विरोधी पक्षाकडून ज्या सूचना केल्या जात असतात, त्यांचा विचार सत्ताधारी करीत असतात. या शासनपद्धतीमध्ये विरोधी पक्षनेत्याला मंत्रिपदाचा दर्जा दिला जातो. यावरून या लोकशाहीत विरोधी पक्षाचा वा विचारांचा किती आदर केला जातो, ही बाब स्पष्ट होते. या शासनपद्धतीत देश संकटकाळात असताना सत्ताधारी पक्ष हा विरोधी पक्षाच्या नेत्यांना व त्यांच्या विचारांना विश्वासात घेऊन कार्य करतात. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा आणि त्यांच्या विचारांचा आदर केला जातो.

**३) परिस्थितीनुसार बदल:**

संसदीय शासनपद्धतीमध्ये परिस्थितीनुसार बदल करता येतो. मंत्र्यांच्या खात्यामध्ये अदलाबदली करणे किंवा नवीन मंत्र्यांना मंत्रिमंडळात सामावून घेणे, या शासन पद्धतीत शक्य होते. या शासनपद्धतीत विशेष परिस्थितीमध्ये मंत्रिमंडळाच्या सत्तेमध्ये वाढही करता येते आणि परिस्थिती पूर्ववत होताच मंत्रिमंडळाला दिलेली वाढती सत्ता काढूनही घेता येते. संसदीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळाचा किंवा कार्यकारी मंडळातील सदस्यांचा कार्यकाल निश्चित नसल्यामुळे वेळेनुसार आणि काळानुसार त्यामध्ये परिवर्तन करता येते. उदाहरणार्थ इंग्लंडमध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चेंबरलेन यांच्याऐवजी विन्स्टन चर्चिल यांची पंतप्रधान म्हणून निवड करण्यात आलेली होती. संसदीय लोकशाहीत असणारी ही परिवर्तनशीलता अध्यक्षीय लोकशाहीमध्ये शक्य नसते, म्हणून संसदीय लोकशाही या परिवर्तनशीलतेमुळे जास्त उपयुक्त ठरली आहे.

**४) मंत्रिमंडळ व विधिमंडळात परस्पर सहकार्य:**

संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळ आणि विधिमंडळ यांच्यामध्ये घनिष्ठ स्वरूपाचे संबंध प्रस्थापित झालेले असतात. विधिमंडळ सदस्यांमधूनच मंत्रिमंडळाची निर्मिती या लोकशाहीमध्ये केली जाते. त्यामुळे मंत्रिमंडळ आणि विधिमंडळ परस्पर सहकार्याने शासनविषयक कार्य करीत असतात. कायदा निर्माण करणे हे जरी विधीमंडळाचे कार्य असले तरी कायदा निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती किंवा ज्ञान हे पूर्णपणे विधिमंडळ सदस्यांकडे असतेच असे नाही. म्हणून विधिमंडळ सदस्यांना मंत्रीमंडळामार्फत कायदा निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती पुरवली जाते, त्यामुळे कायदा निर्मितीचे कार्य उत्तम प्रकारे पार पाडले जाते. तसेच मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांना विधिमंडळाची मान्यता मिळणे या लोकशाहीत आवश्यक असते. थोडक्यात मंत्रीमंडळाने मंजूर केलेले शासकीय धोरण, विविध निर्णय, अंदाजपत्रक यांनादेखील विधिमंडळाची मान्यता आवश्यक असते. अशाप्रकारे संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळ आणि कायदेमंडळ यांच्यामधील परस्पर सहकार्यामुळे शासन कारभार व्यवस्थितपणे चालत असतो. पर्यायाने या दोघांमध्ये संघर्ष निर्माण होत नाही.

**५) योग्य आणि अनुभवी व्यक्तीचे शासन:**

संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळावर महत्त्वाची जबाबदारी असते. म्हणून मंत्रिमंडळातील मंत्री हे कार्यक्षम, योग्य, पात्र आणि अनुभवी असणे आवश्यक असते. कारण अकार्यक्षम आणि अयोग्य मंत्र्यावर संसदेत आणि संसदेबाहेरही टीका होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून संसदीय लोकशाहीमध्ये अशाच सदस्यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश करण्यात येतो की जे कार्यक्षम, योग्य, अनुभवी आणि पात्र असतील. मंत्री कार्यक्षम, योग्य, पात्र असल्यास ते त्यांची जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडू शकतात. संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रीमंडळाचा सदस्य होण्यासाठी कोणतीही शैक्षणिक पात्रता आवश्यक मानली जात नसली, तरी मंत्रीपदावर येणारी व्यक्ती राजकीय तसेच सार्वजनिक जीवनात दीर्घ अनुभवी असतात. अशा अनुभवी व्यक्तींचा फायदा संसदीय लोकशाही शासनपद्धतीमध्ये जनहिताचे निर्णय घेताना होत असतो.

अशाप्रकारे संसदीय लोकशाहीमध्ये विविध गुण असल्यामुळे ही शासनपद्धती जास्तीत जास्त देशांमध्ये स्वीकारण्यात आलेली आहे.

### २अ.३.३ संसदीय लोकशाहीमधील दोष अथवा उणीवा:-

संसदीय लोकशाही आधुनिक काळात लोकप्रिय ठरलेली असली तरीदेखील या लोकशाहीमध्ये काही दोष किंवा उणीवा आढळून येतात त्या पुढीलप्रमाणे;

### १) बहुमत असलेल्या सत्ताधारी पक्षाची हुकूमशाही:

संसदीय लोकशाहीमध्ये विधिमंडळात ज्या पक्षाला स्पष्ट बहुमत असते त्या पक्षाचे सरकार सत्तारूढ होत असते. या लोकशाहीत बहुमताला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे मंत्रिमंडळ आपल्या बहुमताच्या जोरावर आपल्या सोयीचे कायदे आणि प्रस्ताव मंजूर करून घेत असते. कायदे करत असताना सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर विरोधी पक्षांच्या सूचनांकडे वा प्रस्तावांकडे फारसे लक्ष देताना दिसत नाही. परिणामी संसदीय लोकशाहीत एकप्रकारे बहुमत प्राप्त झालेल्या सत्ताधारी पक्षाची हुकूमशाहीच प्रस्थापित होत असते.

### २) अस्थिर शासनाचा धोका:

संसदीय लोकशाहीमध्ये जोपर्यंत पंतप्रधान आणि त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळावर संसदेचा विश्वास आहे, तोपर्यंतच ते अधिकार पदावर राहू शकतात. विधिमंडळाने पंतप्रधानांसह मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केल्यास त्याचक्षणी मंत्रिमंडळ पंतप्रधानांसह पायउतार होत असते. प्रत्येक वेळी एकाच राजकीय पक्षाला कायदेमंडळात स्पष्ट बहुमत मिळणे शक्य नसते. अशावेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्ष एकत्र येऊन त्यांच्या सहकार्याने संयुक्त मंत्रिमंडळ तयार होत असते. परंतु अशा संयुक्त मंत्रिमंडळाचे भवितव्य निश्चित नसते. राजकीय पक्ष परस्परांवर कुरघोडीचे राजकारण करत असल्यामुळे व्यवहाराहात अशा संयुक्त मंत्रिमंडळाला स्थैर्य लाभणे शक्य नसते. त्यामुळे संसदीय लोकशाहीत असे संयुक्त मंत्रिमंडळ बनल्यास त्या मंत्रिमंडळाचा बराचसा कालावधी परस्परांची मनधरणी करण्यामध्ये खर्च होतो. परिणामी असे मंत्रिमंडळ जनहित व देशहित साध्य करण्यासाठी कोणताही दीर्घकालीन निश्चित कार्यक्रम वा धोरण ठरवू शकत नाही. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळापुढे अस्थिरतेची टांगती तलवार सदैव असते. त्यामुळे असे अस्थिर शासन कोणतेही चांगले कार्य करू शकत नाही.

### ३) मंत्रिमंडळाच्या हुकुमशाहीचा धोका:

संसदीय लोकशाहीमध्ये केवळ विधीमंडळात बहुमत असलेल्या पक्षाचीच हुकूमशाही नसते तर सत्ताधारी पक्षाबरोबरच मंत्रिमंडळाचीदेखील हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका असतो. कारण ज्या नेत्याचे राजकीय पक्षांमध्ये राजकीय वजन जास्त असते, त्यांचीच निवड मंत्रिमंडळामध्ये प्रामुख्याने होत असते. परिणामी पक्षातील आणि मंत्रिमंडळातील असे वजनदार सदस्य पक्षशिस्तीच्या नावाखाली विधीमंडळातील इतर सामान्य सदस्यांवर नियंत्रण ठेवीत असतात. विधिमंडळाच्या सर्वसाधारण सदस्यांना कायदा निर्मितीची प्रक्रिया त्याच पद्धतीने शासनविषयक कार्यातील गुंतागुंत सहजासहजी उमजत नाही. परिणामी असे विधिमंडळ सदस्य मंत्रीमंडळाने तयार केलेल्या प्रस्तावास आढेवेढे न घेता सरळ-सरळ

मान्यता देऊन मोकळे होतात. यामुळे एकप्रकारे मंत्रिमंडळाची हुकूमशाही प्रस्थापित होतांना दिसते. थोडक्यात वजनदार राजकीय नेत्यांचा प्रभाव, पक्ष शिस्तीचा दाखवला जाणारा धाक आणि कायदे निर्मितीसाठीच्या आवश्यक ज्ञानाचा विधिमंडळ सदस्यांकडे असणारा अभाव इ. कारणांमुळे संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळाची हुकूमशाही प्रस्थापित होण्याचा धोका निर्माण होतो.

**४) सत्ताविभाजन सिद्धांताच्या विरोधी:**

प्रसिद्ध राजकीय विचारवंत मोन्टेस्क्यू यांनी सत्ताविभाजनाच्या सिद्धांतात म्हटलेले आहे की," कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे तीन अंग परस्परांपासून स्वतंत्र राहिल्यास नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण होते." सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार संसदीय लोकशाहीचा विचार केल्यास या लोकशाहीमध्ये कायदेमंडळ-कार्यकारी मंडळ यांच्यातील परस्पर घनिष्ठ संबंधामुळे सत्ता विभाजन सिद्धांताला तिलांजली दिली जाते. वास्तवात कायदे निर्माण करणे, हे कार्य कायदेमंडळाचे असले तरीदेखील संसदीय लोकशाहीमध्ये हे कार्य बहुतांश करून कार्यकारी मंडळ अर्थात मंत्रिमंडळच करतांना दिसते. त्यामुळे या लोकशाहीत मंत्रिमंडळ सत्ताधारी पक्षाच्या धोरणाला अनुसरूनच विधीनियमांची निर्मिती करतांना आढळून येते. थोडक्यात या शासनपद्धतीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यामध्ये सत्ताविभाजनाला स्थान नसल्याचे दिसून येते. तसेच न्यायमंडळदेखील कायदेमंडळाने केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळाने केलेली कृती संविधानबाह्य असल्यास ती रद्द करते. म्हणजेच या शासनपद्धतीत न्यायमंडळ, कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या कार्यात हस्तक्षेप करीत असते. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ परस्परांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करतांना दिसून येतात, ही बाब सत्ताविभाजन सिद्धांताच्या विरोधी असल्याचे स्पष्ट होते.

**५) भ्रष्टाचाराला वाव:**

संसदीय लोकशाहीमध्ये ज्या पक्षाला कायदेमंडळात स्पष्ट बहुमत असते, त्या पक्षाचे सरकार स्थापन होते. म्हणून प्रत्येक राजकीय पक्ष कायदेमंडळात स्पष्ट बहुमत प्राप्त करण्यासाठी धडपडत असतो. परंतु एखाद्यावेळी कायदेमंडळात कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त नसल्यास अशावेळी अनेक पक्ष एकत्र येऊन संयुक्त मंत्रीमंडळ स्थापन करतात. अनेक पक्ष एकत्र येऊन स्थापन झालेले मंत्रिमंडळ अस्थिरतेचे झोके घेत असते. म्हणून अशा अस्थिर मंत्रिमंडळाला सहभागी सर्व राजकीय पक्षांचा कायम पाठिंबा राहावा यासाठी राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींना विविध आमिषं दाखवली जातात. परिणामी अशा मंत्रिमंडळात अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढण्याचा धोका उत्पन्न होतो.

**६) पक्षीय भावनेतून राष्ट्रहितिकडे दुर्लक्ष:**

संसदीय लोकशाहीमध्ये कायदेमंडळात ज्या राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होत असते तो राजकीय पक्ष सत्ताधारी पक्ष म्हणून कार्य करीत असतो. तर ज्या राजकीय पक्षांना बहुमत प्राप्त होत नाही, असे राजकीय पक्ष विरोधी पक्ष म्हणून कायदेमंडळात कार्य करीत असतात. सत्ताधारी राजकीय पक्ष बहुमताच्या जोरावर हवे ते ठराव किंवा कायदे मंजूर करुन घेत असतात. ठराव किंवा कायदे मंजूर करून घेत असतांना सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षांच्या

सूचनांकडे दुर्लक्ष करतात. म्हणजेच सत्ताधारी पक्ष सत्तेच्या धुंदीत वावरत असतो. परिणामी विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही प्रस्तावाला विरोधासाठी विरोध करत असतो, वास्तवात तो प्रस्ताव चांगला असो वा वाईट. तसेच विरोधी पक्ष सतत सत्ताधारी पक्षाला टीकेच्या धारेवर धरत असतात. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही प्रस्तावाचे वा कायद्याचे मूल्यमापन त्या कायद्याच्या योग्य-अयोग्यतेच्या आधारावर न करता पक्षीय दृष्टिकोनातून करीत असतात. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्ष हा सत्तेच्या मस्तीमध्ये दंग असतो, तर विरोधी पक्ष हा केवळ विरोधासाठी विरोध करत सत्तारुढ पक्षाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असतो. परिणामी संसदीय लोकशाहीत सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पक्षीय भूमिका व दृष्टिकोनामुळे राष्ट्रहित तसेच जनहिताकडे दुर्लक्ष होते.

**७) निर्णयास विलंब:**

संसदीय लोकशाहीमध्ये शासनाची वास्तविक सत्ता पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या हाती असते. पंतप्रधान हे मंत्रिमंडळाचे प्रमुख असले तरीही ते स्वेच्छनुसार कोणताही निर्णय एकटे घेऊ शकत नाहीत, तर त्यासाठी पंतप्रधानांना सहकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घ्यावा लागतो. म्हणजेच कोणतेही शासकीय धोरण ठरवत असतांना पंतप्रधानांना मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांच्या सूचना विचारात घ्याव्या लागतात. तसेच सत्ताधारी राजकीय पक्षाच्या प्रमुखाची भूमिकाही धोरण ठरवतांना विचारात घ्यावी लागते. परिणामी शासकीय धोरण ठरवण्यात व निर्णय घेण्यात विलंब होतो.

**८) लोकशाहीची जागा नोकरशाही घेण्याचा धोका:**

संसदीय लोकशाहीमध्ये शासनाची वास्तविक सत्ता ही पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या हाती असते. परंतु मंत्रिमंडळातील समावेशाबाबत संसदीय लोकशाहीत कायदेमंडळाची सदस्यता याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची विशेष पात्रता ठरवण्यात आलेली नाही. परिणामी मंत्रिमंडळात ज्यांचा समावेश केला जातो ते मंत्रीपद सांभाळण्यास लायक आणि पात्रताधारक असतीलच असे नाही. तसेच मंत्रिमंडळामध्ये खातेवाटप करतांना राजकीय पक्षातील त्या व्यक्तीचे वजन लक्षात घेतले जाते. म्हणजेच राजकीयदृष्ट्या वजनदार असणाऱ्यांचा समावेश मंत्रिमंडळामध्ये होत असतो. याशिवाय ज्या राजकीय व्यक्तीमुळे मंत्रिमंडळाला जास्त काळ स्थिरता लाभेल अशाच व्यक्तींचा समावेश सर्वसाधारणपणे मंत्रिमंडळात केला जातो. मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती होते, ते आपल्या खात्याबाबत सजग आणि ज्ञानी असतातच असे नाही. परिणामी असे मंत्री महोदय केवळ राजकीय कार्यात व्यस्त राहतात, त्यामुळे स्वतःच्या खात्याकडे किंवा प्रशासनाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. परिणामी त्या खात्याचे धोरण ठरवण्याची सर्व सूत्रे ही प्रशासक वर्गाकडे जातात. अशा प्रशासक वर्गाला जनतेच्या भावनांची कदर असतेच असे नाही. म्हणून संसदीय लोकशाहीत अज्ञानी लोकांचा भरणा वाढल्यामुळे लोकशाहीची जागा नोकरशाही घेण्याचा धोका निर्माण होतो.

अशाप्रकारे संसदीय लोकशाहीत वरील काही उणीवा अथवा दोष आढळून येत असले तरी या दोषांवर मात करीत जगातील अनेक देशात संसदीय लोकशाही कार्यरत आहे. इंग्लंड, भारत, जपान, ऑस्ट्रेलिया अशा जगातील विविध देशांमध्ये संसदीय लोकशाही सक्षमपणे कार्यरत असलेली दिसून येते.

## २अ.३.४ अध्यक्षीय लोकशाहीची वैशिष्ट्ये:-

प्रातिनिधिक लोकशाहीचा अध्यक्षीय लोकशाही अथवा शासनपद्धती हा एक महत्त्वाचा प्रकार आहे. अध्यक्षीय लोकशाही म्हणजे अशी शासनपद्धती की, 'ज्या शासनपद्धतीमध्ये राष्ट्रप्रमुख हा शासनाचा तसेच राष्ट्राचा प्रमुख असून तोच वास्तविक कार्यकारी प्रमुख असतो.' अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ स्वतंत्रपणे कार्य करतात. म्हणजेच मोन्टेस्क्यूच्या सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ परस्परांपासून स्वतंत्रपणे कार्य करीत असतात. त्याचप्रमाणे अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाचा कार्यकाल देखील निश्चित असतो. या लोकशाहीत जनतेकडून निवडून देण्यात आलेला कार्यकारी मंडळाचा प्रमुख म्हणजेच राष्ट्राध्यक्ष हा कायदेमंडळाला जबाबदार नसतो. तसेच कायदेमंडळाला राष्ट्राध्यक्षांवर अविश्वास व्यक्त करता येत नाही. त्याचप्रमाणे या लोकशाहीत राष्ट्रपती व त्यांच्या मंत्रिमंडळाला कायदे मंडळाचे सदस्य प्रश्न वा जाब विचारू शकत नाहीत. सर्वसाधारणपणे असे स्वरूप असणाऱ्या अध्यक्षीय लोकशाहीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत;

### १) कार्यकारी मंडळाचा निश्चित कार्यकाल:

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा निश्चित असतो. अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्षांची निवड झाल्यानंतर त्यांना त्यांचा निश्चित कार्यकाल पूर्ण होईपर्यंत त्या पदावरून सहजासहजी दूर करता येत नाही. विशिष्ट प्रसंगी राष्ट्राध्यक्षांना पदावरून दूर करण्यासाठी महाभियोगाच्या कार्यपद्धतीची तरतूद अध्यक्षीय लोकशाहीत असली तरी या प्रक्रियेचा सहजासहजी कायदेमंडळ वापर करू शकत नाही. कारण ही महाभियोगाची कार्यपद्धती अतिशय कठीण आणि गुंतागुंतीची असते. संसदीय लोकशाहीत ज्याप्रमाणे कायदेमंडळ कार्यकारी मंडळावर अविश्वास व्यक्त करून मंत्रिमंडळाला पदावरून पायउतार होण्यास भाग पाडत असते, त्याप्रमाणे अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळ राष्ट्राध्यक्षांवर अविश्वास प्रस्ताव दाखल करून राष्ट्राध्यक्षांना पदावरून पायउतार करू शकत नाहीत. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत कार्यकारी मंडळाचा अर्थात राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाल निश्चित असतो.

### २) राष्ट्राध्यक्ष  वास्तविक कार्यकारी प्रमुख:

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळाची कार्यकारी सत्ता ही राष्ट्राध्यक्षांच्या हातामध्ये एकवटलेली असते. याचाच अर्थ या लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष हेच कार्यकारी मंडळाच्या वास्तविक सत्तेचा वापर करीत असतात. या लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष आपल्या इच्छेनुसार विविध पदांवर अधिकाऱ्यांची नेमणूक करीत असतात. अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्षांना त्यांच्या कार्यामध्ये सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ कार्यरत असले तरी मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्राध्यक्षांना बंधनकारक नसतो. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत संविधानाने दिलेल्या सर्व अधिकारांचा वापर राष्ट्राध्यक्ष करीत असल्यामुळे तेच वास्तविक शासन प्रमुख असतात.

**३) मंत्रिमंडळावर राष्ट्राध्यक्षांचे वर्चस्व:**

अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्षांना त्यांच्या कार्यकारीविषयक कार्यामध्ये मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ असते. मंत्रीमंडळाचे कार्य राष्ट्राध्यक्षांना सल्ला देणे हे जरी असले तरी मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला मात्र राष्ट्राध्यक्षांना बंधनकारक नसतो. त्याचप्रमाणे या लोकशाहीत मंत्रिमंडळ हे आपल्या कार्याप्रती राष्ट्राध्यक्षांना जबाबदार असते. या लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष मंत्रिमंडळातील सदस्यांना केव्हाही बाहेरचा रस्ता दाखवू शकतात किंवा वाटेल त्या सदस्याची मंत्रिमंडळात नव्याने नेमणूक करू शकतात. म्हणजेच मंत्रिमंडळातील एखाद्या मंत्र्याने अयोग्य कार्य केल्यास राष्ट्राध्यक्ष त्याठिकाणी इतर व्यक्तीची मंत्री म्हणून नेमणूक करू शकतात. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत मंत्रिमंडळावर पूर्णपणे राष्ट्राध्यक्षांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे एकप्रकारे मंत्रिमंडळ दुर्बल बनलेले असते.

**४) सत्ताविभाजन आणि सत्ता संतुलन:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये मोन्टेस्क्यू या विचारवंताने प्रतिपादन केलेला सत्ताविभाजनाचा सिद्धांत प्रत्यक्षपणे अंमलात आणला जातो. या लोकशाहीमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे तीनही अंग परस्परांपासून अधिकाधिक स्वतंत्र ठेवण्यात आलेले आहेत. या लोकशाहीत कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाचे कार्य स्वतंत्रपणे सुरू असते. मात्र असे असले तरीही न्यायमंडळ कायदेमंडळाने केलेल्या कायद्यांची आणि कार्यकारी मंडळाच्या कृतीची वैध-अवैधता तपासत असते. यातून न्यायमंडळ सत्ता संतुलित करण्याचा प्रयत्न करीत असते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीमध्ये सत्ता विभाजन आणि सत्ता संतुलन या दोन्ही बाबी आढळून येतात.

**५) कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाचे कार्य स्वतंत्रपणे चालते:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ परस्परांपासून स्वतंत्रपणे कार्य करीत असतात. या लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष किंवा मंत्रिमंडळातील मंत्री कायदेमंडळाच्या कामकाजात सहभाग घेत नाहीत. त्याचप्रमाणे कायदेमंडळाचे सदस्यदेखील राष्ट्राध्यक्ष किंवा मंत्रीमंडळातील मंत्र्यांना प्रश्न विचारू शकत नाहीत. मंत्रिमंडळामध्ये राष्ट्राध्यक्षांनी कायदेमंडळातील सदस्यांचीच नियुक्ती करण्याचे बंधन या शासनपद्धतीत नसते, म्हणून सर्वसाधारणपणे कायदेमंडळाच्या बाहेरील व्यक्तींची मंत्री म्हणून मंत्रिमंडळात वर्णी लागत असते. कायदेमंडळाद्वारे कायदा निर्मितीचे कार्य स्वतंत्रपणे सुरू असते. त्याचप्रमाणे राष्ट्राध्यक्षांना अनुकूल ठरणारे विधेयक मंजूर करण्याचे कोणतेही बंधन कायदेमंडळावर नसते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध नसतात, तसेच मंत्रिमंडळाचे सदस्य हे कायदे मंडळाचे सदस्य नसतात. म्हणजेच या लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ हे परस्परांपासून स्वतंत्र असतात.

अशाप्रकारे अध्यक्षीय लोकशाहीचे काही ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात.

**२अ.३.५ अध्यक्षीय लोकशाहीचे गुण:-**

अध्यक्षीय लोकशाहीत खालील गुण दिसून येतात;

**१) संकटकाळात उपयुक्त:**

अध्यक्षीय लोकशाही ही शासनपद्धती संकटकाळात अतिशय उपयुक्त ठरते. कारण या लोकशाहीमध्ये राष्ट्राध्यक्ष हे वास्तविक शासनप्रमुख असून त्यांच्याच हाती सर्व सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष त्वरित निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करीत असतात. पर्यायाने ही शासनपद्धती संकटकाळात उपयुक्त ठरताना दिसते. तसेच अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्षांनी दिलेले आदेश मंत्रिमंडळातील मंत्री किंवा प्रशासक वर्ग नाकारू शकत नाही. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाही हा शासन प्रकार सत्तेच्या एककेंद्रामुळे आणि निर्णयांच्या त्वरित अंमलबजावणीमुळे संकट काळासाठी अतिशय उपयुक्त ठरतो.

**२) स्थिरता:**

अध्यक्षीय लोकशाही शासन हे स्थिर असते. कारण या लोकशाहीत कार्यकारी मंडळाचा कार्यकाल निश्चित असतो. या लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष हे आपल्या कार्याप्रती कायदेमंडळाला जबाबदार नसतात. त्यामुळे कायदे मंडळाचे राष्ट्राध्यक्षांवर कोणतेही नियंत्रण नसते, तसेच कायदेमंडळाकडून अविश्वास व्यक्त करण्याची टांगती तलवारही राष्ट्राध्यक्षांवर नसते. त्यामुळे सहाजिकच शासनाला स्थैर्य लाभते. परिणामी शासनाला दीर्घकालीन आणि परिणामकारक अशा योजना आणि शासकीय धोरण निश्चित करता येते आणि त्याची अंमलबजावणीही करता येते. तसेच या लोकशाहीत स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणाची आखणी व अंमलबजावणी केली जाते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत शासन हे स्थिर असते.

**३) राजकीय पक्षाच्या प्रभावापासून मुक्त लोकशाही:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाल निश्चित असतो. या लोकशाहीत त्यामुळे राष्ट्राध्यक्षांना विरोधी राजकीय पक्षांच्या विरोधाची, दबावाची किंवा टीकेची पर्वा नसते. या लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांवर राष्ट्राध्यक्षांचा प्रभाव दिसून येतो. याउलट संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळाला विरोधी पक्षांचा धाक असतो. तसेच मंत्रिमंडळाचा बराचसा वेळही पक्षीय राजकारणात जातो. मात्र अध्यक्षीय लोकशाहीत अशाप्रकारची भीती राष्ट्राध्यक्ष किंवा मंत्रिमंडळाला नसते. अशाप्रकारे या लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष आणि मंत्रिमंडळ पक्षीय प्रभावापासून मुक्त असल्यामुळे ते आपले पूर्ण लक्ष शासनकार्यावर केंद्रित करत असते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाही राजकीय पक्षांच्या प्रभावापासून मुक्त असल्यामुळे कार्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होते.

**४) शासनाची कार्यक्षमता:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये राष्ट्राध्यक्ष हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात. तसेच त्यांचा कार्यकालही निश्चित असतो. राष्ट्राध्यक्ष कायदेमंडळालाही जबाबदार नसतात. त्यामुळे कार्यकारीविषयक कार्याची पूर्ण जबाबदारी राष्ट्राध्यक्षांची असल्यामुळे ते ती जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडीत असतात. राष्ट्राध्यक्षांना मंत्रिमंडळातील सदस्यांची नियुक्ती करताना पूर्ण स्वातंत्र्य असते, त्यामुळे कार्यक्षम शासनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यक्षम, बुद्धिमान, तज्ज्ञ आणि पात्रताधारक व्यक्तींची मंत्री म्हणून ते निवड करतात. त्याचप्रमाणे या लोकशाहीत राष्ट्राध्यक्षांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ हे लोकमताच्या आधारावर राष्ट्राध्यक्षांना सल्ला देत नाही, तर राष्ट्रीय हित लक्षात घेऊन सल्ला देत असल्यामुळे या

लोकशाहीत राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले जाते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवून शासन कार्यक्षमपणे कार्यरत असते. पर्यायाने असे कार्यक्षम शासन जनहीत आणि राष्ट्रहितासाठी उपयुक्त ठरते.

**५) सत्ता विभाजनामुळे नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण:**

अध्यक्षीय लोकशाहीत मांटेस्क्यू यांच्या सत्ताविभाजन सिद्धांतानुसार कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे तीनही अंग परस्परांपासून स्वतंत्र असतात. शासनाचे हे तीनही अंग स्वतंत्रपणे कार्य करीत असतात. पर्यायाने कायदेविषयक, कार्यकारीविषयक आणि न्यायविषयक कार्यांचे केंद्रीकरण होत नसल्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य अबाधित राहते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार शासनाचे तीनही अंग परस्परांपासून अलग राहून कार्य करीत असल्यामुळे नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण होते. अशाप्रकारे अध्यक्षीय लोकशाहीमध्ये वरील गुण असल्यामुळे ही शासनपद्धती उपयुक्त मानली जाते.

## २अ.३.६ अध्यक्षीय लोकशाहीतील दोष अथवा उणीवा:-

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये आढळून येणाऱ्या उपरोक्त गुणांमुळे ही लोकशाही उपयुक्त असली तरी त्यामध्ये काही दोष अथवा उणीवादेखील दिसून येतात, उणीवा अथवा दोष पुढील प्रमाणे;

**१) हुकुमशाहीचा धोका:**

अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणारे मंत्रिमंडळ हे कायदेमंडळाला आपल्या कार्याप्रती जबाबदार नसते. त्यामुळे कायदेमंडळ राष्ट्राध्यक्ष तसेच मंत्रिमंडळाच्या विरोधात अविश्वासाचा ठराव मंजूर करू शकत नाही. याशिवाय राष्ट्राध्यक्षांना विशिष्ट प्रसंगी विशिष्ट कारणांमुळे महाभियोगाच्या कार्यपद्धतीनुसार पदावरून पायउतार करण्याची पद्धती अत्यंत कठीण व गुंतागुंतीची आहे. परिणामी कायदेमंडळ सहजासहजी राष्ट्राध्यक्षांच्या विरोधात महाभियोग मंजूर करू शकत नाही. त्यामुळे अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष हुकूमशहाप्रमाणे शासन कारभार करण्याचा धोका निर्माण होतो.

**२) बेजबाबदार लोकशाही:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचे मंत्रिमंडळ आपल्या कार्याप्रती कायदेमंडळाला जबाबदार नसते. राष्ट्राध्यक्षांनी ठरवलेले एखादे धोरण अयशस्वी झाल्यास विधिमंडळाने पुरेसे अधिकार दिले नाहीत, तसेच आवश्यक त्या कायद्यांना मंजुरी दिली नाही, असा ठपका कायदेमंडळावर ठेवून राष्ट्राध्यक्ष आपली जबाबदारी कायदेमंडळावर ढकलतात. तर दुसरीकडे राष्ट्राध्यक्षांनी संबंधित धोरणाची माहिती कायदेमंडळाला दिली नाही, तसेच संबंधित धोरणाबाबत विधेयकाचीदेखील मागणी केली नाही, असे म्हणून कायदेमंडळ आपली जबाबदारी राष्ट्राध्यक्षांवर ढकलते. अशाप्रकारे अध्यक्षीय लोकशाहीत राष्ट्राध्यक्ष आपली जबाबदारी कायदेमंडळावर ढकलतात तर, कायदेमंडळ आपली जबाबदारी राष्ट्राध्यक्षांवर ढकलून मोकळे होते. अशाप्रकारे या लोकशाहीत अपयशाची जबाबदारी राष्ट्राध्यक्ष अथवा

कायदेमंडळ स्वीकारण्यास तयार होत नाहीत. परिणामी अध्यक्षीय लोकशाही ही एक बेजबाबदार लोकशाही ठरते.

**३) सत्ताविभाजनाचे दुष्परिणाम:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार शासनाचे तिन्ही अंग कार्य करीत असतात. विशेषतः कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ स्वतंत्रपणे कार्य करीत असल्यामुळे राष्ट्राध्यक्षांना आपली धोरणे अंमलात आणण्यासाठी आवश्यक असणारी विधेयके कायदेमंडळाकडून मंजूर करून घेता येत नाहीत किंवा ती मंजूर करण्यात अडथळे येतात. राष्ट्राध्यक्ष ज्या राजकीय पक्षाचे असतील त्या पक्षाला कायदेमंडळात बहुमत नसल्यास राष्ट्राध्यक्षांना आपल्या धोरणाला अनुकूल विधेयके मंजूर करून घेता येत नाहीत. विधेयकाच्या मंजुरीअभावी राष्ट्राध्यक्षांना आपली शासनविषयक धोरणे अंमलात आणणे कठीण होते. याशिवाय कायदेमंडळ आणि राष्ट्राध्यक्ष यांच्यामध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाल्यास कायदेमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यांची अथवा धोरणांची अंमलबजावणी राष्ट्राध्यक्ष करीत नाहीत. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीमध्ये सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार कार्य होत असल्यामुळे या सिद्धांताचे दुष्परिणाम शासनाच्या धोरणावर आणि कार्यावर होतात.

**४) जनहिताकडे दुर्लक्ष:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ स्वतंत्रपणे कार्य करीत असतात. मंत्रिमंडळाचे सदस्य हे कायदेमंडळाचे सदस्य नसतात, परिणामी मंत्री कायदेमंडळाच्या कामकाजात भाग घेत नाहीत. पर्यायाने जनतेच्या इच्छा, अपेक्षा, आकांक्षा, प्रश्न, समस्या काय आहेत, याची माहिती कार्यकारी मंडळाला मिळत नाही. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत जनतेची मते राष्ट्राध्यक्ष आणि मंत्र्यांना समजू शकत नसल्यामुळे जनहिताकडे दुर्लक्ष होणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी होण्याचा धोका अधिक असतो. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाहीत जनहिताकडे दुर्लक्ष होण्याची भीती असते.

**५) संकटकाळात निरुपयोगी:**

अध्यक्षीय लोकशाहीमध्ये कार्यकारीविषयक सत्तेची सर्व सूत्रे राष्ट्राध्यक्षांच्या हाती केंद्रित झालेली असतात. त्यामुळे कठीणप्रसंगी त्वरित निर्णय घेण्यासाठी ही लोकशाही उपयुक्त असल्याचे अनेक विचारवंतांचे मत आहे. परंतु दुसरीकडे विचारवंतांचा असा एक मतप्रवाह आहे की, संकटकाळात कठीण प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यात परस्पर सहकार्य असणे आवश्यक असते. परंतु सत्ताविभाजनाच्या सिद्धांतानुसार अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यात परस्परसंबंध नसून ते स्वतंत्रपणे कार्य करीत असतात. म्हणून अध्यक्षीय लोकशाहीत कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यात परस्पर सहकार्य नसल्यामुळे शासन कारभार करतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यात अधिकारांबाबत स्पर्धा असल्यामुळे संकटकालीन परिस्थितीला सामोरे जाणे कठीण असते. थोडक्यात अध्यक्षीय लोकशाही संकटकाळात निरुपयोगी सिध्द होत असल्यामुळे तीचा स्वीकार करणे अडचणीचे ठरते.

अशाप्रकारे अध्यक्षीय लोकशाहीमध्ये वरील काही दोष अथवा उणीवा आढळून येत असल्या तरीदेखील अमेरिकेसारख्या जगातील शक्तिशाली देशामध्ये ही शासनपद्धती सक्षमपणे कार्यरत आहे, हे मात्र आपणास नाकारता येणार नाही.

## २अ.४ सहभागात्मक लोकशाही (Participatory Democracy)

सहभागी लोकशाही हे एक लोकशाहीचे असे मॉडेल आहे की, ज्यामध्ये जनतेच्या व्यापक राजकीय सहभागावर भर दिला जातो. सहभागी लोकशाहीत नागरिक धोरणात्मक निर्णय घेऊ शकतात. कारण या लोकशाहीच्या मॉडेलमध्ये नागरिकात धोरणात्मक निर्णय घेण्याची शक्ती असते. स्थानिक आणि राज्य स्तरावर आपणास सहभागी लोकशाही दिसून येते.

**सहभागात्मक लोकशाही-अर्थ:-**

सर्वच राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय सहभाग महत्त्वाचा असतो. आज जगातील बहुसंख्य देशांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीची व्याख्या करताना अब्राहम लिंकन यांनी म्हटलेले आहे की, "लोकांनी, लोकांचे, लोकांकरिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय." अब्राहम लिंकन यांच्या या व्याख्यामधून लोकशाहीतील लोकांच्या राजकीय सहभागाची कल्पना आपणास येते. जोपर्यंत राजेशाही पद्धती अस्तित्वात होती, तोपर्यंत जनतेच्या राजकीय सहभागाचा प्रश्नच उद्भवत नव्हता. परंतु नंतरच्या काळात राजेशाहीची जागा लोकशाहीने घेतली. लोकशाही व्यवस्थेत शासनाची जबाबदारी जनतेप्रती असते. लोकशाहीत चालक, पालक आणि मालकदेखील लोकच असतात. साहजिकच दैनंदिन जीवनात लोकांचा सहभाग असणारी लोकशाही टिकून राहणे आत्यंतिक महत्त्वाची ठरते. लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाहीची कल्पनाही करणे शक्य नाही. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात राज्यशास्त्राच्या स्वरूपात फार मोठे बदल झाले. त्यामुळे व्यक्ती आणि व्यक्तिगट राज्याने निश्चित केलेल्या चौकटीत कसे वागतात व त्यांचे राज्य संस्थेशी कसे संबंध आहेत, याचा अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्राला महत्त्व प्राप्त झाले. कोणत्याही प्रकारच्या राजकीय व्यवस्थेत राजकीय सहभाग हा नागरिकांचा असंतोष पसरवत असतो. त्याशिवाय राजकीय व्यवस्थेला आकार आणि स्थिरता प्राप्त होऊ शकत नाही.

प्राचीन ग्रीक नगर राज्यातदेखील लोकशाही अस्तित्वात होती. त्यामुळे तत्कालीन लोकशाहीतदेखील लोकांचा राजकीय सहभाग होता. परंतु तो राजकीय सहभाग मर्यादित स्वरूपात होता. कारण तत्कालीन समाजव्यवस्थेतील महिला, गुलाम आणि परकीय नागरिक यांना नागरिकत्वाचा अधिकार प्राप्त नव्हता. त्यामुळे काही ठराविक लोकांनाच सहभाग घेण्याचा अधिकार तत्कालीन लोकशाहीत होता. आधुनिक काळात मात्र प्रातिनिधिक लोकशाही स्वीकारल्यामुळे जास्तीत जास्त लोकांचा सहभाग लोकशाहीमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. लोकशाहीत सत्ता लोकांच्या हाती असते, हे एकदा मान्य केले की, लोकांचा राजकारणात प्रत्यक्ष सहभाग सुरू होतो. मतदान केंद्रावर मतदान करून प्रतिनिधी निवडणे, हादेखील लोकांचा राजकीय सहभाग आहे. सभा-संमेलनांमधून भाषण करणे, सरकार विषयी अनुकूल किंवा प्रतिकूल बोलणे म्हणजे देखील लोकांच्या राजकीय सहभागाचा एक भाग आहे. अनेकदा तर लोक हेतुपुरस्सरपणे राजकारणात सहभागी होत नाहीत, परंतु हादेखील लोकांचा नकारात्मक सहभागच आहे. रॉबर्ट डहाल यांनी सांगितल्याप्रमाणे

सत्ताधारी वर्गाशिवाय समाजात इतर तीन प्रकारचे लोक कार्यरत असतात. यातील पहिला प्रकार म्हणजे सत्तेसाठी प्रयत्न करणारे, दुसरा प्रकार म्हणजे राजकारणात स्वारस्य असणारे आणि तिसरा प्रकार म्हणजे राजकारणात स्वारस्य नसणारे. या तीन प्रकारच्या वर्गापैकी फक्त पहिल्या दोन वर्गांचा विचारच सहभागाच्या कल्पनेत अंतर्भूत होत नाही, तर काही अभ्यासकांच्या मते, राजकारणात स्वारस्य नसणाऱ्या तिसऱ्या वर्गाचाही अंतर्भाव राजकीय सहभागाविषयीच्या संकल्पनेत अभिप्रेत असतो. कारण राजकारणात स्वारस्य नसण्याची विविध कारणे असू शकतात. राजकारणात स्वारस्य नसणाऱ्या लोकांमुळे राजकीय प्रक्रियेच्या स्वरूपावर व फलितावर परिणाम होण्याची शक्यता असते, असे अलथाम यांनी स्पष्ट केलेले आहे. तसेच राजकारणात स्वारस्य नसणारे लोक काही शक्तीच्या प्रभावामुळे किंवा प्रलोभनामुळे मतदानासारख्या माध्यमातून राजकीय सहभाग अनुभवत असतात. म्हणून रॉबर्ट डहाल यांनी सांगितलेल्या तीनही प्रकारच्या लोकांचा अंतर्भाव हा सहभागी लोकशाहीमध्ये होतो.

सहभागी लोकशाहीमध्ये सहभाग हा केवळ मतदानापुरताच मर्यादित न राहता सभा, संमेलने, निदर्शने, चळवळी, वादविवाद, चर्चा यासारख्या अनेक माध्यमातून व्यक्ती राजकारणात सहभागी होत असतात. लोकशाही व्यवस्थेचा विकास होण्यापूर्वी राजकीय सहभाग हा काही क्षेत्रापुरता आणि व्यक्तीपुरताच मर्यादित होता. परंतु निवडणुकीची पद्धत, प्रातिनिधिक सभागृहाची निर्मिती, राजकीय पक्ष पद्धतीचा झालेला विकास आणि वर्तमानपत्रासारखी विकसित झालेली संसूचनाची माध्यमे यामुळे लोकशाहीतील सहभागाची कल्पना अधिकच व्यापक होत गेली.

व्यक्ती ज्या राजकीय व्यवस्थेचा घटक असतो, त्या व्यवस्थेचे स्वरूप व एकूणच व्यवस्थातंर्गत परिस्थिती याचाही व्यक्तीच्या लोकशाहीतील सहभागावर परिणाम होत असतो. राजकीय संघर्षात सहभागी होण्यास किंवा संघर्ष करण्यास ज्या व्यवस्थेत अनुकूलता असते, त्या व्यवस्थेत लोकांमध्ये राजकीय स्वारस्य अधिक असते. तसेच लोकांचा राजकारणात विविध प्रकारचा व विविध प्रमाणात सहभागही असतो. म्हणूनच लोकशाही व्यवस्थेत राजकीय सहभागाला अधिक उत्तेजन मिळते. तसेच लोकशाहीच्या विकासाबरोबरच लोकांचा राजकीय सहभागही सहभागी लोकशाहीत वाढतो. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रौढ मताधिकार मान्य करण्यात आला. त्यामुळे मतदानाच्या माध्यमातून लोक निवडणुकीत मोठ्या प्रमाणात सहभागी होऊ लागले. राजकीय पक्षांच्या संख्येतही वाढ झाली. घटकराज्य पातळीवर विधिमंडळ व मंत्रिमंडळ व्यवस्था विकसित झाली. पंचायत राजच्या निर्मितीनंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या संस्था राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या बनल्या. या संस्थांच्या माध्यमातून लोकांच्या सहभागाचे प्रमाणात सर्वच पातळीवर मोठ्या प्रमाणात वाढले. राज्य तसेच स्थानिक पातळीवरील संस्थांमध्ये लोकांच्या सहभागामुळे सहभागी लोकशाही अधिक यशस्वी ठरतांना दिसते.

लोकशाहीमध्ये सहभाग महत्त्वपूर्ण असतो, म्हणून लोकशाहीतील लोकांच्या सहभागाची आवश्यकता पुढील मुद्द्यांच्या माध्यमातून स्पष्ट होते;

१) लोकशाहीमध्ये सहभागातून लोकांच्या सुस्पष्ट जाणिवा निर्माण होतात. तसेच आत्मीयतेची भावनाही वाढीस लागते.

२) लोकांच्या मागण्या अधिक सुस्पष्ट स्वरूपात मांडण्यासाठीदेखील लोकांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच जनता चळवळी, निदर्शने, मोर्चा, घेराव, संप इ. द्वारे आपल्या मागण्या लोकशाहीमध्ये प्रतिपादन करीत असते. लोकशाहीतील राज्यकर्ते जनतेच्या या मागण्या जाणून घेतात आणि त्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतात. थोडक्यात लोकशाही लोकांच्या सहभागामुळे सुस्थिर बनते.

३) सत्ताधारी अभिजनवर्गावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनेही लोकशाहीत लोकांच्या सहभागाला अत्यंत महत्त्व असते.

४) लोकशाहीमध्ये आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो. जनतेचा सहभाग मिळाला नाही तर शासनाने कितीही उदार योजना राबविण्याचा प्रयत्न केला तरी त्या यशस्वी होऊ शकत नाहीत. सर्वांनी राजकारणात सहभागी असावे, असे लोकशाहीत अभिप्रेत असले तरी प्रत्यक्षात सर्वांना सहभाग घेणे शक्य होत नाही. तसेच लोकशाहीतील लोकांचा सहभाग संघटित किंवा असंघटित रूपाचा असू शकतो. म्हणजेच राजकीय पक्ष किंवा हीतसंबंधी गटाच्या माध्यमातून केलेला सहभाग हा संघटित स्वरूपाचा सहभाग असतो, तर मित्रांशी व कुंटुबाशी राजकीय प्रश्नांवर चर्चा करणे, हा लोकांचा संघटित स्वरूपाचा सहभाग असतो. तसेच सहभागी लोकशाहीमध्ये लोकांचा उस्फुर्त सहभाग आणि लादलेला सहभागही दिसून येतो. उस्फुर्त सहभाग हा लोकशाहीसाठी लाभदायक ठरतो, परंतु लादलेला सहभाग हा स्वेच्छाधारी नसून तो लोकशाहीस घातक ठरतो. लोकशाही टिकून राहण्यासाठी आणि अधिक विकसित होण्यासाठी जनतेने स्वेच्छेने सहभागी होणे आवश्यक असते. थोडक्यात सहभागी लोकशाहीतील लोकांचा सहभाग हा उस्फूर्तपणे आहे की, बळजबरीने लादला गेलेला आहे, यावर सहभागी लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते.

### २अ.४.१ सहभागात्मक लोकशाहीचे स्वरूपः-

सहभागी लोकशाहीमध्ये लोकांच्या जास्तीत-जास्त सहभागावर अधिक भर दिला जातो. प्राचीन ग्रीक नगरराज्यांमध्ये अनेक लहान-मोठी नगरराज्य अस्तित्वात होती. या नगरराज्यातील बहुसंख्य जनता कोणत्या ना कोणत्या प्रकारे लोकशाहीतील राज्यकारभाराशी संबंधित होती. ग्रीक विचारवंत अरिस्टॉटल यांच्या मते, "ज्या व्यक्तींचा राज्यकारभारात सहभाग असतो, तोच राज्याचा नागरिक होय." थोडक्यात अरिस्टॉटल यांच्या या व्याख्येमधून स्पष्ट होते की, नगरराज्यातील राज्यकारभारात ज्यांचा सहभाग होता, त्यांनाच राज्याचा नागरिक बनण्याची संधी प्राप्त झालेली होती. परंतु असे असले तरीही तत्कालीन ग्रीक नगरराज्यात गुलाम, स्त्रिया आणि वीस वर्षांच्या आतील मुला-मुलींना राज्यकारभारात सहभाग घेता येत नव्हता. म्हणजेच ग्रीक नगरराज्यातील तत्कालीन लोकशाहीत सर्वच नागरिकांचा सहभाग नव्हता, हे यावरून स्पष्ट होते. आधुनिक काळातील लोकशाहीमध्ये मात्र नागरिकांच्या सहभागाला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळेच सहभागी लोकशाहीचे मॉडेल विकसित झालेले आहे. स्विझरलँड या देशात सहभागी लोकशाही अंतर्गत काही उपक्रमांचा अवलंब केला जातो. यामध्ये लोकनिर्णय, सार्वमत, लोकोपक्रम आणि प्रत्यावहन अशा उपक्रमांचा समावेश होतो. या विविध उपक्रमांचा अवलंब

करून लोकशाहीत लोकांचा सहभाग अधिकाधिक वाढवला जातो. सहभागी लोकशाहीतील लोकांचा सहभाग अधिक वाढवणाऱ्या या उपक्रमांविषयी थोडक्यात खालीलप्रमाणे जाणून घेऊयात;

**१) लोकनिर्णय/ (Referendum):**

जेव्हा लोकशाहीमध्ये घेतलेला एखादा निर्णय किंवा कायदेमंडळाने केलेला एखादा कायदा जनतेच्या स्वीकृतीसाठी जनतेसमोर प्रस्तुत केला जातो, तेव्हा त्यास लोकनिर्णय असे म्हणतात. हा लोकनिर्णय सर्वसाधारणपणे दोन प्रकारचा असतो. यातील पहिला प्रकार म्हणजे अनिवार्य लोकनिर्णय आणि दुसरा प्रकार म्हणजे ऐच्छिक लोकनिर्णय होय. जेव्हा एखाद्या लोकशाहीवादी राज्यात कायदेमंडळाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी तो कायदा जनतेच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यकच असते, तेव्हा त्या लोकनिर्णयास अनिवार्य लोकनिर्णय असे म्हणतात. तर जेव्हा एखाद्या लोकशाहीवादी राज्यात कायदेमंडळाने मंजूर केलेल्या कायद्याची अंमलबजावणी होण्यापूर्वी तो कायदा जनतेच्या मान्यतेसाठी सादर करणे हे ऐच्छिक स्वरूपाचे असते, तेव्हा अशा लोकनिर्णयास ऐच्छिक लोकनिर्णय असे म्हणतात. एखाद्या विधेयकावर लोकनिर्णयाची मागणी जनतेने केल्यास ते विधेयक लोकनिर्णयासाठी जनतेसमोर ठेवले जाते. लोकनिर्णय या उपक्रमामुळे जनतेला निषेधाधिकार प्राप्त होतो. उदा. अंधश्रद्धा निर्मूलन कायदा जनतेच्या स्वीकृतीसाठी जनतेसमोर ठेवणे म्हणजेच लोकनिर्णयास ठेवणे होय. ऐच्छिक लोकनिर्णयासाठी किमान किती लोकांचा पाठिंबा असावा, हे ठरविले जाते. थोडक्यात लोकनिर्णयाद्वारे नको असलेली विधेयके रोखली जातात, तसा अधिकार जनतेला आहे. स्वित्झर्लंडमध्ये लोकनिर्णयाची मागणी करणाऱ्या प्रस्तावाची किमान तीस हजार व्यक्तींनी मागणी करणे आवश्यक आहे. थोडक्यात स्विझरलँड या देशातील राज्यव्यवस्थेत जनतेचा सहभाग लोकनिर्णयाच्या माध्यमातून दिसून येतो. म्हणजेच स्विझरलँडमध्ये कायदा लोकनिर्णयासाठी जनतेसमोर ठेवून जनतेचा सहभाग नोंदवला जातो. स्विझरलँडमध्ये जनतेचा सहभाग वाढवण्यासाठी लोकनिर्णय या उपक्रमाचा अवलंब केला जातो.

**२) सार्वमत (Plebiscite):**

जेव्हा एखाद्या लोकशाहीवादी देशात विशिष्ट प्रश्नाविषयी जनमत जाणून घेण्यासाठी तेथील शासनव्यवस्था त्या प्रश्नावर जनमत घेते आणि जनता त्या प्रश्नावर आपली अनुकूल किंवा प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त करत असते, तेव्हा अशा उपक्रमास सार्वमत असे म्हणतात. देशातील विशिष्ट प्रश्नावर जनतेचे काय मत आहे, हे सार्वमत या उपक्रमातून जनतेच्या सहभागाद्वारे जाणून घेतले जाते. उदा. नागरिकांना मतदान सक्तीचे करावे की करू नये, याविषयी जेव्हा जनतेचे मत जाणून घेतले जाते, तेव्हा त्यास सार्वमत असे म्हणता येईल. थोडक्यात लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग वाढवण्यासाठी सार्वमत या उपक्रमाचा स्विझर्लांड या देशात अवलंब केला जातो.

**३) लोकोपक्रम (Initiative):**

जेव्हा एखाद्या लोकशाहीवादी देशात जनता एखादा कायदा पूर्णपणे तयार करून कायदेमंडळाच्या विचारार्थ पाठवत असते किंवा कायदेमंडळाने कशा स्वरूपाचा कायदा

करावा यासंदर्भातील मागणी कायदेमंडळाकडे जनता करते, तेव्हा अशा उपक्रमास लोकोपक्रम असे म्हणतात. लोकउपक्रमाच्या माध्यमातून जनतेचा लोकशाहीतील सहभाग वाढवला जातो. या उपक्रमाद्वारे जनतेकडून जनहित साधणारा चांगला कायदा कायदेमंडळाकडे प्रस्तुत केला जाऊ शकतो. लोकोपक्रमाचे रचित आणि अरचित लोकोपक्रम असे दोन प्रकार आहेत. रचीत लोकोपक्रमाच्या माध्यमातून जनता ज्या विषयावर कायद्याची आवश्यकता आहे, त्या विषयावर विधेयक तयार करून कायदेमंडळाकडे पाठवते. जनतेने पाठवलेले विधेयक जर कायदेमंडळाला अमान्य असेल तर जनमत घेतले जाते. जनमतानुसार विधेयक मंजूर करण्यात येते. अरचित लोकोपक्रमाच्या माध्यमातून जनता अपेक्षित असलेल्या कायदा केवळ विषयासह कायदेमंडळाकडे पाठवते. परंतु या विधेयकाचे पूर्ण स्वरूप तयार करण्याची जबाबदारी ही कायदेमंडळाची असते.

थोडक्यात लोकोपक्रमाद्वारे हवी असलेली विधेयके जनता मंजूर करून घेत असते. लोकोपक्रम हे लोकशाहीतील स्वीकारात्मक अस्त्र आहे, ज्याद्वारे लोककल्याण साधले जाते.

**४) प्रत्यावहन (Recall):**

जेव्हा लोकशाहीमध्ये मतदारांनी निवडून दिलेला प्रतिनिधी अकार्यक्षम व बेजबाबदार असतो, तेव्हा मतदारांना निवडून दिलेल्या प्रतिनिधी परत बोलविण्याचा जो अधिकार असतो, त्यास प्रत्यावहन असे म्हणतात. थोडक्यात प्रत्यावहन या उपक्रमाद्वारे जनतेचा लोकशाहीतील सहभाग वाढवला जातो. प्रत्यावहन या उपक्रमाद्वारे जनहित न साधणारे किंवा जनहिताविरोधी निर्णय घेणाऱ्या लोकप्रतिनिधींना परत बोलविणे शक्य होते. परंतु व्यवहारात मात्र प्रत्यावहन या उपक्रमाचा दुरुपयोग होण्याचीच शक्यता जास्त असते. कारण सामान्य जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन राजकारणातील महत्त्वाकांक्षी लोक आपला स्वार्थ साधण्याचा धोका असतो.

अशाप्रकारे प्रत्यक्ष आणि सहभागी लोकशाहीच्या मॉडेलमध्ये लोकनिर्णय, लोकोपक्रम, सार्वमत आणि प्रत्यावहन या चार महत्त्वाच्या साधनांचा वापर करून जनता अधिकाधिक सहभाग घेत असते.

## २अ.४.२ सहभागात्मक लोकशाहीची वैशिष्ट्ये:-

सहभागात्मक लोकशाही या लोकशाहीच्या मॉडेलमध्ये नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षित असतो. नागरिकांच्या सहभागावर आधारित सहभागी लोकशाहीची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे;

**१) कायदेमंडळाच्या कार्यात सहभाग:**

सहभागी लोकशाहीमध्ये लोकांचा कायदेमंडळाच्या कार्यात प्रत्यक्ष सहभाग असतो. ऐच्छिक आणि अनिवार्य लोकनिर्णय, लोकोपक्रम या उपक्रमांच्या माध्यमातून लोकांचा कायदेनिर्मितीच्या कार्यात प्रत्यक्षपणे सहभाग असतो. लोकांकडून एखादा कायदा पूर्ण स्वरूपात तयार करून तो कायदेमंडळाच्या विचारार्थ पाठवला जातो. तसेच कायदेमंडळाने कशाप्रकारचा कायदा निर्माण करावा, याची मागणीदेखील अनेकवेळा लोकांकडून केली जाते.

**२) लोकप्रतिनिधींचे प्रत्यावहन:**

सहभागी लोकशाहीच्या मॉडेलमध्ये मतदारांना प्रत्यावहनाचा अधिकार असतो. या अधिकारानुसार मतदारांनी निवडून दिलेला प्रतिनिधी अकार्यक्षम तसेच बेजबाबदार असल्यास त्याला मतदार परत बोलावू शकतात. प्रत्यावहन या उपक्रमाद्वारे जनहितविरोधी निर्णय किंवा कायदे तसेच लोककल्याण न साधणारे निर्णय घेतले गेल्यास जनता आपल्या प्रतिनिधींना परत बोलावू शकते.

**३) सर्वसाधारणपणे लहान देशांसाठी उपयुक्त:**

सहभागी लोकशाहीचे मॉडेल हे सर्वसाधारणपणे कमी लोकसंख्या असलेल्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ कमी असलेल्या देशांसाठी उपयुक्त आहे. मात्र याउलट सहभागी लोकशाहीचे हे मॉडेल जास्त लोकसंख्या आणि विशाल भौगोलिक क्षेत्रफळ असणाऱ्या देशांना अडचणीचे आहे.

**४) राजकीय सहभागाबाबत समानता:**

सहभागी लोकशाहीच्या या मॉडेलमध्ये देशातील सर्व नागरिकांना राजकीय सहभाग घेण्याचे समान स्वातंत्र्य वा अधिकार आहे. देशातील प्रत्येक नागरिक कायदा कसा असावा, या संदर्भात आपले मत कायदेमंडळाकडे नोंदवू शकतो किंवा आपली इच्छा लोकोपक्रम आणि लोकनिर्णय या माध्यमातून समानपणे व्यक्त करू शकतात. तसेच सार्वमत या उपक्रमाद्वारे विशिष्ट प्रश्नावर अनुकूल किंवा प्रतिकूल प्रतिक्रिया प्रत्येक व्यक्ती व्यक्त करू शकतो. सार्वमताद्वारे शासनाच्या धोरण निर्मितीवर जनता आपला प्रभाव पाडू शकते.

**५) नागरिकांचे सामूहिक सार्वभौमत्व:**

सहभागी लोकशाहीमध्ये सर्व नागरिक हे सामूहिकरित्या सार्वभौम असतात. म्हणजेच सहभागी लोकशाहीमध्ये सार्वभौम सत्ता ही देशातील सर्व नागरिकांच्या सामूहिक सार्वभौमत्वात निहीत असते.

**२अ.४.३ सहभागात्मक लोकशाहीचे गुण:-**

सहभागात्मक लोकशाहीच्या मॉडेलमध्ये वरील वैशिष्ट्यांवरून पुढील गुण दिसून येतात;

**१) जनहिताचे रक्षण:**

सहभागात्मक लोकशाहीमध्ये लोकांचा जास्तीत जास्त सहभाग असतो. जनतेचा कायदेनिर्मितीच्या कार्यामध्ये आणि धोरण निर्मितीच्या कार्यातही सक्रिय सहभाग असतो. विविध उपक्रमांच्या माध्यमातून या लोकशाहीत जनहित साधले जाते. पर्यायाने सहभागी लोकशाहीत जनहिताचे संरक्षण होत असल्यामुळे ही लोकशाही लोकहितकारी मानली जाते.

### २) लहान देशांसाठी उपयुक्त:

सहभागात्मक लोकशाही ही कमी लोकसंख्या असणाऱ्या आणि कमी भौगोलिक क्षेत्रफळ असणाऱ्या देशांसाठी उपयुक्त पद्धती आहे. कारण अशा देशांमध्ये सर्व लोकांना शासनकारभारात सहभागी होणे शक्य होते.

### ३) लोकांचा सक्रिय सहभाग:

सहभागात्मक लोकशाहीच्या या मॉडेलमध्ये लोकांचा सक्रियपणे अधिकाधिक सहभाग असतो. कायदे निर्मिती आणि धोरण निर्मिती कार्यात लोकांचा सहभाग असल्यामुळे ही पद्धती उपयुक्त ठरते. लोकांचा सक्रिय सहभाग असल्यामुळे जनहिताकडे या पद्धतीत दुर्लक्ष होत नाही.

### ४) जनतेत जाणीव जागृती:

सहभागात्मक लोकशाहीमध्ये जनतेचा शासनकारभारात अधिकाधिक सक्रिय सहभाग असल्यामुळे जनता सदैव जागृत आणि तत्पर असते. अयोग्य किंवा चुकीचा निर्णय अथवा कायदा केला जाणार नाही, याची दक्षता जनतेकडूनच घेतली जाते. थोडक्यात या पद्धतीमध्ये जनतेत वाढती जाणीव जागृती  दिसून येते.

### ५) कायदेमंडळ सदस्यांमध्ये जागृतता:

सहभागात्मक लोकशाहीमध्ये जनतेचा सदैव सक्रिय सहभाग असतो. खुद्द जनता जागृत असल्यामुळे कायदेमंडळ सदस्यही तितकेच जागृत असलेले दिसून येतात. कारण कोणत्याही चुकीच्या कायद्याला अथवा निर्णयाला जनतेचा लागलीच विरोध होत असतो. त्यामुळे कोणताही चुकीचा निर्णय अथवा कायदा केला जाणार नाही, याची दक्षता सजग असणारे कायदेमंडळाचे सदस्य घेत असतात.

### ६) लोकहिताचा आदर:

सहभागात्मक लोकशाहीमध्ये लोकहिताचा आदरपूर्वक सन्मान केला जातो. लोकहित डावलून कोणताही कायदा अथवा शासकीय धोरण अंमलात आणले जाऊ शकत नाही. थोडक्यात सहभागात्मक लोकशाहीमध्ये लोकहिताची अवहेलना न होता याउलट लोकहिताचा आदरच केला जातो.

### २अ.४.४ सहभागात्मक लोकशाहीचे दोष अथवा उणीवा:-

सहभागात्मक लोकशाहीच्या मॉडेलमध्ये वरील गुण दिसून येत असले तरी या लोकशाहीमध्ये काही दोष अथवा उणिवाही आहेत त्या पुढीलप्रमाणे;

### १) छोट्या देशांसाठीच उपयुक्त:

सहभागात्मक लोकशाहीचे हे मॉडेल केवळ आकाराने छोट्या आणि कमी लोकसंख्या असलेल्या देशांसाठी उपयुक्त आहे. आधुनिक काळात वाढती लोकसंख्या आणि वाढते क्षेत्रफळ पाहता हे मॉडेल जास्त लोकसंख्या असणाऱ्या आणि जास्त भौगोलिक क्षेत्रफळ असणाऱ्या देशांसाठी उपयुक्त ठरत नाही.

### २) जनतेत योग्य क्षमतेचा अभाव:

सहभागी लोकशाहीमध्ये जनतेचा अधिकाधिक सहभाग महत्त्वपूर्ण ठरतो. मात्र शासनकारभारात सहभाग घेणारी जनता योग्य क्षमता धारण करणारी असेलच, असे नाही. पर्यायाने क्षमता नसणाऱ्या लोकांचा सहभाग वाढूनही फारसा उपयोग होत नाही. म्हणून जनतेच्या योग्य क्षमतेच्या अभावी ही प्रणाली फायदेशीर ठरत नाही.

### ३) कायदेमंडळ सदस्यांचे दायित्व कमी:

सहभागात्मक लोकशाहीमध्ये कायदेनिर्मितीच्या कार्यात जनतेचा सक्रीय सहभाग असतो. लोकनिर्णय आणि लोकोपक्रम या उपक्रमांच्या माध्यमातून जनतेचा अधिकाधिक प्रभाव कायदेनिर्मितीच्या कार्यावर असतो. परिणामी कायदेनिर्मितीबाबत कायदेमंडळ सदस्यांची जबाबदारी कमी होतांना दिसते. थोडक्यात कायदेमंडळ सदस्यांची भूमिका कमी महत्त्वाची ठरते.

### ४) स्वतः निर्णय घेण्यात जनता उदासीन:

सहभागी लोकशाहीमध्ये जनतेचा अधिकाधिक राजकीय सहभाग मान्य केला तरी सर्वसाधारणपणे जनता ही कोणतेही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात उदासीन ठरलेली दिसते, हे सत्य आपण नाकारू शकत नाही. जनतेच्या उदासीनतेमुळे लोकशाहीच्या यशस्वीतेमध्ये खोडा निर्माण होतो.

सहभागी लोकशाहीमध्ये वैचारिक प्रतिनिधीत्व दिसून येत नाही. जनतेमधील उचित योग्यतेच्या अभावी अशा वैचारिक प्रतिनिधित्वाचा अथवा इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो.

## २अ.५ चर्चात्मक लोकशाही (Deliberative Democracy)

चर्चात्मक लोकशाही हे लोकशाहीचे विकसित होत असलेले असे मॉडेल आहे की, ज्या लोकशाहीमध्ये सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विचारविनिमय, चर्चा अथवा संबंधित बाबींवर उहापोह करण्यावर अधिक भर दिला जातो. थोडक्यात चर्चात्मक लोकशाहीमध्ये सार्वजनिक हित साधण्यासाठी सार्वजनिकरित्या विचारविमर्श, चर्चा करण्यावर अधिकाधिक भर दिला जातो. या लोकशाहीमध्ये व्यक्तीला स्वायत्तता दिलेली असते, एवढेच नव्हे तर व्यक्तीच्या स्वायत्ततेपासूनच या लोकशाहीच्या मॉडेलची सुरुवात होते. मात्र असे असले तरीदेखील व्यक्तीची स्वायत्तता आणि सामाजिक संबंध हे या लोकशाहीमध्ये संघर्षाची जागा घेत नाहीत. तसेच विशिष्टांच्या हिताचाच विचार न करता सार्वजनिक हिताचा विचार या चर्चात्मक लोकशाहीमध्ये अधिकाधिक प्रमाणात केला जातो.

चर्चात्मक लोकशाहीमध्ये सहभागी झालेली जनता विचारविमर्श व चर्चेच्या माध्यमातून परस्परांशी संबंधित असते. तसेच जनता वादविवाद, चर्चा या माध्यमातून परस्परांचे मतं वळवण्यासाठी, परस्परांवर प्रभाव पाडण्यासाठी प्रयत्न करीत असते. या लोकशाहीमध्ये समर्थनासाठी जनतेची मते वळवणे, त्यांचे मतपरिवर्तन करणे, हा राजकीय सत्तेसाठी एक उत्तम आधार ठरतो. कारण या लोकशाहीमध्ये व्यक्तीच्या स्वायत्ततेचा आदर केला जातो. तसेच यामुळे या लोकशाहीत स्वशासनाच्या क्षमतेलाही महत्त्व प्राप्त होते. या लोकशाहीमध्ये व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटकांवर वैयक्तिक नियंत्रण ठेवण्याचा अधिकार व्यक्तींना

प्राप्त होतो. तसेच ही लोकशाही या माध्यमातून राजकीय सत्तेला अधिकाधिक आणि सतत उत्तरदायी बनवते. चर्चात्मक लोकशाहीमध्ये व्यक्ती निर्णय निर्धारण प्रक्रियेत सतत कार्यरत असतात. सहभागी लोकशाहीपेक्षा हा भाग चर्चात्मक लोकशाहीमध्ये निश्चित वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण सहभागी लोकशाहीमध्ये जनता राजकीय सहभाग येत असली तरी त्यामध्ये सातत्य वा निरंतरता असतेच, असे नाही. कारण सहभागी लोकशाहीतील व्यक्तींचा सहभाग हा बऱ्याचवेळा व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असतो. मात्र चर्चात्मक लोकशाहीमध्ये व्यक्ती निर्णय निर्धारण प्रक्रियेत निरंतरपणे सक्रिय असतात. चर्चात्मक लोकशाहीमध्ये नागरिक आणि व्यावसायिक राजकारणी अशी विभागणी होत असते, नव्हे तशी परवानगीच एकप्रकारे या लोकशाहीमध्ये दिली जाते. चर्चात्मक लोकशाहीमध्ये नागरिक विविध जनहिताशी संबंधित सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चा, विचारविमर्श अथवा उहापोह करण्यामध्ये सक्रियपणे सहभाग घेत असतात.

### २अ.५.१ चर्चात्मक लोकशाहीची वैशिष्ट्ये:-

#### १) चर्चा, विचारविनिमयावर भर:

चर्चात्मक लोकशाहीमध्ये चर्चा, विचारविनिमय यावर अधिकाधिक भर दिला जातो. जनहिताशी संबंधित सार्वजनिक मुद्द्यांवर या लोकशाहीमध्ये व्यापक स्वरूपात चर्चा घडवून आणली जाते आणि याद्वारे जनहित साधण्याचा प्रयत्न केला जातो.

#### २) सार्वजनिक हिताचा विचार:

चर्चात्मक लोकशाहीमध्ये विशिष्ट व्यक्तींच्याच वा समूहच्याच हिताचा विचार न करता, जनतेच्या सामूहिक हिताचा विचार व्यापक स्वरूपात केला जातो. त्यामुळे या लोकशाहीमध्ये सामाजिक  संबंधात संघर्ष निर्माण होण्याचा संबंध येत नाही.

#### ३) व्यक्तीची स्वायत्तता:

चर्चात्मक लोकशाहीमध्ये व्यक्तीला स्वायत्तता प्रदान केलेली असते. व्यक्तीला स्वायत्त मानण्यापासूनच या लोकशाहीची सुरुवात होते. मात्र असे असले तरी व्यक्तीला दिलेल्या स्वायत्ततेमुळे सामाजिक संबंधात संघर्ष निर्माण होत नाही. कारण विशिष्टांच्या हिताऐवजी सार्वजनिक हिताचा विचार या लोकशाहीत केला जातो.

#### ४) मतपरिवर्तनावर भर:

चर्चात्मक लोकशाहीमध्ये चर्चा, विचारविनिमय, विमर्श या माध्यमातून व्यक्तीचे मतपरिवर्तन करण्याचा आणि अधिकाधिक सार्वजनिक हित साधण्याचा प्रयत्न केला जातो.

#### ५) जनतेप्रती उत्तरदायी:

चर्चात्मक लोकशाहीमध्ये राजकीय सत्ताधारी हे जनतेप्रती उत्तरदायी असतात. व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटकांवर या लोकशाहीमध्ये जनतेचे नियंत्रण असते. थोडक्यात जनतेप्रती उत्तरदायित्वाच्या भावनेतून या लोकशाहीत निर्णय घेतले जातात.

**६) निर्णय निर्धारण प्रक्रियेत जनतेचा सक्रीय सहभाग:**

चर्चात्मक लोकशाहीमध्ये जनता चर्चा, विचारविनिमय, विमर्श या माध्यमातून देशाच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत अधिकाधिक प्रमाणात सतत सहभागी होत असते.

## २अ.६ सारांश

आधुनिक राजकीय सिद्धांतामध्ये लोकशाहीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. कारण आधुनिक युग हे लोकशाहीचे युग आहे. या युगात जगातील विविध देशात लोकशाही शासनपद्धती प्रातिनिधिक, सहभागी आणि चर्चात्मक अशा विविध प्रकारांमध्ये अंमलात आणली जात आहे. लोकशाहीच्या प्रत्येक प्रकारांमध्ये जनतेचे हित साधण्याचा अधिकाधिक प्रयत्न केला जातो. आधुनिक काळात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा उदय झाल्यामुळे लोकशाहीवादी देशांमध्ये लोकशाहीला चांगलेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. आधुनिक काळात लोकशाही हा केवळ शासनाचा एक प्रकार राहिलेला नाही, तर ती एक जीवनपद्धती तसेच विचारप्रणालीदेखील बनलेली आहे. लोकशाही या शासनाच्या आधुनिक प्रकारात 'जनता' हा घटक केंद्रबिंदू मानला जातो.

## २अ.७ सरावासाठी प्रश्नसंच

१- लोकशाही म्हणजे काय ? हे स्पष्ट करून लोकशाहीची तत्वे सविस्तर लिहा.

२- संसदीय लोकशाहीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३- संसदीय लोकशाहीचे गुण-दोष सविस्तर लिहा.

४- अध्यक्षीय लोकशाहीचे स्वरूप स्पष्ट करा.

५- अध्यक्षीय लोकशाहीचे गुण-दोष सविस्तर लिहा.

६- सहभागी लोकशाही म्हणजे काय ? हे स्पष्ट करून सहभागी लोकशाहीची वैशिष्ट्ये लिहा.

७- सहभागी लोकशाहीचे गुण-दोष सविस्तर लिहा.

८- चर्चात्मक लोकशाहीचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## २अ.८ अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ

१) Jain M.P., Political Theory, Guild Publications (1987)

२) Norman Barry, Modern Political Theory, Palgrave (2000)

३) वर्मा शामलाल, आधुनिक राजनीतिक सिद्धांत, मीनाक्षी प्रकाशन, नवी दिल्ली (१९७७)

४) गर्दे दि. का. आणि बाचल वि.मा., आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (१९७५)

५) भा.ल. भोळे, राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर (१९८८)

६) प्रा. चि.ग. घांगरेकर, विद्या प्रकाशन, नागपूर (१९९९)

७) प्रा. मुठाळ राम, राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर (१९९७)

❈❈❈❈❈❈❈

# २ब

# नागरिकत्व

**घटक रचना**

**३ब.**० उद्दीष्टे

**३ब.**१ विषय विवेचन

**३ब.**१.१ नागरिकत्व: संकल्पना, व्याख्या आणि विकास

**३ब.**१.२ रिपब्लिकन नागरिकत्व

**३ब.**१.३ उदारमतवादी नागरिकत्व

**३ब.**१.४ वैश्विक/ सार्वत्रिक नागरिकत्व

**३ब.**१.५ भिन्न नागरिकत्व

**३ब.**१.६ नागरिकत्व आणि जागतिकीकरण

**३ब.**२ सारांश

**३ब.**३ सरावासाठी प्रश्न

**३ब.**४ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३ब.० उद्दीष्टे

१. नागरिकत्व या संकल्पनेचा विकास कसा झाला हे समजून घेणे.

२. नागरिकत्वाच्या विविध प्रकारांचा अभ्यास करणे आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या विविध व्याख्यांचा उहापोह करणे.

३ब. जागतिकरणाचा नागरिकत्वावर कसा परिणाम होतो याचे विश्लेषण करणे.

## ३ब.१ विषय विवेचन

नागरिकत्व या शब्दाचा अर्थ समजून घेताना त्याच्या व्युत्पत्तीकडे विशेष लक्ष द्यायला हवे. लॅटिनमधील 'सिव्हीस' (civis) आणि ग्रीकमधील 'पॉलिटेस' (polites) या शब्दांमधून नागरिकत्व (citizenship) हा शब्द तयार झाला.

नागरिकत्वाच्या संकल्पनेत तीन महत्वाचे घटक आहेत, ते पुढीलप्रमाणे;

१. नागरिकत्व म्हणजे नागरिकाचे कायदेशीर अधिष्ठान असते. नागरिकाला मिळणारे नागरी, राजकीय आणि सामाजिक हक्क हा त्याचा पाया असतो. यामुळे कायद्याच्या चौकटीत नागरिकाचा स्वतंत्र वावर शक्य होतो.

२. राज्यसंस्थेत किंवा इतर सार्वजनिक आणि नागरी संस्थांमध्ये सक्रिय सहभाग असणे.

३ब. नागरिकत्व म्हणजे एका विशिष्ट राजकीय समाजाचे सभासदत्व असणे होय. आधुनिक राज्यसंस्था आणि राष्ट्र-राज्यांचा उदयामुळे नागरिकत्व ही संकल्पना प्रादेशिक सभासदत्वाशी जोडली गेली. इथे असे नमूद करावे लागेल की राष्ट्र-राज्यांना प्रादेशिक, वांशिक, सांस्कृतिक किंवा भाषिक आधारांवर या सभासत्वाचे नियंत्रण करता येते.

४. नागरिकत्व ही मुळात नैसर्गिक हक्कांवर आधारलेली संकल्पना आहे. परंतु नागरिकत्वाच्या आधुनिक व्याख्येत हक्काधिष्ठित चौकटींसोबतच कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि समाजहितासाठी लादलेल्या काही बंधनांचादेखील समावेश करता येतो.

### ३ब.**१.१ नागरिकत्वाचा संकल्पनात्मक विकास**

आजच्या काळात अस्तित्वात असलेली नागरिकत्वाची संकल्पना एका विशिष्ट विकासात्मक प्रक्रियेतून उदयास आलेली आहे. या विकासात्मक प्रक्रियेचे चार टप्पे आढळून येतात. ते पुढीलप्रमाणे:

१. प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्ये व रोमन साम्राज्याच्या शासनव्यवस्थांमध्ये नागरिकत्वाची संकल्पना उदयास आली.

२. उत्तर-मध्ययुगीन आणि आधुनिक काळात फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांती दरम्यान नागरिकत्वाची संकल्पना अधिक दृढ झाली.

३ब. एकोणिसाव्या शतकात विस्तार पावलेली भांडवली अर्थव्यवस्था आणि त्याला पूरक अशी उदारमतवादी राज्यव्यवस्था निर्माण झाली. या काळात नागरिकत्वाभोवतीच्या हक्काधिष्ठित चौकटीला आणखी बळ मिळाले.

४. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुढे आलेले बहुसांस्कृतिक व सामुदायिक अधिकार आणि जागतिकीकरणाचा प्रभावांतून निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे नागरिकत्वाच्या संकल्पनेत आणि व्याख्येत आणखी भर पडली.

वरील नमूद केलेल्या कालखंडात नागरिकत्वाचे दोन मुख्य प्रकार दिसतात.

१. सार्वजनिक हित, नागरी सहभाग आणि नागरी गुणवत्ता (civic virtue) या तत्वांवर बेतलेले नागरी प्रजासत्ताक.

२. वैयक्तिक आणि खाजगी हक्कांवर आधारलेले उदारमतवादी नागरिकत्व.

### ३ब.**१.२ गणराज्यात्मक (रिपब्लिकन) नागरिकत्व**

गणराज्यात्मक नागरिकत्व (रिपब्लिकन नागरिकत्व) ही संकल्पना या समजून घेण्यापूर्वी मुळात गणराज्य (रिपब्लिक) म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक आहे. गणराज्य शब्दाचा उगम 'रेस पब्लिका ' (*res publica*) या लॅटिन शब्दातून झाला ज्याचा अर्थ 'सार्वजनिक

परिघात असलेली गोष्ट' असा आहे. यामध्ये शासन हे एक सार्वजनिक कर्तव्य आहे असे मानले जाते, म्हणजेच नागरिकांनी शासनव्यवस्थेत सक्रिय सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा केली जाते. यामध्ये गणराज्याचा जे नागरिक भाग आहेत, त्यांच्यासाठी काही एक ठराविक 'नागरी गुणवत्ता' (Civic Virtue) लागू आहे असे मानले जाते. सार्वजनिक क्षेत्रात नागरिकांनी सहभागी होणे म्हणजेच नागरिक असण्याचे कर्तव्य निभावणे होय. यालाच नागरी गुणवत्ता (Civic Virtue) असे संबोधले जाते. ही नागरी गुणवत्ता नागरिकांनी स्वतःमध्ये विकसित करायला हवी असे मानले जाते. त्याकरिता रोमन लोकांनी प्रशिक्षण, देशभक्ती, कर्तव्यांचे पालन आणि कायद्याप्रती समर्पण या अत्यावश्यक बाबी मानल्या होत्या.

गणराज्यात्मक नागरिकत्वाची संकल्पना अथेन्स या ग्रीक नगर-राज्यात उदयास आली. यामध्ये नागरिकांनी शासनव्यवस्था , प्रशासकीय कार्ये आणि न्यायव्यवस्थेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे अनिवार्य होते. ॲरिस्टोटलने ग्रीक नागरिकांचे वर्णन करताना 'all who share in the civic life of ruling and being ruled in turn' असे म्हटले आहे. सक्रिय राजकीय सहभाग आणि सक्रिय नागरी जीवन ही गणराज्यात्मक नागरिकत्वाची वैशिष्ट्ये होती. परंतु या प्रारूपाच्या मर्यादाही समजून घ्यायला हव्यात. पहिले म्हणजे अथेन्स आणि स्पार्टा ही ग्रीक नगर-राज्ये अतिशय लहान होती आणि तेथील लोकसंख्याही मर्यादित होती. दुसरे म्हणजे तेथील समाजात कमीतकमी भिन्नत्व होते. तिसरे म्हणजे, तेथील राजकीय व्यवस्था या सोप्या व सुटसुटीत होत्या, ज्या बहुतांशपणे परस्परांशी असलेली ओळख आणि विश्वासावर अवलंबून होत्या. मनुष्याच्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक जीवनापेक्षा त्याचे राजकीय व सार्वजनिक आयुष्य अधिक महत्वाचे मानले जात असे. हेही ध्यानात घ्यायला हवे, की या नगर राज्यात नागरिक नसणाऱ्या व्यक्तींना शासनप्रक्रियेत सहभागी व्हायची परवानगी नव्हती. त्यामुळे सहभाग हा एकप्रकारचा विशेषाधिकार होता, जो मर्यादित व्यक्तींपुरताच मर्यादित होता. यात केवळ 'स्वतंत्र आणि मूळनिवासी पुरुष' होते. बाकी स्त्रिया, लहान मुले, गुलाम आणि परकीयांना नागरिकत्वातून वगळण्यात आले होते. त्यामुळे एका मर्यादित समूहालाच 'नागरिक' म्हणून ओळखले जात असे. इतर अनेक समुदाय त्यापासून वंचित होते.

त्यानंतर रोमन कालखंडामध्ये ग्रीकांच्या नागरिकत्वाच्या संकल्पनेत मोठे बदल घडून आले. रोमन साम्राज्यापुढे विशाल जनसमुदायाला तसेच प्रदेशांना सामावून घेण्याचे आव्हान होते. यामधूनच नागरिकत्वाला वैधानिक आधार देण्याची गरज निर्माण झाली. याद्वारे रोमन साम्राज्य अधिकाधिक लोकांना त्यांच्यात सामावून घेऊ शकले, तसेच त्या सर्वांना सामान कायद्यांद्वारे संरक्षणही देण्यात आले. परंतु यातही ग्रीक-प्रारूपाला अनुसरून स्त्रियांना आणि समाजातील निम्न वर्गांना (विशेषतः ग्रामीण लोकसंख्येला) नागरिकत्व नाकारले गेले होते. परंतु कायदे बनविणे आणि कायद्यांची अंमलबजावणी करणे याबाबतीतील व्यवस्था मात्र ग्रीकांपेक्षा खूप निराळी होती. रोमन कालखंडात नागरिकत्व ही कायद्यावर आधारित अशी ओळख निर्माण झाल्याने सर्व नागरिकांना कायद्याचे सामान संरक्षण बहाल केले गेले, तसेच काही अधिकारही प्रदान केले गेले. या प्रारूपाची दोन वैशिष्ट्ये नमूद करता येतील. पहिले म्हणजे, यात रोमन तसेच रोमन नसलेल्या व्यक्तींनाही नागरिकत्व बहाल केले जात असे. दुसरे म्हणजे, नागरिकत्वात उतरंड निर्माण करून 'दुय्यम नागरिकत्वा'ची (civitas sine suffragio) तरतूद करण्यात आली. या दुय्यम नागरिकांना कायदेशीर हक्क होते, परंतु राजकीय हक्क मात्र नव्हते.

अशाप्रकारे ग्रीक आणि रोमन कालखंडात गणराज्यीय नागरिकत्वाची दोन वैशिष्टये विकसित झाली- पहिले म्हणजे सार्वजनिक/राजकीय क्षेत्रात नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असतो. दुसरे म्हणजे, नागरिकत्वाला कायदेशीर आधार असणे गरजेचे असते.

परंतु गणराज्यात्मक नागरिकत्वाचा पाया असलेली 'गणराज्यवाद' ही संकल्पना सतराव्या आणि अठराव्या शतकात विकसित झाली. या विकासातूनच गणराज्यात्मक नागरिकत्वाच्या संकल्पनेचाही हळूहळू विकास होत गेला. गणराज्यवादाचे दोन प्रकार आहेत- नव-अथेनियन गणराज्यवाद (neo-Athenian republicanism) आणि नव-रोमन गणराज्यवाद (neo-Roman republicanism).

नव- अथेनियन प्रारूपानुसार संस्थात्मक पातळीवरील सहभाग आणि लोकशाहीवादी सहभाग यांना महत्व दिले जाते. यासाठी नागरी गुणवत्ता आणि नागरिकत्व व देशप्रेम महत्वाचे ठरते. राज्यसंस्थेचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी हे घटक महत्वाचे मानले जाते. नव-रोमन प्रारूपानुसार व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे जतन व संवर्धन महत्वाचे मानले जाते. निकोलो मॅकियावेली आणि जेम्स मॅडिसन हे विचारवंत नव-रोमन नागरिकत्वाच्या संकल्पनेचे जनक मानले जातात.त्यांच्या मते, पारंपरिक नगर राज्ये ही जमावाच्या शासनास, हुकूमशाही राजवटीस आणि अंतर्गत कलहांना सहज बळी पडू शकतील अशी होती. त्यामुळे गणराज्यात्मक मांडणीत स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी व्यक्तिगत स्वातंत्र्यावर भर देणाऱ्या संस्थात्मक व्यवस्थेची निर्मिती झाली. या व्यवस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये आढळतात, ती म्हणजे, कायद्याचे राज्य, न्यायालयीन पुनरावलोकन आणि प्रातिनिधिक शासन. मॉन्टेस्क्यू या फ्रेंच तत्वज्ञाने संस्थात्मक रचनेवर विशेष भर देत सत्ताविभाजनाचा सिद्धांत प्रसिद्ध केला. मॉन्टेस्क्यू यांच्या मते शासनाची तीन प्रमुख कार्ये- म्हणजेच कायदा बनवणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि न्यायदान करणे हे कुठल्याही एका व्यक्तीच्या किंवा सत्ताकेंद्राच्या हातात नसावीत. असे घडल्यास, ती सत्ता किंवा व्यक्ती जुलमी होण्याचा संभव असतो. म्हणूनच संविधानिक राज्यव्यवस्थेत सत्ताविभाजनाच्या सिद्धांताला विशेष महत्व दिले गेले आहे.

फ्रेंच विचारवंत ज्यां-जाक रूसो यांनी 'सामाजिक करार' (१७६२) या आपल्या ग्रंथात सामूहिक ईहेची संकल्पना मांडली. रुसो यांच्या मते, स्वहित आणि व्यक्तीइच्छेपलीकडे जाऊन व्यापक अशा सामूहिक इहेचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कुठल्याही राज्यव्यवस्थेत कायद्याचे काटेकोर पालन होणे अत्यंत आवश्यक बाब असते. कायद्याची आज्ञा पाळल्यानेच सामाजिक ऐक्य व न्याय प्रस्थापित होते. अर्थात, इथे सामाजिक ऐक्य, न्याय व स्थैर्य हे एका प्रकारचे सामूहिक हित (common good) आहेत आणि रूसोच्या सामूहिक इहेच्या विचाराप्रमाणे ते साधले गेले पाहिजे. स्वहिताचा त्याग करून सामूहिक हिताचा विचार करणे यातून लोकांमधील नागरिकतेची भावना व सहभाग या गणराज्यात्मक वैशिष्ट्ये सिद्धे होतात.

१७८९च्या फ्रेंच राजक्रांतीत राजेशाहीविरुद्धच्या बंडात दोन प्रमुख मागण्या आढळतात. त्यात राजकीय व्यवस्थेत नागरिकांना समान वागणूक आणि सक्रिय सहभागाची हमी यांचा समावेश होतो. घटनात्मक प्रक्रियेने अस्तित्वात आलेला 'मानवी हक्काचा जाहीरनामा' हा उदारमतवादी आणि गणराज्यात्मकवादी चौकटींमध्ये समन्वय घडवून आणतो. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की फ्रेंच राज्यक्रांतीवर नागरी गणराज्यवादी (civic republicanism)

व्यवस्थेचा प्रभाव होता. थोडक्यात, फ्रेंच राज्यक्रांतीत निरंकुश व अनियंत्रित सत्तेविरुद्ध स्वातंत्र्य, स्वायत्तता, समतेच्या आणि लोकसहभाग या तत्वांवर आधारलेली संविधानात्मक राज्यव्यवस्थेचा विकास झाला.

नागरिकांचा सार्वजनिक उपक्रम व संस्थांमधला सहभाग हा व्यक्ती आणि समाज या दोहोंसाठी फायदेशीर ठरतो.

### टीकात्मक विवेचन

काही विचारवंतांनी उदारमतवादी नागरिकत्वाच्या संकल्पनेतील उणिवा आणि त्रुटी अधोरेखित करत रिपब्लिकन तत्वांना धरून एका नव्या संकल्पनात्मक रचनेची म्हणजेच नव-रिपब्लिकनवादाची निर्मिती केली. परंतु ग्रीको-रोमन संस्कृतीत उदयास आलेले रिपब्लिकन नागरिकत्व हे आजच्या अव्यवहार्य आहे. मायकल वॉल्झर (१९८९) यांनी त्याची दोन मुख्य कारणे सांगितली आहेत. राज्यसंस्था व राजकीय प्रक्रियेचे आजचे परिमाण आणि जटिलता कित्येक पटीने वाढलेली आहे. अशात रिपब्लिकनवादात अभिप्रेत असेलला सक्रिय नागरी सहभाग घडवून आणणे जवळजवळ अशक्य आहे. अलीकडच्या काळात नागरिक बिगर-राजकीय किंवा राजकीय कक्षेबाहेरील सामाजिक, आर्थिक किंवा कौटुंबिक कामांना प्राधान्य देऊ शकतात. आधुनिक राष्ट्र-राज्यांमध्ये अधिक विविधता (heterogeneity) असते आणि त्यामुळे तिथे नागरिकांमध्ये 'नैतिक ऐक्य' आणि परस्परांवरील विश्वास निर्माण होऊ शकत नाहीत. लोकांमधील नैतिक ऐक्य आणि एकमेकांवरील विश्वास हा रिपब्लिकन व्यवस्थेचा गाभा आहे.

### ३ब.**१.३ उदारमतवादी नागरिकत्व**

एकोणीसाव्या शतकात उदारमतवादी विचारधारेसोबतच भांडवली हितसंबंधांचा प्रभाव वाढला. याच व्यवस्थेत पुढे नागरिकत्वाच्या रिपब्लिकन सिद्धांताचा पाडाव करून उदारमतवादी नागरिकत्व रुपास आले. यात सामाजिक कराराचा सिद्धांत मांडणारे विचारवंत थॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक यांचे महत्वाचे योगदान आहे.

थॉमस हॉब्ज यांचे योगदान हे महत्वाचे पण अप्रत्यक्ष स्वरूपाचे आहे. हॉब्ज यांच्या मांडणीत व्यक्ती (individual) आणि शासनव्यवस्थेचा थेट संबंध लावलेला दिसतो. त्याआधीच्या विचारवंतांनी शासनव्यवहारात समूह, संस्था व वतनवाड्यांना (estate) महत्वाचे स्थान देऊ केले होते. हॉब्ज यांनी ही परंपरा मोडीत काढत व्यक्तीला महत्वाचे स्थान दिले. याव्यतिरिक्त, थॉमस हॉब्ज यांनी आपल्या मांडणीत स्वातंत्र्य व समानतेची चर्चा केलेली आहे. त्यांच्या मते स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक हक्क आहे. त्याचबरोबर त्यांनी नैसर्गिक समतेचा विचार मांडला आहे. हॉब्ज यांच्या मते, शारीरिक आणि बौद्धिक पातळींवर विषमता असली तरी व्यक्तींमध्ये समानता असते. उदारमतवादी राजकारणातील काही मूलभूत घटक म्हणजेच व्यक्तिवाद (individualism), वैयक्तिक हक्क (individual rights) आणि समानता (equality) यांची मीमांसा केली आहे. वरील नमूद केलेल्या मूलभूत घटक जपण्यासाठी हॉब्ज 'सार्वभौम' (sovereign) शासनव्यवस्थेचा पुरस्कार करतात.

सन १६८९ मध्ये 'Two Treatises of the Civil Government' या आपल्या ग्रंथाद्वारे जॉन लॉक यांनी उदारमतवादी संरचनेच्या गाभ्याशी असलेले 'जीवन, स्वातंत्र्य आणि

मालमत्तेचे' संरक्षण हे सूत्र मांडले. या सूत्राचा विस्तारित अर्थ असा की 'आपण आपले व इतरांच्या (व्यक्तींच्या) जीविताचे रक्षण करावे आणि कोणीही इतरांचे स्वातंत्र्य आणि मालमत्ता हिरावून घेण्याचा प्रयत्न करु नये'. लॉक यांनी इथे हॉब्ज यांनी घालून दिलेल्या नैसर्गिक हककांच्या चौकटीचा आधार घेतला आहे. परंतु या हक्कांची चौकट झुगारल्यास दंड किंवा शिक्षा करणारी यंत्रणा एका विशिष्ट सामाजिक कराराद्वारे स्थापन झाली असे लॉक यांचे मत आहे. याच यंत्रणेचे पुढे राज्यसंस्थेत रुपांतर झाले. जॉन लॉक यांच्या मांडणीत व्यक्तीचे स्वातंत्र्य व स्वहित या दोन संकल्पना प्रकर्षाने पुढे येतात.

हॉब्ज आणि लॉक यांच्या सैद्धांतिक मांडणीत राज्यसंस्था, अधिकार आणि समानता या संकल्पना अधिक विकसित झाल्या. नैसर्गिक अधिकारांच्या या तटबंदीवर पुढे उदारमतवादी मूल्यांवर आधारित शासनव्यवस्था आणि त्याला पूरक अशी नागरिकत्वाची व्याख्या विकसित झाली. भांडवली अर्थव्यवस्थेत उदारमतवादी नागरिकत्व ही संकल्पना अधिक रुजली. उदारमतवादाच्या नैतिक आणि सैद्धांतिक जाणिवा या प्रबोधन काळात जन्माला आल्या. बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकनिष्ठा अशा तत्वांबरोबरच व्यक्तिवादाचा (individualism) विचार रुजू लागला. 'व्यक्तिवाद' किंवा 'व्यक्तीचे अधिकार' ही भांडवलशाहीतली मध्यवर्ती अशी संकल्पना आहे. उदारमतवादी समाजात व्यक्ती स्वतंत्र आणि स्वायत्त राहणे पसंत करते. हे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता प्रामुख्याने समाजाच्या हस्तक्षेपाविरुद्ध मागितलेले संरक्षण असते. 'किमान शासन' या धोरणात्मक तत्वानुसार चालणाऱ्या उदारमतवादी शासनप्रणालीत बाजारपेठेत किंवा व्यक्तिगत जीवनात राज्यसंस्थेचा कमीतकमी हस्तक्षेप असतो. उदारमतवादी शासनव्यवस्थेत नागरिकांवर फारशी कर्तव्ये लादलेली नसतात. मात्र या आधीची प्रचलित पद्धतीत, म्हणजेच रिपब्लिकन नागरिकत्व नागरिकांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांबाबत आग्रही भूमिका घेते. तुलनेने उदारमतवादी व्यवस्थेत ही सभासदत्वाची भावना कमी दिसते.

भांडवलशाही आपल्या सर्वोच्च शिखरावर असताना नागरिकांचे अधिकार वृद्धिंगत झाले होते. या अधिकारांद्वारे नागरिकांना आपल्या खासगी हिताचे संरक्षण व प्रचार करण्याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. या विस्तृत अधिकारक्षेत्रात नागरिकांना सरकारी हस्तक्षेपाविरुद्धदेखील काही विशेष अधिकार प्राप्त झाले. अधिकारांसोबतच समानता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरु होते. नागरिकत्वाच्या उदारमतवादी प्रारूपात 'कायद्यापुढील समानता' (कायद्याअंतर्गत समान वागणूक) हे महत्वाचे घटक आहे. उदारमतवादी शासन कोणत्याही समूहाला कायदेशीर विशेषाधिकार देत नाही. मुक्त आणि समान नागरिक घडवण्याच्या दृष्टीने वंश, वर्ग, जात, लिंगभाव, धर्म इत्यादि अस्मितांवर आधारलेले भिन्नत्व हे अप्रस्तूत ठरवले गेले आणि त्यामुळे नागरिकत्व ही एक सर्वसमावेशक संकल्पना म्हणून पुढे आली. किंबहुना, इतर सामाजिक, सांस्कृतिक, व आर्थिक जाणिवांमधून घडलेल्या अस्मितांना व त्यातून निर्माण झालेली विषमता आणि मागासलेपण सोयीस्कररीत्या दुर्लक्षित करून समान नागरिकत्व हेच एक प्रमुख अस्मितादर्शक म्हणून पुढे येते. सामाजिक, सांस्कृतिक, व आर्थिक अस्मितांच्या श्रेणीबद्दतेमुळे सामान कायदेशीर दर्जा असूनही वंचित समूहांना राजकीय-सामाजिक जीवनात सामान प्रतिनिधित्व व सहभागाच्या संधी प्राप्त होत नाहीत. आणि म्हणूनच उदारमतवादी चौकट ही औपचारिक स्वरूपाच्या कायदेशीर समानतेचे (formal equality) मूलभूत समानतेत (substantive equality) रूपांतर करण्यास असमर्थ ठरते.

## सामाजिक नागरिकत्व

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात उदारमतवादी विचारधारेत काही आमूलाग्र बदल झाले. या काळात अभिजात उदारमतवादी विचारांना आधुनिक उदारमतवादी विचारांनी आव्हान दिले होते. अशा परिस्थितीत उदारमतवादी नागरिकत्वाच्या समजुतीदेखील बदलत होत्या. **टी.एच.मार्शल** या ब्रिटिश समाजशास्त्रज्ञाने आपल्या सैद्धांतिक मांडणीत हे बदल अचूक टिपले आहेत. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात नागरी आणि राजकीय अधिकारांना अधिष्ठान लाभले. उदारमतवादी तत्वज्ञानाप्रमाणे नागरी अधिकारांचा वापर करत सामाजिक आणि आर्थिक असुरक्षितता दूर केली जाऊ शकते. त्यामुळे राज्यसंस्थेकडून सामाजिक-आर्थिक सुरक्षांची अपेक्षा केली जाऊ शकत नाही. मार्शल यांनी या प्रचलित धारणेपासून फारकत घेत वेगळी भूमिका मंडली. नागरी हक्कांना सामाजिक हक्कांची जोड असावी असे प्रतिपादन मार्शल करतात. यातूनच सामाजिक नागरिकत्व या संकल्पनेचा उदय झाला. सामाजिक नागरिकत्वाची परिपूर्ती करण्यासाठी सामाजिक सुरक्षा पुरवण्याकडे कल असलेल्या राज्यसंस्थेची म्हणजेच 'कल्याणकारी राज्य' हि संकल्पना विकसित झाली. सामाजिक कल्याण हे सामाजिक अधिकाराच्या कक्षेत आले. आणि सामाजिक व आर्थिक स्वरूपाच्या काही मूलभूत वस्तू आणि सेवा पुरवण्याची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली.

**जॉन रॉल्स** या राजकीय विचारवंताने उदारमतवादी नागरिकत्वाच्या सैद्धांतिक मांडणीत मोलाचे योगदान दिले आहे. रॉल्स हे सामाजिक वस्तू आणि सेवांच्या पुनर्वितरण याबाबत आग्रही भूमिका मांडतात. त्यांच्या मते वस्तू आणि सेवांच्या असमान वाटपामुळे प्रचंड विषमता निर्माण झाली आहेत. आणि म्हणूनच पुनर्वितरणाच्या प्रक्रियेतून समाजातील वंचित व मागास समूहांचा विकास झाला पाहिजे. पुनर्वितरणाची ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी एका तटस्थ व्यवस्थेची म्हणजेच राज्यसंस्थेची गरज लागेल. रॉल्स यांच्या मते, सामाजिक-आर्थिक हक्काचे सामान वाटप/ वितरण आणि सामाजिक सबलीकरण हे तत्व कुठल्याही नागरिकत्वाच्या संकल्पनेचा मूळ आधार आहेत.

## स्वातंत्र्यवादी सिद्धांत

मार्गारेट थॅचर यांच्या कार्यकालात ब्रिटनमध्ये उदारमतवादी नागरिकत्वाच्या सामाजिक व्याख्येला छेद देत स्वातंत्र्यवादी नागरिकत्वाचा संकल्पनेचा विकास झाला. हुजुर पक्षाच्या राजवटीत सामाजिक हक्क आणि कल्याणकारी धोरणांना बाजूला सारले गेले. **रॉबर्ट नॉझिक** हे या नव-अभिजात उदारमतवादी प्रारूपाचे मुख्य पुरस्कर्ते होते.

आपली मूल्ये/मूल्यव्यवस्था जपणे किंवा गरजा भागवणे या मानवाच्या नैसर्गिक प्रेरणा आहेत. या प्रेरणांची पूर्तता व्यक्तीच्या खाजगी परिघात, नागरी समाजातील सहयोगाने किंवा बाजार विनिमायाद्वारे पूर्ण होऊ शकते. या निमित्ताने इथे पुन्हा एकदा अभिजात उदारमतवादी विचारांवर भर देण्यात आला. त्यांतील व्यक्तिवाद (individualism) आणि मालमत्ता हक्क (लॉकच्या मांडणीतला) प्रकर्षाने अधोरेखित होतात. स्वातंत्र्यवादी मांडणीनुसार मालमत्तेचे रक्षण हे राज्यसंस्थेचे प्राथमिक कर्तव्य आहे.

**नव-गणराज्यात्म्क (नव-रिपब्लिकनवाद):** विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदारमतवादी नागरिकत्वाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. पुढे उदारमतवादी शासनप्रणालीच्या सैद्धांतिक

समीक्षेतून नव-गणराज्यवाद उदयास आला. काही टीकाकारांच्या मते, उदारमतवादी नागरिकत्वाच्या शासनप्रणालीत नागरिक राजकीय प्रक्रियेपासून दूर जातात. नागरिकांमध्ये एक प्रकारचे राजकीय औदासिन्य आणि निष्क्रियता निर्माण होते. शानतेल मुफ यांनी 'डायमेन्शन्स ऑफ रॅडिकल डेमोक्रसी' (१९९२) या आपल्या पुस्तकात राजकीय निष्क्रियतेचे विवेचन केले आहे. मुफ यांच्या मते, अशा प्रकारच्या निष्क्रियतेचा बिमोड करण्यासाठी नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सहभाग अधिक दृढ केला पाहिजे. यातून नागरिकांचे सक्षमीकरण होईल, मतभेद व्यक्त करणे शक्य होईल व आपल्या सामायिक समस्या शासनापुढे मांडून राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग नोंदवता येईल. मुफ यांच्या मांडणीत उदारमतवादी विचारप्रणालीतील लोकशाही व्यवस्था व रिपब्लिकन तत्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न झाला आहे.

मायकल वॉल्झर यांनी मुफ यांच्या मांडणीतील नागरिकांच्या सक्रिय सहभागाबद्दल काहीसे वेगळे मत नोंदवले आहे. वॉल्झर यांच्या मते, सक्रिय नागरिकत्व केवळ राजकीय प्रक्रियेतील सहभागापुरते सीमित नसून त्यात नागरी समाजातील स्वयंसेवी संस्था, दबावगट यांमधला सहभागसुद्धा तितकाच महत्वाचा आहे. अशाप्रकारच्या सहभागातून परस्परांच्या सहकार्याने काही एक प्रकारची नागरी गुणवत्ता (civic virtues) निर्माण होऊ शकते.

### ३ब.**१.४ वैश्विक/ सार्वत्रिक नागरिकत्व**

इंग्लिश समाजशास्त्रज्ञ टी .एच. मार्शल यांनी वैश्विक नागरिकत्वाची संकल्पनात्मक मांडणी की केली. मार्शलने यांनी केलेल्या व्याख्येप्रमाणे नागरिकत्व हे 'एखाद्या राजकीय समुदायाचे / समाजाचे पूर्ण आणि सामान सदस्यत्व' होय. मार्शल यांनी 'सिटिझनशिप अँड सोशल क्लास' (१९५०) या आपल्या शोधनिबंधात नागरिकत्वाच्या तीन प्रमुख घटकांचे विश्लेषण केलेले आहे, ते पुढीलप्रमाणे:

**नागरी हक्क** : नागरी हक्क हे मुळात नकारात्मक हक्कांच्या परिघात मोडतात. व्यक्तिगत किंवा सामाजिक जीवनात कमीतकमी सरकारी हस्तक्षेप असावा या नकारात्मक हक्कांच्या तत्वावर नागरी हक्कांचा विकास झाला आहे. यात प्रामुख्याने समानतेचा हक्क आणि अनेक प्रकारच्या इतर स्वातंत्र्याचा जसे - अभिव्यक्ती, संचार व सद्सदविवेकबुद्धी, मालमत्ता इत्यादी- समावेश होतो.

**राजकीय हक्क**: या हक्कांद्वारे राजकीय सहभाग सुनिशचित करता येतो. त्यात प्रामुख्याने मताधिकार, निवडणुकीद्वारे स्पर्धात्मक राजकारणात प्रत्यक्ष सहभाग नोंदवणे आणि सार्वजनिक क्षेत्रात अधिकारपद (public office) भुषवणे यांचा समावेश होतो.

**सामाजिक हक्क**: सामाजिक हक्कांचे मूळ उद्धिष्ट हे व्यक्तीला किमान सामाजिक दर्जा आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे आहे. या उद्दिष्टांची पूर्तता राज्यसंस्था सामाजिक हमीचे कार्यक्रम राबवून करत असते. अशा व्यवस्थेला कल्याणकारी राज्यव्यवस्था असे नाव देण्यात आले आहेत.

मार्शल यांनी मांडलेल्या हक्कांची त्रयी ही मुळात एका उत्क्रांतीचा भाग आहे. अठराव्या शतकात हळूहळू हक्कांचा चौकट विस्तारत करत होती. त्यात समान नागरी हक्क, भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, मालमत्तेशी निगडित हक्क आणि न्याय हक्कांचा विकास

झाला. थोडक्यात, समानता आणि स्वातंत्र्याच्या हक्कांना आता कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले होते. कायद्याच्या राज्यात पुढे एकोणिसाव्या शतकात मताधिकाराची कक्षा वाढल्याने खऱ्या अर्थाने राजकीय हक्कांचे सार्वत्रिकीकरण झाले. याच काळात इंग्लंडमध्ये प्रातिनिधिक लोकशाहीची रुजवात झाली. पुढे विसाव्या शतकात सामाजिक नागरिकत्वाचा उदय होऊन धोरणात्मक बदल घडले. या बदलांमध्ये आधी अस्तित्वात असलेल्या हक्कांमध्ये भौतिक संसाधने व सामाजिक सेवांचा समावेश होता. नागरी हक्कांप्रमाणेच राज्यसंस्थेने सामाजिक हक्कांचीदेखील तजवीज करायची आहे. राज्यसंस्थेचे हे प्रारूप पुढे कल्याणकारी राज्य म्हणून युरोपात आणि इतर खंडांमध्ये रुजले. युरोपातील काही राष्ट्रांनी आरोग्यसेवा, शिक्षण, गृहनिर्माण, आणि सामाजिक विमा यांचे धोरणात्मक पातळीवर सार्वत्रिकीकरण केले. एकूणच, मार्शल यांनी उदारमतवादी प्रवाहापासून फारकत घेत, सामाजिक-आर्थिक सहाय्य करणे हे केवळ दयावृत्तीतून आलेले दान नसून राज्यसंस्थेचे आद्य कर्तव्य आहे अशी महत्वाची मांडणी केली.

मार्शल यांच्या विवेचनात **दोन** महत्वाचे घटक आढळतात:

१. राजकीय समाजात अस्तित्वात असलेल्या श्रेणीबद्ध विषमतेचा प्रतिकार करणे

२. वंचित व दुर्लक्षित समूहांना पूर्ण नागरिकत्व बहाल करणे

सार्वत्रिक नागरिकत्वाच्या दोन तत्वांवर प्रामुख्याने टीका होते:

१. सार्वत्रिक नागरिकत्वाच्या सैद्धांतिक मांडणीत निरपेक्ष (तटस्थ) राज्यसंस्था हा एक महत्वाचा घटक आहे. हे निरपेक्ष शासन 'कायद्यापुढे समान वागणूक' आणि 'कायद्याचे समान संरक्षण' या दोन घटनात्मक तरतुदींमार्फत समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. इथे समानतेचे मूळ उद्धिष्ट समान राष्ट्रीय संस्कृतीतून एकसंध समाजाची निर्मिती करणे हा आहे. अर्थातच, अशा व्यवस्थेत सांस्कृतिक, जातीय, लिंगभावात्मक, वांशिक अस्मितांना आणि त्यामुळे निर्माण झालेल्या सामाजिक मागासलेपणावरच्या चर्चेला स्थान दिले जात नाही. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बाबींमुळे विषमता असूनदेखील सर्वांना एकाच न्यायाने वागवण्याचा आग्रह इथे प्रकर्षाने दिसतो.

२. १९८०च्या शेवटाकडे सार्वत्रिक नागरिकत्वावर बहुसंख्यांकवादी असल्याची टीका झाली. समाजाचे एकत्रीकरण करण्यासाठी अवलंबिलेल्या धोरणांमध्ये बहुसंख्य समाजाच्या धारणांना अधिक वाव दिला जातो. यामुळे एकत्रीकरणाचे मूळ उद्धिष्ट साधले जात नाही.

### ३ब.**१.५ भिन्न नागरिकत्व (Differentiated Citizenship)**

उदारमतवादी नागरिकत्वाच्या संकल्पनेत समाजातील सांस्कृतिक फरकांकडे व विविधतेकडे फारसे लक्ष दिले जात नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे उदारमतवादी विचारवंत हे नागरिकत्वाची व्याख्या करताना राष्ट्रीय अस्मिता, भाषा, वंश आणि सांस्कृतिक इतिहास यांकडे अधिक लक्ष पुरवत होते आणि त्यानुसार मांडणी केली जात होती. ज्या फरकांची मुख्यतः चर्चा केली जात होती ते केवळ वर्गावर आधारलेले होते. ज्या समाजांमध्ये धार्मिक, वांशिक. भाषिक किंवा सांस्कृतिक विविधता आहे, तिथे नागरिकत्वाची उदारमतवादी व्याख्या निश्चितच तोकडी पडते. उदारमतवादी नागरिकत्वाचे प्रारूप सामायिक राष्ट्रीय अस्मितेचा विकास करू पाहते. यामध्ये एक प्रबळ अस्मिता असते जी इतर अस्मितांना

वेगवेगळ्या मार्गांनी सामावून घेते. हे मार्ग किंवा धोरणे ही अर्थातच प्रबळ सांस्कृतिक अस्मितेच्या प्रभावाखालीच ठरवली जातात. त्यामुळे सध्याच्या काळात भिन्न नागरिकत्वाचे प्रारूप विकसित केले जात आहे ज्याद्वारे वेगळ्या (मुख्यतः अल्पसंख्यांक) राजकीय, वांशिक आणि भाषिक अस्मितांना सामावून घेतले जाऊ शकते.

भिन्न नागरिकत्वाची व्याख्या "राष्ट्रातील अल्पसंख्यांक गट आणि वांशिक समुदायांना गटांवर आधारित विशेष कायदेशीर किंवा संवैधानिक हक्क बहाल करणे" अशी करता येईल. आयरिस मॅरियन यंग यांनी भिन्न नागरिकत्वाची संकल्पना रूढ केली, जी प्रामुख्याने स्वीकृति आणि गटांतील फरकांना सामावून घेणे यावर आधारभूत आहे. यामध्ये माणसांना समाजात स्वतंत्र व्यक्ती म्हणून सामावून घेणे, त्याचप्रमाणे त्या त्या विशिष्ट गटांतील सदस्य म्हणूनही स्वीकृत करणे अपेक्षित असते. या संकल्पनेनुसार जेव्हा अशा व्यक्तींना हक्क बहाल केले जातात, त्यावेळेस ते त्यांच्या विशिष्ट गटामधील सदस्यत्वावरही काही प्रमाणात आधारलेले असावेत असे मानले जाते. यंग यांच्या मते जर अल्पसंख्यांक गटांना निर्णयप्रक्रियेत पूर्णपणे सहभागी करून घ्यायचे असेल, तर त्यांच्यासाठी विशेष तरतुदी करणे आवश्यक आहे.

'अल्पसंख्यांक गट हे नेहमीच शोषित असतात' या आयरिस यंग यांच्या प्रतिपादनात काही मूलभूत समस्या आहेत. यामध्ये अल्पसंख्यांक गटांतील बुरसटलेल्या आणि प्रतिगामी पद्धतींचे विवेचन केलेले नाही. नंतर काही वर्षांनी विल किमलिका यांनी भिन्न नागरिकत्वाच्या चर्चेत आणखी भर घातली आणि अल्पसंख्यांकांच्या हक्कांची उदारमतवादी मांडणी केली. किमलिका यांच्या मते अल्पसंख्यांकांचे हक्क हे मानवी हक्कांच्या सोबतीने येतात. त्यामुळे इतर उदारमतवादी तत्वे आणि मूल्ये जसे स्वातंत्र्य, लोकशाही आणि न्याय यांच्या कक्षेत या हक्कांचे विश्लेषण करणे आवश्यक असते. यापद्धतीने किमलिका भिन्न नागरिकत्वाच्या संकल्पनेचा विस्तार करतात, ज्यामध्ये लोकशाहीवादी नागरिकत्वाच्या परिघात देशातील अल्पसंख्यांक गटांच्या आणि वांशिक गटांच्या मागण्याही सामावून घेण्यात याव्यात, असे विवेचन केले गेले.

किमलिका यासाठी दोन तरतुदी सुचवतात-

**अ)** सर्व नागरिकांच्या समान हक्कांचे संरक्षण करणे- यामध्ये धर्माचे स्वातंत्र्य, संघटनेचे स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संचार स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. गटांतील भिन्नतेचे संरक्षण करण्यासाठी ते महत्वाचे ठरतात.

**ब)** सांस्कृतिक विविधता सामावून घेणे- त्यासाठी विशेष कायदेशीर आणि संवैधानिक तरतुदी करणे किंवा विशिष्ट समुदायांना व गटांना भिन्नतेच्या आधारावर विशिष्ट हक्क बहाल करणे.

किमलिका त्यापुढे जाऊन अल्पसंख्यांक तसेच स्थलांतरित समुदायांसाठी विशेष हक्कांची विस्तृत मांडणी करतात -

१. **स्व-शासनाचे हक्क (Self Government Rights)** : बहूराष्ट्रीय देशांनी निरनिराळ्या सांस्कृतिक गटांच्या स्वतःचे शासन स्थापित करण्याच्या मागण्या समजून घ्यायला हव्यात. असे हक्क दिल्यामुळे या गटांना राजकीय स्वायत्तता किंवा वेगळे प्रादेशिक

कार्यक्षेत्र बहाल करता येते. त्यामुळे मोठ्या राज्यात सामिलीत होण्यापूर्वीचे त्यांचे अधिकार कायम राहतात.

२) **बहु-वांशिक हक्क (Poly-ethnic rights)** : बहु-वांशिक हक्क हे विशिष्ट समुदायाला दिलेले अधिकार असतात. यामागे असा उद्देश असतो की या वांशिक समुदायांना देशांतर्गत संरक्षण मिळावे, त्यांच्या विशिष्ट संस्कृतीचे जतन व रक्षण व्हावे. या गटांना त्यांचे भिन्नत्व व त्यांची वेगळी संस्कृती जोपासण्याचा अधिकार असावा, असे यात अनुस्यूत आहे. त्यांच्यावर सरकारचा अथवा प्रस्थापित संस्कृतीचा कोणताही दबाव असू नये. स्व-शासनाच्या हक्कांपेक्षा बहु-वांशिक हक्क निराळे आहेत, कारण यात लहान गटांचे बहुसंख्य समाजात विलीनीकरण हे अपेक्षित आहे.

**३. विशेष प्रतिनिधित्वाचे हक्क (Special representation rights)** : लोकशाही नेहमीच समाजातील विविधतेला सुयोग्य न्याय देऊ शकेलच, असे नाही. विशेष प्रतिनिधित्वाच्या हक्कांचे उद्दिष्ट हे राज्यसंस्थेचे प्रारूप अधिकाधिक लोकशाहीवादी व्हावे हे आहे. विधिमंडळामध्ये अधिकाधिक सांस्कृतिक व वांशिक गटांचे प्रतिनिधित्व असायला हवे, हेही याअंतर्गत म्हटले आहे. यामध्ये विविध वांशिक समुदायांसोबतच महिला, दिव्यांग आणि गरीब व्यक्तींचाही समावेश केला गेला आहे. या सर्व लोकांचे शोषण थांबवणे आणि त्यांना स्वयं-निर्णयाचा अधिकार प्राप्त करून देणे आवश्यक आहे, हे इथे अधोरेखित होते.

भिन्न नागरिकत्वावर प्रामुख्याने दोन प्रकारे टीका झालेली आहे. पहिले म्हणजे, भिन्न नागरिकत्वाच्या अंतर्गत जी बहुसांस्कृतिक धोरणे स्वीकारली जातात त्यामुळे भेदभावमुक्त सार्वत्रिकीकरणाला आव्हान दिले जाते. ते एका बाजूला न्याय्य वाटले, तरी मुळात तो नागरिकत्वाच्या संकल्पनेचा गाभा आहे हे विसरून चालत नाही. त्यामुळे नागरिकत्वामार्फत जी विलीनीकरणाची प्रक्रिया अपेक्षित आहे, तो उद्देश साध्य केला जाऊ शकत नाही. त्यामुळे अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण करताना एकूण नागरिकांमध्ये जी ऐक्याची भावना वर्धित व्हायला हवी, ती होऊ शकेलच असे नाही. दुसऱ्या प्रकारची टीका ही समुदायांच्या हक्कांना गरजेपेक्षा जास्त महत्व देण्यावर आहे. असे करताना कदाचित व्यक्तीच्या हक्कांची पायमल्ली होऊ शकते. व्यक्तीला टीका करण्याचा किंवा नवनिर्मिती करण्याचा अधिकार उरत नाही. समुदायांना हक्क देताना समुदायाअंतर्गत असणाऱ्या भेदभाव व जाचक सामाजिक उतरंडीची चर्चा होईलच असे नाही. संस्कृतीचे संरक्षण करताना असेही होऊ शकते कि कुठल्याही बाह्य संरक्षणावर/बंधनांवर आक्षेप घेतला जाईल आणि समुदायांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये, अशीही मागणी केली जाईल- जी नेहमीच राष्ट्रासाठी हितकारक किंवा समुदायांतील प्रत्येक सदस्यासाठी न्याय्य असेलच असे नाही.

### ३ब.**१.६ नागरिकत्व आणि जागतिकीकरण**

नागरिकत्वाची व्याख्या सामान्यत: 'एखाद्या प्रदेशातील नागरिकाचे असे कायदेशीर स्थान ज्यामुळे एकसमान ओळख निर्माण व्हावयास मदत होते' अशी करता येईल. जागतिकीकरणामुळे नागरिकत्वाच्या या प्रादेशिक बद्धतेला मोठे आव्हान दिले आहे. त्यामुळे अर्थातच नागरिकत्व या संकल्पनेतही अनेक बदल घडून आले आहेत.

जागतिकिकरणामुळे अनेक देश आणि विविध देशांतील लोक यांच्यातील अंतर कमी झाले आहे, संपर्क वाढला आहे आणि त्याचबरोबर परस्परांवरील अवलंबित्वही वाढले आहे.

यामध्ये दोन प्रमुख गोष्टींचा उल्लेख करता येईल. पहिली म्हणजे जागतिकिकरणाच्या रेट्यात आंतरराष्ट्रीय सीमा खुल्या झाल्यामुळे वस्तू, सेवा, संपत्ती, माणसे आणि कल्पना यांचे मुक्त दळणवळण शक्य झाले. दुसरे म्हणजे, या मुक्त व्यापार आणि दळणवळणासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर विशेष संस्थात्मक बदल केले गेले.

जागितिकीकरणाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच आधुनिक व्यापारी संस्थांनी घेतलेले जागतिक स्वरूप, तंत्रज्ञानातील प्रगती, माहिती आणि संप्रेषणाच्या क्षेत्रात झालेली क्रांती इ. आहेत. त्यासोबतीने अनेक राजकीय तसेच वैचारिक घटकांचाही समावेश करता येतो, जसे- समाजवादी राज्यसंस्थाचा पाडाव आणि त्यामुळे झालेला पाश्चिमात्य उदारमतवादी राजकीय मूल्ये तसेच उदारमतवादी लोकशाहीचा प्रसार, विविध देशांत झालेला इस्लामी कट्टरवादाचा उदय आणि त्याने घेतलेले जागतिक स्वरूप इत्यादी. इतर राजकीय तसेच_पर्यावरणनिगडीत समस्या उदाहरणार्थ दहशतवाद, आम्ल पाऊस, ओझोन वायुचा पातळ होत चाललेला थर आणि जागतिक तापमानवाढ यांचीही चर्चा होणे येथे आवश्यक आहे. त्यामुळे जागतिकिकरण म्हणजे अर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि पर्यावरणीय बदलांची एक जटील प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. परिणामस्वरूप, परस्परांवरील अवलंबित्व अधिक वाढलेले आहे, वेगवेगळ्या लोकसमुहांमधला संवाद वाढला आहे आणि राष्ट्रांच्या सीमा जवळ आल्या आहेत.

मानवी हक्कांसंदर्भात काही जागतिक संज्ञा, संकल्पना आणि नियम आकारास येत आहेत. हे करण्यात अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आणि संघटना यांचा हातभार आहे, जसे संयुक्त राष्ट्र संघटना, युनेस्को, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, युरोपीय युनिअन (EU), यूरोपीय काउन्सिल (EC). जिनिव्हा करार, युरोपीय मानवी हक्क संघटना इत्यादी. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्कांसंदर्भात झालेल्या संहितीकरणामुळे आणि जागतिक नागरी हक्क संघटनांच्या उदयामुळे देशपातळीवर नागरिकत्वाच्या संकल्पनेत अनेक मुलभूत बदल घडून येत आहेत.

जॉन उरी यांनी आपल्या 'ग्लोबलायझेशन अँड सिटीझनशीप' (१९९९) या पुस्तकात आत्ताच्या जगात उदयास येणाऱ्यानागरिकत्वाच्या विविध प्रकारांच्या अनुषंगाने ‘उत्तर-राष्ट्रीय’ (Post-national) नागरिकत्व या संकल्पनेची चर्चा केली आहे. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो-

- **सांस्कृतिक नागरिकत्व-** यामध्ये वेगवेगळ्या समुदायांचा (जसे वांशिक, लैंगिक, लिंगभावात्मक, निरनिराळ्या वयोगटांतील लोक) समाजात सहभागी व्हायचा हक्क समाविष्ट होतो. (रिचर्डसन १९९८)
- **अल्पसंख्याक नागरिकत्व-** म्हणजे लोकांचा दुसऱ्या एखाद्या समाजात समान हक्क आणि कर्तव्ये मिळवण्याचा अधिकार आणि त्यांसहित त्या समाजात राहण्याचा अधिकार यांचा समावेश होतो. (युवाल-डेव्हिस १९९७)
- **परिस्थितीकीय नागरिकत्व-** यामध्ये पृथ्वीचे रहिवासी म्हणून माणसांना मिळायला हवेत अशा हक्क,अधिकार व कर्तव्यांचा समावेश होतो. (वॅन स्टीनबर्गन १९९४)

- **कॉस्मोपॉलिटन नागरिकत्व-** यात लोक जगातील इतर भागांतील नागरिक, समुदाय आणि संस्कृतींप्रति कसा दृष्टिकोन विकसित करतात याचा समावेश होतो. (हेल्ड १९९५)
- **ग्राहक नागरिकत्व-** यामध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील ग्राहकांचे हक्क म्हणजेच ग्राहकांना वस्तू , सेवा आणि माहिती यांचा योग्य पुरवठा होण्याचा अधिकार आहे, हे अधोरेखित केले जाते. (स्टीवनसन १९९७)
- **गमनशील नागरिकत्व** -दुसऱ्या प्रदेशांना आणि संस्कृतींना भेट देणाऱ्यांचे अधिकार आणि कर्तव्ये यामध्ये अभिप्रेत आहेत. (उरी १९९०)
- **देशांतरित नागरिकत्व-** यात देशांतरित समूहांचे अधिकार आणि कर्तव्ये यांचा समावेश होतो.
- **सायबर नागरिकत्व-** यात 'नेटिझन्स'च्या अधिकार आणि कर्तव्यांचा समावेश होतो.

या नागरिकत्वाच्या काही नवीन संकल्पना आहेत. यांमध्ये मार्शलच्या नागरिकत्व-त्रयीच्या (citizenship trilogy) मर्यादा लक्षात येतात, ज्यामध्ये केवळ राष्ट्र-राज्यातील सदस्यत्व हे नागरिकत्वाच्या केंद्रस्थानी गृहीत धरलेले आहे.

एखाद्या प्रदेशातील सदस्यत्व आणि अस्मिता या भोवती फिरणाऱ्या नागरिकत्वाच्या पारंपरिक व्याख्यांना जागतिकीकरणाच्या उदयानंतर आव्हान दिले गेले आहे. अनेक देशांमध्ये दुहेरी नागरिकत्वाची सोय आहे, तसेच नागरिक नसणाऱ्यांनाही ठराविक हक्क दिले जातात. यामुळे कुठल्याही देशाचे नागरिकत्व मिळवणे पूर्वीच्या तुलनेने सोपे झाले आहे.

**जागतिक नागरिकत्व:** एकविसाव्या शतकात वाढलेली संपर्कसाधने आणि बहुराष्ट्रीय चळवळी यामुळे जागतिक नागरिकत्व या संकल्पनेचा उदय झाला. या संकल्पनेत असे मानले जाते की सर्व व्यक्तींना या जगाचे नागरिक होण्याच्या नात्याने काही ठराविक अधिकार आणि कर्तव्ये मिळतात. पारंपरिकदृष्ट्या नागरिकत्वाच्या मुळाशी एखाद्या राष्ट्र-राज्यातील राजकीय समुदाय असतो असे मानले जाते. याच पारंपरिक दृष्टिकोनाला जागतिक नागरिकत्वाची संकल्पना आव्हान देते. एखाद्या प्रदेशात बद्ध असलेल्या नागरिकत्वाला ती जागतिक आयाम मिळवून देते.

यास्मिन सोयसाल (१९९४) यांच्या मते जागतिक नागरिकत्वाचा पाया 'जागतिक व्यक्तित्वा' (Universal Personhood) मध्ये आहे. जागतिक व्यक्तित्व हे नागरिकत्वाला आणि राष्ट्रामध्ये नागरिक म्हणून सामील होण्याला कोणत्याही कायदेशीर बाबींपासून वेगळे काढते. उदाहरणार्थ, युरोपीय देशांमधील 'पाहुणे कामगार' (गेस्ट वर्कर) हा प्रवर्ग युरोपात कित्येक वर्षे वास्तव्य करत आहे. त्यांना नागरिकत्व बहाल केले गेलेले नाही. ते तिथे वास्तव्य करू शकतात, कारण त्या त्या देशाने त्यांना काही कायदेशीर तसेच सामाजिक हक्क दिलेले आहेत.

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की जागतिकीकरणाच्या काळात नागरिकत्वाच्या प्रमाण व्याख्येत बदल झाला आहे. या व्याख्येनुसार नागरिकत्व हे देशाच्या सीमेअंतर्गत आणि देशाने दिलेल्या हक्कांनुसार ठरविले जात असे. आत्ताच्या काळात आंतरराष्ट्रीय संस्था किंवा प्रादेशिक संघटना आणि संस्था एकत्र मिळून मानवी हक्कांची व्याख्या ठरवत आहेत. भविष्यात या जागतिक समीकरणांमुळे सार्वभौमत्वाच्या आणि राष्ट्र-राज्यांच्या प्रादेशिकतेच्या संकल्पनांतही बरेच मोठे बदल होणार आहेत.

## ३ब.२ सारांश

अशाप्रकारे नागरिकत्वाची संकल्पना कालपरत्वे विकसित होत गेली असे म्हणता येईल. या संकल्पनेवर त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक घटनांचा आणि वेगवेगळ्या विचारधारांच्या प्रभाव पडत गेला. अनेक विचारवंतांनी त्यानुसार नागरिकत्व या संकल्पनेचे निरनिराळ्या प्रकारे विवेचन केले. या प्रकरणात आपण या उत्क्रांतीचा आणि विवेचनांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

नागरिकत्वासंदर्भातील समकालीन चर्चांमध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक प्रवाहांचा प्रभाव दिसतो. अलीकडच्या काळात नागरिकत्वाची संकल्पना व्यक्तिनिष्ठ चौकटीबाहेर पडून वर्गीय, वांशिक, लिंगभावात्मक अस्मिता जोपासते आहे. १९८० पासून जागतिकीकरण आणि बहुसांस्कृतिकवाद या विचारधारा अधिक प्रबळ होत गेल्या आणि त्यातूनच नागरिकत्वाच्या प्रचलित व्याख्या बदलत गेली. आजघडीला वाढत्या आंतर्देशीय स्थलांतरामुळे नागरिकत्वाच्या परिघात बहुसांस्कृतिकवाद, विविधता आणि भिन्नत्व यांबद्दलची चर्चा महत्वाची मानली जाते.

## ३ब.३ सरावासाठी प्रश्न

१. नागरिकत्वाचा संकल्पनात्मक विकास स्पष्ट करा.

२. गणराज्यात्मक नागरिकत्व म्हणजे काय?

३. उदारमतवादी नागरिकत्वाच्या संकल्पनेतील समस्या विशद करा.

४. टी. एच. मार्शल यांच्या नागरिकत्वाच्या संकल्पनेचे विवेचन करा.

५. जागतिकीकरणाच्या काळात नागरिकत्वाच्या संकल्पनेत कोणते बदल झाले आहेत? टीप लिहा.

## ३ब.४ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. Andrew, Heywood. Political Theory: An Introduction. Palgrave Macmillan, 2004.

२. Acharya, Ashok. Citizenship in a Globalizing World. Pearson Education India, 2011.

३. Bhargava, Rajeev. Political theory: An Introduction. Pearson Education India, 2008.

४. Gauba, O. P. An introduction to political theory. Macmillan, 2003.

५. Kymlicka, Will. Multicultural citizenship: A liberal theory of minority rights. Clarendon Press, 1995.

६. Urry, John. “Globalization and citizenship.” Journal of world-systems research (1999): 310-324.

७. Stanford Encyclopaedia of Philosophy, Citizenship, https://plato.stanford.edu/entries/citizenship/#TwoModeCitiRepuLibe (accessed online)


❇❇❇❇❇❇❇

# ३

# नवीन सैद्धांतिक चौकट

**घटक रचना**

3.१ प्रस्तावना

३.२ संरचनावाद

३.२.१ संरचना म्हणजे काय?

३.२.२ संरचनावाद म्हणजे काय?

३.२.३ क्लॉड लेव्ही स्ट्रॉसचे (Claude Levi Strauss) योगदान

३.२.४ संरचनावादाचे महत्व

३.२.५ संरचनावादाचे अपयश

३.२.६ निष्कर्ष

३.३ उत्तर संरचनावाद (Post- Structuralism)

३.३.१ उत्तर संरचनावादाच्या विकासास कारणीभूत घटक

३.३.२ उत्तर संरचनावाद आणि राजकारण

३.४ विखंडन (Deconstruction)

३.५ समीक्षात्मक सिद्धांत (Critical Theory)

३.५.१ समीक्षात्मक सिद्धांताचे आधार (Tenets of Critical Theory)

३.६ संदर्भ ग्रंथ

## 3.१ प्रस्तावना

मानवी जीवनाचा इतिहास हा परिवर्तनवादी दिसतो. कोणत्याही काळात मानव जात एका विशिष्ट स्थितीमध्ये कायमस्वरूपी राहिली नाही. मानवाने सतत उत्क्रांती केली आहे. उदाहरणार्थ आपली जीवनशैली, राहणीमान, खानपान हे प्राचीन काळापेक्षा सुखासीन,प्रगत दिसते. म्हणजेच त्यामध्ये आधुनिकतेची छाप आहे.

त्याचप्रमाणे राजकीय विचार हेसुद्धा काळानुसार बदलत गेले विकसित होत गेले. मग ते पाश्चात्त्य असो किंवा भारतीय राजकीय विचार असो. सध्याचे युग हे परिवर्तनाची युग आहे. प्रत्येक क्षेत्रात आधुनिकता, नाविन्य जोपासण्याची वृत्ती विकसित होत आहे. जीवनाचे प्रत्येक क्षेत्र मग ते सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अथवा औद्योगिक असेल या सर्व क्षेत्रात गतीने परिवर्तन होत आहे. आधुनिकीकरणाच्या या प्रक्रियेतून सर्वच राज्ये जात आहेत. हे सत्य आहे की आधुनिकीकरणाची ही महत्त्वपूर्ण आणि व्यापक प्रक्रिया सर्व देशात समान रूपाने होत नाही. काही देशात ही प्रक्रिया तीव्र गतीने होत असलेली दिसते. तर काही देशात

तिची गतिमंद असलेली दिसते. आधुनिकीकरणाच्या या संकल्पनेला सामाजिक किंवा राष्ट्रीय जीवनाच्या एका विशिष्ट घटकाशी अथवा विशेष भागाशी सीमित करता येऊ शकत नाही. सर्वच घटकांना आधुनिकीकरणाची प्रक्रिया प्रभावित करीत असते. अधिकांश विकासासाठी आधुनिकीकरणाचा एकच अर्थ घेतला जातो. परंतु या दोन्ही संकल्पनांना सारखेच समजणे योग्य नाही. याचे कारण असे की, विकास राष्ट्रीय जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील संबंधित असू शकतो जसे सामाजिक विकास, आर्थिक विकास, सांस्कृतिक विकास वगैरे. परंतु औद्योगिकरण संपूर्ण सामाजिक बदलाच्या घटकाशी संबंधित आहे.

प्रत्येकाची विचारधारा वेगळी असू शकते. आधुनिकतेला काही लोकांनी पाश्चात्यांकडून आलेली व्यवस्था मानले. तर काहींनी मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक असलेली
स्थिती मानले.

## ३.२ संरचनावाद (Structuralism)

१९ व्या शतकापर्यंत सर्वच सामाजिक शास्त्रांत संस्कृती/ समाजांच्या विकासाबाबत निश्चित धारणा स्विकारण्यात आली होती. त्यानुसार "संस्कृती/ समाजाचा विकास हा एकसमान आणि प्रगतीशील पद्धतीने होतो. म्हणजेच, बहुतेक सर्वच समाज हे विकासाच्या समान टप्प्यांतून जातात व शेवटी एका सामान्य टोकाला पोहोचतात" असे मानले जात असे. समाजशास्त्रज्ञ एमिल डर्खाईम यांनी या विचाराला छेद देत "*मानवी विचारांची उत्पत्ती ही निरिक्षणाच्याही आधी होत असते*" तसेच "*आजूबाजूला घडणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांचा उगम हा मानवी अनुभूतीतूनच होत असतो*" हे दोन विचार मांडले. क्लॉड लेव्ही स्ट्रॉस यांनी एमिल डर्खाईमच्या विचारात मोलाची भर घालत संरचनावादाचा (Structuralism) विकास केला. संरचनावाद ही १९५० च्या दशकात उदयास आलेली महत्वपुर्ण चळवळ मानली जाते. त्यामुळे क्लॉड लेव्ही स्ट्रॉसला संरचनावादाचा जनक (Father of Structuralism) असेही म्हणले जाते.

*संरचनावाद* या संकल्पनेचा सर्वप्रथम वापर फर्डिनांड डी सॉस्स्युर (Ferdinand De Saussure) यांनी Course in General Linguistic या भाषाशास्त्राच्या पुस्तकात केला. सॉस्स्युरने साहित्याची निर्मिती शब्दांच्या रचनेतून होत असल्याने ही शब्दरचनाच संरचनावादाचा आधार मानली.

संरचनावादात क्लॉड लेव्ही स्ट्रॉस (मानववंशशास्त्र), जॅकस मेरी एमिली लॅकन (मनोविश्लेषणशास्त्र), रोलँड बार्थस (साहित्यिक समिक्षा) आणि मिशेल फुको (विचारांचा इतिहास) या चार विचारवंतांचे योगदान महत्वपुर्ण मानले जाते. त्यामुळे त्यांना *संरचनावादातील चौकडी* (Gangs of Four in Structuralism) असे म्हटले जाते. याशिवाय लुईस अल्थुझर यानेही मार्क्सवादी सिद्धांताला संरचनावादाची जोड दिली. या विचारवंतांमुळे पौराणिक कथा, रक्तसंबंध, साहित्य, मानसशास्त्र, राजकीय संस्था आणि साहित्य अशा सर्वच क्षेत्रात संरचनावादाची उपस्थिती ठळक बनली.

संरचनावाद हा मानवी जगताला *संरचनेच्या माध्यमातून* समजून घेण्याचा मार्ग आहे. भौतिक जगाचा भाग असलेल्या गुरुत्वाकर्षण, सूर्यमाला, आकाशगंगा, इ. हे निश्चित मुलभूत नियमाच्या आधारे चालतात. भौतिक शास्त्रात प्रत्येक घटक हा भिन्न असून त्याचे चलनवलन हे निश्चित भौतिक नियमांनी होते. वैज्ञानिकांनी या नियमांना समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या नियमांचा अर्थ लावणे, डिकोड करणे यामुळे भौतिक जग हे अधिक आकलनिय बनले आहे. भौतिकशास्त्राच्या या दृष्टीकोनाची मानवी जगताला अंमलबजावणी करण्यावर तसेच अशाच भाषासूत्रातून सामाजिक संरचना समजण्याचा प्रयत्न संरचनावाद करतो.

संरचनावादाच्या माध्यमातून जॅकस लॅकन याने सिग्मंड फ्रॉईडच्या मानसशास्त्रीय तसेच गणिती तर्कशास्त्राचा मानवतेच्या मानसशास्त्रवरील तात्विक प्रभाव अभ्यासला. रोलँड बार्थसने सांस्कृतिक संबंधांच्या विश्लेषणाकरिता संरचनावादाचा वापर केला. याशिवाय, मिशेल फुकोच्या सुरवातीच्या लेखनात संरचनावादाची चर्चा आढळते. त्याने दंडव्यवस्थेच्या इतिहासाचे विश्लेषण, मानसिक आजार आणि ज्ञान यासारख्या घटकांचे विश्लेषण करण्यासाठी संरचनावादाचा आधार घेतला.

### ३.२.१ संरचना म्हणजे काय?

संरचना (Structure) म्हणजे "*विविध घटकांची अशी शिस्तबद्ध मांडणी जी वैशिष्ट्यपुर्ण आणि टिकाऊ रचना दर्शवते*". दैनंदिन जीवनात *संरचना* हा शब्द अशाप्रकारच्या जटील घटकांची सांगड दर्शवत असतो. उदा. एखाद्या इमारतीकरिता (Building) जेव्हा *संरचना* हा शब्द वापरला जातो तेव्हा त्यात त्या इमारतीचा पाया, भिंती, खिडक्या अशा सर्वच घटकांचा समावेश असतो. त्याचप्रमाणे जेव्हा इमारतीमध्ये एक ठराविक *संरचना* आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपणास त्या इमारतीच्या भौतिक घटकांपेक्षा या घटकांचा परस्परांशी कसा संबंध आहे हे सांगावयाचे असते.

राज्यशास्त्रात जेव्हा *संरचना* हा शब्द वापरला जातो तेव्हा विविध राजकीय घटकांची भौतिक रचना तपासण्यापेक्षा त्या घटकांचा परस्परसंबंध दर्शवण्यावर भर असतो.

### ३.२.२ संरचनावाद म्हणजे काय?

क्लॉड लेव्ही स्ट्रॉस याने संरचनावादाची व्याख्या पुढीलप्रमाणे मांडली आहे

*Structuralism is formal method of investigation whose operational value is to transpose the content of any message from one code to another in such a way that different levels of social reality can be apprehended.*

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास संरचनावादाचा आग्रह हा *विविध घटक अथवा परिस्थितीतील सहसंबंध शोधून त्याद्वारे मिळत्याजुळत्या घटक अथवा परिस्थितींशी त्यांना जोडणे, त्यातील साधर्म्य अथवा भेद शोधणे व त्याद्वारे समांतर बिंदू शोधण्यावर आहे*. उदा. क्लॉड लेव्ही स्ट्रॉस याने वेगवेगळ्या मानवी जमातींचा सांस्कृतिक अभ्यास करतांना रक्तसंबंध, सामाजिक/ धार्मिक प्रतिके यांमुळे संरचनांविषयी साम्य दर्शवणारी वैविध्यपुर्ण रचना (Pattern) निर्माण होते. ही रचना समस्त मानवजमातीचे एक व्यापक चित्र दर्शवते.

संरचनावाद हा विविध सामाजिक संबंध (Social Relations) आणि सांस्कृतिक उत्पादने (Cultural Product) (जसे कि, भाषा, पौराणिक कथा, साहित्य, रक्तसंबंध, प्रथा-परंपरा आणि नवनविन फॅशन्स) यांचे विश्लेषण करण्यात महत्वाची भूमिका बजावतो. संरचनावादातील हे विश्लेषण पुढील दोन स्तरांवर पार पडते-

- सामाजिक संबंध आणि सांस्कृतिक उत्पादनांचे विश्लेषण करतांना त्यातील घटकांपेक्षा (Substance) त्यांची रचना/ पद्धती (Pattern) समजून घेणे गरजेचे आहे.

- सामाजिक संबंध आणि सांस्कृतिक उत्पादनांचे असे विश्लेषण पृथक/स्वतंत्रपणे (Isoloated) न करता ते एकत्रितपणे कसे काम करतात या दृष्टीक्षेपात झाले पाहिजे.

### ३.२.३ क्लॉड लेव्ही स्ट्रॉसचे (Claude Levi Strauss) योगदान-

१९५०-६० च्या दशकात फ्रान्समध्ये संरचनावादाने जोर धरला होता. अशावेळी क्लॉड लेव्ही स्ट्रॉस याने संरचनावादाचे उपयोजन मानववंशशास्त्रात केले. स्ट्रॉस याने संरचनावादातील विश्लेषणाची ठळक वैशिष्ट्ये सांगितली. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- ठाम बौद्धिक दृष्टीकोन (Resolutely Intellectual Approach)

- पद्धतशीर व्यवस्थेच्या बाजूने पूर्वाग्रह (a bias in favor of systematic arrangements)

- यांत्रिक किंवा अनुभवजन्य उपायांवर अविश्वास (a mistrust of mechanistic or empirical solutions)

- अचेतन स्वरुपातील उपसंरचनांची नोंद (to account the unconscious substructures)

स्ट्रॉसने संरचनावादाची चर्चा करतांना डर्खाईमच्या वर मांडलेल्या मूलभूत संकल्पनेचा विस्तार केला. स्ट्रॉसच्या मते, *सामाजिक संरचनांचे* (Social Structure) आकलन हे मानवी मनाकडून *सचेतन* (Conscious) आणि *अचेतन* (Unconscious) अशा दोन्ही स्तरांवर होत असते. या दोन्ही स्तरांना एकत्रितपणे *बोधात्मक संरचना (Cognitive Structure)* म्हणता येईल. बोधात्मक संरचना म्हणजे अशी संरचना ज्यात व्यक्ती आपल्या आजूबाजूला असलेल्या सामाजिक संबंध आणि सांस्कृतिक उत्पादनांबद्दल ज्या पद्धतीने विचार करते आणि समजते. त्यामुळे सामाजिक संरचनांचे विश्लेषण दोन टप्प्यांवर करता येईल.

- पहिल्या टप्प्यात समाजातील विविध मिथके (Myths), प्रथा-परंपरा, भाषा अथवा कोणत्याही मानवी निर्मितीची स्पष्ट अभिव्यक्ती दर्शवण्यात येते. या टप्प्यात वरील घटकांत तर्कसंगत सहसंबंध (Logical Coherence) असेलच असे नाही.

- दुसऱ्या टप्प्यात मानवी मनाच्या अचेतन बाजूला वरील घटकांची शिस्तबद्ध, सुसूत्र आणि नियमांवर आधारित मांडणी करण्यात येते.

लेव्ही-स्ट्रॉसच्या मते, सामाजिक संरचना या व्यक्तीच्या बोधात्मक संरचनांचे प्रतिबिंब असतात.

भाषा, पौराणिक कथा, साहित्य, रक्तसंबंध, प्रथा-परंपरा आणि नवनविन फॅशन्स यामुळे व्यक्तीचे मानवी वर्तनाच्या संरचना निश्चित होत असतात. संरचनावाद अशा मानवी वर्तनाच्या संरचनांना विलग (Isolate) करते. मानवी मन हे प्रत्येक वस्तुचे आकलन करण्यासाठी *परस्परविरोधी द्विआधारी (Opposite Binary)* निकषांचा आधार घेत नियम ठरवत असते. उदा. घराबाहेर वावरतांना शूज घालणे हे **योग्य** तर घरात वावरतांना शूज घालणे **अयोग्य** मानले जाते. मानवी मनाच्या या परस्परविरोधी द्विआधारी निकषांचा घेत निर्माण होणाऱ्या नियम समजून घेतले कि आजूबाजूच्या समाज, राज्यव्यवस्था आणि संस्कृतीचे आकलन समजणे शक्य होते. संरचनावादाचे व्यापक विश्लेषण करतांना क्लॉड लेव्ही स्ट्रॉस याने भौतिक परिस्थितीमुळे तसेच द्विआधारी निकषांच्या आधारे सर्व मानवी संस्कृतींमध्ये डावे-उजवे, योग्य- अयोग्य, नैतिक- अनैतिक असे सर्वमान्य नियम निश्चित झाले आहेत असे मत मांडले.

परस्परविरोधी द्विआधारी संकल्पनेचा आधार घेत जीवन- मृत्यु, संस्कृती- निसर्ग, स्व- इतर यासारख्या परस्परविरोधी परंतू परस्परांना पुरक संकल्पनांचा जन्म झाला. या संकल्पना परस्परविरोधी तरीही पुरक असल्याने त्यातून *विरोधातील ऐक्य (Unity of Opposites)* निर्माण झाले आहे. प्रत्येक संस्कृती या संकल्पनांच्या आधारे आपले वेगळेपण टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते. वैश्विक कल्पना आणि परस्परविरोध यांना संस्कृतीच्या एका विशेष टप्प्यावर एकत्र आणल्या रचनाबद्ध आणि संघटीत समाजाची निर्मिती होऊ शकते असे क्लॉड लेव्ही स्ट्रॉस याला वाटते. स्ट्रॉस याने या तर्काचा आधार घेत *सर्व मानवांच्या विचाराचा पाया समान असून वेगवेगळ्या संस्कृतींचा झालेला विकास हा समान पायातून झाला आहे* असा विचार मांडला. त्यामुळे भिन्न भाषा असूनही विविध संस्कृतींना समजून घेणारे समान ध्वनीघटक (Phonemes) तयार करता येऊ शकतात.

संरचनावाद मानवी विचारांच्या वैश्विक रचना/पद्धतींचा सांस्कृतीक घटकांवर पडणाऱ्या प्रभावावर प्रकाश टाकतो. यामध्ये सांस्कृतिक रचना/ पद्धतींना समजावून सांगण्यापेक्षा या सांस्कृतिक रचना/ पद्धती वैश्विक मानवी ज्ञानाच्या अवचेतनेचा परिणाम आहे हे स्पष्ट केले जाते. समाज-नियम आणि मनातील विचार यांच्यातील दुवा संस्कृतींशी खोलवर जोडला गेला असून कालांतराने त्याचे रुपांतर तर्कसंगत विचारात होते. तर्कसंगत विचारातून विशिष्ट कृती, उपक्रम यांना *संकल्पना* म्हणुन आकार दिला जातो.

संरचनावादातील *मानसिक ऐक्य (Psychic Unity)* ही प्रक्रिया वंश, संस्कृती अशा विविध कारणांमुळे विविधता असूनही मानवजातीतील मुलभूत मानसिक साधर्म्य दर्शवते. वैश्विक मानवी ज्ञानात अशा तऱ्हेचे वैविध्य असूनही सर्वच संस्कृतींनी आपल्या सांस्कृतिक संरचनांना टिकवून ठेवले आहे.

### ३.२.४ संरचनावादाचे महत्व

सामाजिक शास्त्रांच्या विश्लेषणातील *संरचनावाद* हा महत्वपुर्ण दृष्टीकोन असून या दृष्टीकोनाचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल-

- संरचनावाद हा १९५०-६० च्या दशकात सामाजिक शास्त्रातील विशेषतः मानववंशास्त्रातील प्रभावी दृष्टीकोन बनला. तत्कालीन अन्य दृष्टीकोनांना जसे कि कार्यात्मकवाद (Functionalism) संरचनावादाने आव्हान दिले.

- संरचनावादामुळे संस्था/ संरचनांच्या अभ्यासातील कार्यावर असणारा अतिरिक्त भर जाऊन समाज/ संस्थांच्या संरचनावर भर देण्यात आला.

- मानसिक ऐक्य (Psychic Unity) या संकल्पनेचा संरचनावादाने पुनरुच्चार करीत समतेचे तत्व अधोरेखित केले.

- संरचनावादाने साहित्य, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र अशा सर्वच विषयांत *परस्परविरोधी द्विआधारी (Opposite Binary), विरोधातील ऐक्य (Unity of Opposites) तसेच* मानसिक ऐक्य (Psychic Unity) यांसारख्या संकल्पनांचा वापर करीत आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन वाढीस लावला

### ३.२.५ संरचनावादाचे अपयश

संरचनावादाचे स्वरुप आंतरविद्याशाखीय असूनही अनेक विचारवंत व विचारप्रवाहांकडून टिकेचा सामना करावा लागला आहे. यामध्ये विशेषतः उत्तरसंरचनावाद, मार्क्सवाद आणि स्त्रीवादी टीकांचा समावेश आहे.

- **निश्चयवाद आणि घटतावाद (Determinism and Reductionism):**

  आजूबाजूला घडणाऱ्या सर्वच जटिल सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांना *अंतर्निहित संरचना आणि नियमांमध्ये* (underlying structures and rules) सीमित करण्यावर संरचनावाद भर देतो. यामुळे संरचनावादावर अत्याधिक निर्धारवादी आणि घटतावादी असल्याची टीका केली जाते. अभ्यासकांच्या मते, संरचनावादात संरचनांवर लक्ष केंद्रित करतांना व्यक्तींच्या सर्जनशीलतेकडे दुर्लक्ष केले तर जातेच परंतू त्याचबरोबर मानवी अनुभवाची समृद्धता आणि परिवर्तनशीलता यांचे अवास्तव सरलीकरण करण्यात येते.

- **ऐतिहासिक संदर्भाकडे दुर्लक्ष (Neglect of Historical Context):**

  संरचनांचा अभ्यास करतांना वर्तमानकाळावर अतिरिक्त भर देण्यात आला असून भूतकाळ/ इतिहासाकडे साफ दुर्लक्ष करण्यात आले आहे. संरचनावादी अभ्यासक हे समाजाला आकार देणाऱ्या गतिशील, ऐतिहासिक प्रक्रियांवर कालातीत संरचनांवर भर देताना दिसतात. संरचनावादानुसार सर्वच संरचना शाश्वत, कालविहीन असतात असे मानले जाते. त्यामुळे संस्कृती आणि सामाजिक प्रणालींचे वर्णन स्थिर आणि कठोर होऊ शकते.

- **सत्ता आणि विचारधारेकडे दुर्लक्ष (Inattention to Power and Ideology):**

  मार्क्सवादी आणि स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, संरचनावाद हा सत्तासंबंध आणि सामाजिक संरचनांना आकार देणाऱ्या विचारप्रणालींकडे दुर्लक्ष करतो. संरचनावादात

तटस्थ, अंतर्निहित संरचनांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे सत्तेची गतिमानता आणि विचारप्रणालींच्या संघर्षांतून सांस्कृतिक आणि सामाजिक घटनांवर पडणाऱ्या प्रभावाकडे डोळेझाक होते.

- **व्यक्तिगत सापेक्षतेकडे अपुरे लक्ष (Lack of Consideration for Individual Subjectivity):**

  सामूहिक संरचनेवर जोर देतांना संरचनावाद हा वैयक्तिक दृष्टीकोन, भावना आणि व्यक्तीची अस्मिता या घटकांकडे पुरेसे लक्ष देत नाही. ज्यामुळे संरचनावाद हा व्यक्तिगत सापेक्षता आणि वैयक्तिक अनुभवांकडे अपुरे लक्ष देतो अशी टीका केली जाते.

- **परस्परविरोधी द्विआधारीवर (Opposite Binary) जास्त भर (Overemphasis on Binary Oppositions):**

  परस्परविरोधी द्विआधारी (उदा. निसर्ग/संस्कृती, पुरुष/स्त्री) हा संरचनावादाचा पाया असून वर्गीकरण किंवा चर्चेकरिता त्यावर विसंबून राहण्याचा प्रयत्न होतो. मात्र त्यामुळे समस्येचे सरलीकरण करण्याचा किंवा काहीवेळा समस्यांचे द्विभाजन करण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील जटिलता आणि प्रवाहीपणाकडे डोळेझाक होते.

- **संरचनावादानंतरची आव्हाने (Challenges from Post-Structuralism):**

  संरचनावादावर जॅकस डेरिडा, मिशेल फुको आणि ज्युलिया क्रिस्टेवा या उत्तरसंरचनावाद्यांनी टीका केली आहे. त्यांच्या मते, *संरचना या स्थिर अथवा सार्वत्रिक नसून त्या प्रवाही, आकस्मिक आणि विघटनाच्या अधीन आहेत*. ज्या गतीने भाषा व संरचना सतत बदलत आहेत ते पाहता उत्तरसंरचनावाद हा अर्थाच्या प्रवाहीपणावर जोर देतो व भाषा आणि संरचना या पुनर्व्याख्यासाठी खुल्या आहेत असे मानतो.

- **वंशकेंद्री (Ethnocentrism):**

  मानववंशशास्त्रातील संरचनावादी विश्लेषणातून वांशिकेंद्रिततेचा प्रयत्न होत असल्याची टीका अनेकदा केली जाते. अभ्यासकांच्या मते, *संरचनावादी दृष्टीकोनाच्या माध्यमातून पाश्चात्य वैचारिक चौकटीचे हा गैर-पाश्चात्य समाजांवर बीजारोपण करण्याचा प्रयत्न होतो*. त्याशिवाय गैर-पाश्चात्य समाजातील सांस्कृतिक पद्धती व विश्वासांचा चुकीचा अर्थ लावण्याचा किंवा त्यांचे सरलीकरण केले जाते.

- **भौतिक परिस्थितीकडे दुर्लक्ष (Neglect of Material Conditions):**

  संरचनावादात सामाजिक संरचनांना आधार देणाऱ्या भौतिक परिस्थिती आणि आर्थिक घटकांकडे दुर्लक्ष केले जात असल्याची टीका मार्क्सवादी अभ्यासक करतात. संरचनावादी अभ्यासक आपल्या विश्लेषणात अमूर्त प्रणालींवर लक्ष केंद्रित करतात. मात्र असे करतांना *भौतिक वास्तविकता, सामाजिक संघटना आणि सांस्कृतिक पद्धतींवर प्रभाव टाकणाऱ्या वर्ग संघर्षाची चर्चा करण्यात संरचनावादी अपयशी ठरतात*.

### ३.२.६ निष्कर्ष:

मानवी संस्कृतीच्या अंतर्निहित संरचनांचा अभ्यास करतांना संरचनावाद महत्वपुर्ण दृष्टीकोन प्रदान करतो. परंतु त्याच्या मर्यादा आणि टीकांमुळे या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उत्तर संरचनावादासारख्या पर्यायी सैद्धांतिक दृष्टिकोनांचा विकास झाला. संस्कृती आणि समाजातील गतिमान, ऐतिहासिकदृष्ट्या पायाभूत आणि शक्ती-जागरूक विश्लेषणांना पुढे नेण्यासाठी या टीका महत्त्वपुर्ण ठरतात.

## ३.३ उत्तर संरचनावाद (Post- Structuralism)

उत्तर संरचनावाद ही २० व्या शतकाच्या मध्यात संरचनावादाविरुद्ध प्रतिक्रिया म्हणुन उदयास आलेली तात्विक तसेच सैद्धांतिक चळवळ आहे. काही अभ्यासकांच्या मते, *संरचनावाद आणि उत्तर संरचनावाद यांत भेद नसून त्याला संरचनावादाचा या एकाच दृष्टीकोनाचा फर्डिनांड डी सॉस्स्युर ते जॅकस डेरिडा असा अभ्यासकांचा वैचारिक विकास आहे* असे मानले. म्हणजेच उत्तर संरचनावादाच्या व्याख्येशिवाय जॅकस डेरिडा, मिशेल फुको, रोलँड बार्थस आणि ज्याँ बॉद्रीलँड इ. अभ्यासकांना संरचनावादी मानावे कि उत्तर संरचनावादी दृष्टीकोनाचे याहीविषयी मत-मतांतरे आहेत.

खरेतर *मानवी संस्कृतीचे आकलन करण्यासाठी भाषेसारखी अंतर्निहित संरचना पुरेशी आहे* या संरचनावादी कल्पनेला आव्हान देत *भाषेऐवजी अर्थाची तरलता, अस्पष्टता आणि आकस्मिकता यांवर जोर देण्याची गरज आहे* हा विचार उत्तर संरचनावादाने मांडला.

त्यामुळे, आता उत्तर संरचनावाद हा संरचनावादाविरुद्ध असलेली प्रतिक्रिया आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. सर्वप्रथम <u>उत्तर संरचनावाद हा संरचनावादाच्या दोन मुलभुत युक्तिवादांना आव्हान देतो</u>.

१) संरचनावादाप्रमाणे समाजात कोणतीही व्यवस्था स्वयंपुर्ण/ स्वायत्त असू शकत नाही.

२) समाजाचे बारकाईने परिक्षण केल्यास लक्षात येते कि, संरचनावादाने स्विकारलेल्या *परस्परविरोधी द्विआधारी* सर्वत्र व सर्वकाल अस्तित्वात असतीलच असे नाही.

वरील चर्चेनंतर उत्तर संरचनावादाच्या विकासासाठी कारणीभूत ठरणारे घटक कोणते हे पाहणे क्रमप्राप्त आहे. सर्वसामान्यपणे प्रामुख्याने उत्तर संरचनावादाच्या विकासासाठी बौद्धीक (Intellectual) आणि ऐतिहासिक (Historical) घटक कारणीभूत आहेत असे मानले जाते.

### ३.३.१ उत्तर संरचनावादाच्या विकासास कारणीभूत घटक:

❖ **बौद्धीक घटक (Intellectual Factors)**

- **संरचनावादावरील टीका (Critique of Structuralism)**

  फर्डीनांड डी सॉस्स्युर आणि क्लॉड लेव्ही स्ट्रॉस यांसारख्या संरचनावाद्यांनी मानवी संस्कृती तसेच भाषा यांना नियंत्रित करणाऱ्या पायाभूत संरचनांना महत्व दिले. फर्डीनांड डी सॉस्स्युरने *भाषेच्या संरचनेत अन्वयर्थ दडलेला असून शब्दा- शब्दांत*

*स्वतंत्रपणे अर्थ शोधता येत नाही* असा विचार मांडला. *व्यक्ती तसेच जीवनानुभव हे केंद्रस्थानी असतात* हा अस्तित्ववादाने (Existentialism) (तत्कालिन प्रभावी अन्य विचारप्रवाह) मांडलेला तर्क संरचनावादाने नाकारत *व्यक्ती हा सामाजिक, मानसशास्त्रीय तसेच भाषिक संरचनांतून घडतो व या संरचनांचे व्यक्तीवर नियंत्रण असते* हा तर्क मांडला. यामुळे संरचनांचे विश्लेषण करण्यासाठी एकच पद्धती वापरूनही वेगवेगळे निष्कर्ष येऊ लागले. एकाच क्षेत्रातील विश्लेषणातून दोन वेगवेगळे निष्कर्ष प्राप्त होऊ लागल्याने संरचनावादावर टीका होऊ लागली.

- **साहित्यशास्त्राचा प्रभाव (Influence of Linguistics)**

  चिन्हविज्ञानाचा (Semiotics) विकास आणि फर्डीनांड डी सॉस्स्युरच्या साहित्यशास्त्रामुळे उत्तरसंरचनावादाच्या विकासाला गती मिळाली. सॉस्स्युरच्या *अर्थाचा उगम चिन्हांच्या प्रणालीतील फरकामुळे होत असून त्याचा वास्तविकतेशी संबंध नसतो* या कल्पनेचा विस्तार करत उत्तर संरचनावाद्यांनी *अर्थ हा नेहमीच व्यक्ती सापेक्ष आणि परिस्थिती सापेक्ष असतो* असा तर्क मांडला.

- **मनोविश्लेषणात्मक सिद्धांत (Psychoanalytic Theory):**

  सिग्मंड फ्रॉईड आणि जॅकस लॅकन यांच्या *अचेतन (Unconsciou), सापेक्षता (Subjectivity), आणि 'स्व'चे विभाजन (Fragmentation of Self)* यांसारख्या संकल्पनांमुळे उत्तर संरचनावादात मोलाचे योगदान प्राप्त झाले. विशेषतः जॅकस लॅकनने सिग्मंड फ्रॉईडच्या लेखनास संरचनात्मक साहित्यशास्त्रातून पुनर्विश्लेषण केले.

❖ **ऐतिहासिक व सामाजिक घटक (Historical and Social Factor):**

- **राजकीय आणि सामाजिक उलथापालथी (Political and Social Upheaval):**

  १९६० नंतर जगभरात सर्वत्र वसाहतवादविरोधी लढे, नागरी हक्क चळवळी, विद्यार्थी आंदोलने आणि स्त्रीवादी तसेच तृतीयपंथी चळवळींना वेग घेतला असतांना प्रस्थापित व्यवस्था व समाजनियमांविरुद्ध प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले होते. या चळवळींनी समाजातील पारंपारिक सत्तासंरचना व विचारप्रणालींना आव्हान तर दिलेच परंतू उत्तर संरचनावादातील *अन्वयार्थाच्या ताठर व पदसोपानरचनाआधारित विरोधी समिक्षणाला* पाठींबा दर्शवला.

- **महायुद्धानंतरचा भ्रमनिरास (Post-War Disillusionment) :**

  दुसरे महायुद्ध आणि त्यानंतरच्या शीतयुद्ध कालखंडातील विध्वंसामुळे राष्ट्रवाद, भांडवलशाही आणि मार्क्सवाद विचारसरणींच्या उपयुक्ततेबद्दल व्यापक संशय निर्माण झाला. या भ्रमनिरासामुळे सामाजिक शास्त्रांतील एकंदर सिद्धांत आणि कथनांच्या समालोचनासाठी उत्तर संरचनावादामुळे योग्य वातावरण निर्माण झाले.

- **तांत्रिक प्रगती (Technological Advancements):**

  २० व्या शतकात विज्ञान- तंत्रज्ञानातील वेगवान प्रगती आणि प्रसारमाध्यमे व माहिती तंत्रज्ञानाच्या उदयाने आधुनिक जीवनाचे जटिल आणि खंडित स्वरूप ठळक झाले. आधुनिक जीवनातील या जटिलतेस उत्तर संरचनावादाच्या *अर्थाविषयी अस्थिरतेबद्दल आणि संदर्भ आणि व्याख्याचे महत्त्व* या दृष्टीकोनातून समजून घेणे शक्य आहे.

- **जागतिकीकरण (Globalization):**

  जागतिकीकरणातून आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्परसंबंध वृद्धींगत होत असतांना युरोपकेंद्रीत सिद्धांतांच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. यातूनच पर्यायी दृष्टीकोनांचा शोध घेण्यास प्रोत्साहन मिळाले. जागतिकिकरणामुळे अर्थांच्या बहुविधता आणि संदर्भ विचारात घेण्याची गरज बळकट होत गेली. यातूनच उत्तर संरचनावादाचा उदय झाला.

### ३.३.२ उत्तर संरचनावाद आणि राजकारण

उत्तर संरचनावादी विश्लेषणानुसार *राजकारण हे सर्वव्यापी असून ते दृष्टीगोचर आहे*. त्यामुळे उत्तर संरचनावाद हा औपचारिक संस्था (जसे कि, कायदेमंडळे, नोकरशाही, न्यायालये), शासकिय नियंत्रण असलेल्या अन्य संस्था (जसे कि, इस्पितळे, विमानतळे, वस्तुसंग्रहालये आणि शैक्षणिक संस्था) तसेच समाजाचा घटक असलेल्या अन्य संस्था तसेच त्यांतील सत्तासंबंधांवर दृष्टीक्षेप टाकतो. या दृष्टीकोनानुसार, *संस्था, विचार-परामर्श आणि सामाजिक प्रथा इ. सर्वच घटकांचे स्वरुप पक्षपातरहित आणि मूल्य निरपेक्ष आहे*.

राज्यशास्त्र तसेच लोकप्रशासनाचा विचार करता, उत्तरसंरचनावादी अभ्यासक हे समाजात सत्तेचे क्रियान्वयन *कसे* होते (*How* power operates in society?) सत्ता *कोणत्या मार्गाने* समाजात क्रियान्वित होते? (*Through Which channels power operates in society?)* या प्रश्नांची उकल शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी उत्तर संरचनावादी हे अन्वयार्थकारी धोरण विश्लेषणाशी (Interpretive Policy Analysis) संधान साधत समाजातील वर्चस्ववादी तसेच धुरिणत्ववादी वर्णनांचे (Narrative) मुल्यमापन, ताठरपणा व धुसर सीमांना आव्हान देण्याचे तसेच राज्यव्यवस्थेतील विरोधाभासांवर जोर देण्याचा प्रयत्न करतात. अन्वयार्थकारी धोरण विश्लेषणात (Interpretive Policy Analysis) भाव- भावना, भाषा आणि लोकजीवनशास्त्र (Ethnography) यांचा समावेश होतो. भाषा ही सत्तासंबंधांचे प्रकटीकरण करणारे माध्यम असल्याने भाषेला राजकीय महत्व प्राप्त होते.

उत्तर संरचनावादी अभ्यासक हे पदसोपानरचना दर्शवणाऱ्या सत्तासंबंधांची चर्चा करतात. यामध्ये मिशेल फुकोच्या *Governmentatlity, Geneology, Biopower* आणि *Dispositif* यांसारख्या संकल्पना महत्वाच्या मानल्या जातात. या संकल्पनांद्वारे मिशेल फुको याने संस्थांच्या तटस्थतेस आव्हान दिले असून स्वैर सत्तासंबंधांचा समाचार घेतला आहे. सत्तासंबंधांमुळे व्यक्ती, समूह आणि समूदाय या कशाप्रकारे गुंतागुंतीचे बनले आहेत? याविषयी फुको याने चर्चा केली आहे. सत्तासंबंधातील ही गुंतागुंत *Dispositif* या नावाने

ओळखली जाते. तर या सत्तासंबंधातील गुंतागुंतीतून विविध संस्था, व्यक्ती आणि समुदायांवर पडणारा प्रभाव हा सर्वव्यापी असून त्याचा अभ्यास *Governmentatlity* द्वारे केला जातो.

उत्तरसंरचनावादाची नेहमीच कला व साहित्याशी वारंवार सांगड घातली जात असल्याने या क्षेत्रांप्रमाणेच सामाजिक शास्त्रांतही जैसे थे (Status Quo) तसेच वैश्विक किंवा प्रमाणित मुल्यांच्या अस्तित्वाला आव्हान देण्यात आले आहे. उत्तरसंरचनावादानुसार, कारण (Cause) आणि परिणाम (Effect) यांच्यात रेषीयता (Linearity) नसून सत्तेसारखे घटक प्रसारमाध्यमे, भाषा- अभिव्यक्ती, शासनाचे उपघटक अशा सर्वच स्तरांतून वर-खाली होत असतात.

उत्तरसंरचनावादात राजकीय घटनांचे विश्लेषण करतांना पदसोपान, रेषीय आणि स्तरीय घटकांचा आधार घेतला जातो तर अर्थ, अन्वयार्थ, विश्लेषण या मार्गांना केंद्रस्थानी मानले जाते. प्रामुख्याने, अन्वयार्थकारी धोरण विश्लेषण (Interpretive Policy Analysis), समुदाय-सहभागी संशोधन (Community Engaged Research), कलाधारित सहभागी कृती संशोधन (Art-based Participarory Action Research), राजकीय लोकजीवनशास्त्र (Political Ethnography), समिक्षणवादी परामर्श विश्लेषण (Critical Discourse Analysis) यासारख्या पद्धतीशास्त्रांच्या आधारे उत्तरसंरचनावादाचे विश्लेषण केले जाते.

## ३.४ विखंडन (Deconstruction)

जॅकस डेरिडा याने संरचनावादावर टीका करत असतांना Writing and Differecne, Of Grammatology आणि Speech and Phenomena या तीन ग्रंथाद्वारे *विखंडन* (Deconstruction) ही संकल्पना मांडली. अर्थात याआधी या संकल्पनेशी मिळतीजुळती चर्चा मार्टीन हेडेगर आणि एडमंड हुसर्ल यांनी आपल्या लेखनात केली आहे.

*विखंडन (Deconstruction)* आणि *विध्वंस (Destruction)* या संकल्पना वेगवेगळ्या आहेत. विखंडनाचा विश्लेषण (Analysis) या संकल्पनेशी निकटचा संबंध असून त्यात *विचार/ कल्पनेला विलग/ विखंडीत करण्यावर भर असतो*.

विखंडन करत असतांना साहित्य (Text) नष्ट केले जात नसून त्या साहित्यातील एकमेव प्रभावी विचाराला नष्ट केले जाते. विखंडनात अशा साहित्याच्या अंगभूत वैशिष्ट्यापेक्षा वेगळ्या वैशिष्ट्यांचा शोध घेतला जातो. विखंडनात साहित्यातील कार्य-कारणसंबंध आणि अलंकारशास्त्राचा प्रामुख्याने विचार केला जातो. विखंडनामुळे उत्तरसंरचनावादात वाचनाच्या नव्या पद्धतीचा स्वीकार करण्यात आला.

जॅकस डेरिडाच्या मते, ज्याप्रमाणे कोणत्याही नाटकावर त्या नाटकाच्या पटकथा लेखकाचा सर्वाधिक पगडा /प्रभाव असतो त्याप्रमाणे राजकीय व्यवस्थेत बुद्धीजीवी वर्गाच्या कल्पना या चर्चाविश्व घडवून आणतात. या दोन्ही उदाहरणात ठराविक अन्वयार्थ सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न असतो. कोणतेही साहित्य वाचत असतांना दृश्य अर्थापेक्षा वेगवेगळे अर्थ निघत असतात. अशावेळी एकमेव/ स्थिर अर्थापेक्षा वेगळा अर्थ निघाल्याने असे साहित्य आपल्या

मुळ उद्देशापासून दूर जाऊ शकते. यावर डेरिडाने अर्थ लावतांना साहित्याच्या बाहेरील संदर्भ लक्षात घेऊन साहित्याचा अर्थ लावता येत नसल्याचे मत मांडले.

तुलना किंवा विश्लेषण करित कोणत्याही पारंपारिक साहित्याचे समिक्षण करत असतांना अर्थ शोधण्याचा होणारा प्रयत्न हा निष्फळ असतो. याचे कारण म्हणजे, साहित्यातील अलंकारशास्त्र व समिक्षण त्या साहित्याचे भिन्न अर्थ सांगत असतात.

संरचनावादानुसार *व्यक्ती हा विविध संरचनांच्या बंधनांत गुंतलेला असून या संरचना व्यक्तीला नियंत्रित करतात* असे मानण्यात आले आहे. यावर डेरिडाने हल्ला चढवला असून त्याच्या मते, *सर्व संस्था/ संरचना या केवळ लिखीत/ शब्दरुपात मर्यादित आहेत व त्या व्यक्तीला नियंत्रित करु शकत नाहीत*. संरचनावादाने भाषेच्या शिस्तबद्ध आणि स्थिर स्वरुपाला उचलून धरले असतांना डेरिडाने मात्र भाषेला अस्थिर मानले आहे. *भाषा अस्थिर असल्याने भाषेतून लोकांना नियंत्रित, नियमित किंवा दंडीत करु शकेल अशी संरचना निर्माण होण्याची शक्यता नसते*.

डेरिडाने मांडलेल्या विखंडनातील महत्वाचा युक्तिवाद म्हणजे *बोली भाषा आणि लिखीत भाषा यांत अस्तित्वाचा अभाव असून बोली भाषेचा विचार करता त्यात हिंसाकारी पदसोपानरचना (Violent Hierarchy) निहीत असते.* पाश्चात्य तत्वज्ञान हे Logocentric (ही एक नकारात्मक संकल्पना आहे ज्याचा अर्थ *शब्द/ साहित्य हे वर-वर/ बाह्य अभिव्यक्तीचे प्रतिबिंब असणे* असा होतो) बनले असल्याने बोलीभाषेने लिखीत भाषेला दडपले आहे. अशा Logocentric तत्वज्ञानात विचार व विश्लेषणावर मर्यादा पडतात. त्यामुळे विखंडनाची गरज असल्याचे मत डेरिडा याने मांडले.

अनेक अमेरिकन समिक्षकांनी डेरिडाच्या विखंडन संकल्पनेचा अंतर्भाव आपल्या लेखनात केला आहे. विशेषतः पॉल डी मान (Paul De Man) यांनी जीन जॅक रुसोच्या On the Origin of Languages या ग्रंथाचे विखंडनात्मक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. त्याशिवाय जॉफ्रे हार्टमन, हेरॉल्ड ब्लुम, बार्बरा जॉन्सन यांनीही विखंडनात्मक लेखनात मोलाचे योगदान दिले.

## ३.५ समीक्षात्मक सिद्धांत (Critical Theory)

समीक्षात्मक सिद्धांत ही संकल्पना विविध विषयात विविध काळात वेगवेगळ्या संदर्भात वापरली गेली आहे. परंतू फ्रँकफर्ट, जर्मनी मधील Institute for Social Research येथे अभ्यासकांनी एकत्र येत समाज व राजकारणाशी निगडीत असलेल्या उदारमतवाद तसेच वास्तववाद यांसारख्या सिद्धांताचे परिक्षण करणारी चिकित्सा घडवून आणली. ही चिकित्सा खऱ्या अर्थाने समीक्षात्मक सिद्धांत (Critical Theory) म्हणुन ओळखली जाते. *Critical Theory* या शब्दाचा वापर सर्वप्रथम मॅक्स हॉर्खेमर याने १९३७ मध्ये आपल्या Traditional and Critical Theory या शोधनिबंधात केला.

समीक्षात्मक सिद्धांताच्या अभ्यासकांत मॅक्स हॉर्खेमर, थिओडोर अडोर्नो, हर्बर्ट मर्क्युज, वाल्टर बेंजामिन आणि युर्गेन हेबरमस या अभ्यासकांचा ठळकपणे समावेश केला जातो. यातील मॅक्स हॉर्खेमर, थिओडोर अडोर्नो, हर्बर्ट मर्क्युज, वाल्टर बेंजामिन आणि युर्गेन

हेबरमस या अभ्यासकांना पहिल्या पिढीतील अभ्यासक मानले जाते. या अभ्यासकांनी भांडवली समाज, सांस्कृतिक उद्योग आणि सर्वंकषवाद या संकल्पनांची चर्चा केली. अभ्यासकांच्या दुसऱ्या पिढीत युर्गेन हेबरमस आणि क्लॉस ऑफ यांचा समावेश होत असून त्यांनी संप्रेषणात्मक कृती, सार्वजनिक क्षेत्र आणि अधिमान्यतेचा संघर्ष या संकल्पनांची चर्चा केली. अभ्यासकांच्या तिसऱ्या पिढीत ॲक्सेल हॉनेथ, नॅन्सी फ्रेसर यांचा समावेश होत असून त्यांनी पुनर्वितरण, प्रातिनिधीक लोकशाही इ. संकल्पनांची चर्चा केली आहे. यातील प्रत्येक पिढीने आधीच्या समीक्षात्मक सिद्धांताचा आधार घेत/ टिका करीत बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीनुसार अस्तित्वात असलेल्या सत्तासंरचनांचा शोध घेतला आहे.

समीक्षात्मक सिद्धांत हा एक सामाजिक तत्त्वज्ञानाचा आंतरशाखीय दृष्टिकोन असून याचे उद्दिष्ट समाजाचे आकलन आणि स्पष्टीकरण करणे एवढ्यापुरते सीमित नसून तर त्याचे चिकित्सकपणे विश्लेषण करणे आणि बदल घडवून आणणे हे आहे. हा दृष्टिकोन पारंपारिक मार्क्सवादी सिद्धांताच्या मर्यादा आणि भांडवलशाही समाजातील खऱ्या मानवी मुक्ततेच्या अपयशांचा समाचार घेतो.

समीक्षात्मक सिद्धांताच्या अभ्यासकांवर मार्क्सवादाचा प्रभाव असला तरी समाजातील समस्यांचे स्वरुप आणि त्यावरील सुधारणा याविषयी त्यांच्यात एकवाक्यता नाही. मार्क्सवादातील आर्थिक घटक तसेच वर्गसंघर्षाला असलेले केंद्रस्थान समीक्षात्मक सिद्धांताने नाकारले असून त्याऐवजी शोषणमुलक सामाजिक व भौतिक परिस्थितीपासून व्यक्तीच्या *मुक्तीच्या* (*Emancipation*) नैतिक धारणेला प्राधान्य दिले आहे. विशेषतः सोव्हियत रशियाचे पतन आणि चीनमधील साम्यवादाचे बाजारपेठ केंद्रीत व्यवस्थेत होणारे रुपांतर पाहता समीक्षात्मक सिद्धांताची ही भूमिका महत्वाची ठरते.

मॅक्स हॉर्खेमरने पारंपारिक सैद्धांतिक चौकशीच्या यथार्थवादी आणि आदर्शवादी स्वरुपावर टीका केली असून या सैद्धांतिक चौकशीत समकालीन सामाजिक आणि ऐतिहासिक बाजूंकडे दुर्लक्ष होते. हॉर्खेमरच्या मते, यथार्थवाद आणि आदर्शवादामुळे समाजातील तथ्य व नियमांचे सामान्यीकरण करुन समाजजीवनावर त्याचा फारसा प्रभाव पडत नसल्याचे मत मांडले जाते. यामुळे सिद्धांताचे व्यव्हारात उपयोजन करतांना त्रुटी निर्माण होतात. प्रत्यक्षात सिद्धांत हा कार्ल मार्क्सने मांडल्याप्रमाणे 'समीक्षात्मक' असायला हवा ज्याचा आधार द्वंद्वात्मक (Dilectic) असेल.

सिद्धांतकारांनी सामाजिक तथ्ये आणि कायद्यांचा अभ्यास करतांना एमिल डर्खाईम आणि मॅक्स वेबर यांचा आदर्श घ्यावा व असे करतांना द्वंद्वात्मक मार्ग स्विकारावा. सर्वप्रथम समाजाला अन्यायी व अमानवी बनवू पाहणाऱ्या सामाजिक तथ्ये व नियमांना अधोरेखित करून समाजव्यवस्था कशाप्रकारे विरोधाभासाचे चित्र दर्शवते हे दाखवावे. त्यानंतर उलटक्रमाने समाजातील मानवी व न्याय्य भविष्य देऊ शकणाऱ्या गतीमान शक्तींची चर्चा करावी. या चर्चेतून समीक्षात्मक सिद्धांताच्या दोन वैशिष्ट्यांचा उल्लेख करता येईल.

१. समीक्षात्मक सिद्धांताची अभ्यासपद्धती द्वंद्वात्मक असून सिद्धांत आणि अनुभवजन्य मानवी व सामाजिक सिद्धांतात दुवा शोधण्याचे काम हा सिद्धांत करतो. सामाजिक वास्तव दाखवणारा महत्वाचा आरसा म्हणून सामाजिक सिद्धांताकडे पाहिले जाते. यामध्ये पहिल्या पिढीतील (मॅक्स हॉर्खेमर, थिओडोर अडोर्नो, हर्बर्ट मर्क्युज आणि

वाल्टर बेंजामिन) समीक्षात्मक सिद्धांतकारांनी कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा आधार घेतला. मात्र युर्गेन हेबरमसनंतर नव्या तात्विक तसेच सामाजिक अशा सैद्धांतिक प्रारुपांची मदत घेतली जाऊ लागली आहे. तत्वज्ञान आणि अनुभवजन्य विज्ञान यांच्यातील निकटचा संबंध हे समीक्षात्मक सिद्धांताचे नेहमीच वैशिष्ट्य राहिले आहे.

२. समीक्षात्मक सिद्धांत हा सिद्धांत आणि त्याच्या व्यावहारिक उपयोजन यांच्यातील अजोड संबंधाशी निगडीत आहे. समीक्षात्मक सिद्धांताचे अभ्यासक सैद्धांतिक चौकशीत समकालीन इतिहासाचे प्रमुख स्थान महत्वाचे मानतात. याचाच अर्थ सामाजिक सिद्धांतातून तत्कालिन इतिहासाची झलक दिसणे गरजेचे आहे. सामाजिक सिद्धांत आणि सामाजिक वास्तव यांत परस्परसंबंध असतो. एकीकडे, सामाजिक वास्तवात सिद्धांतनिर्मीतीची बीजे सापडत असतात तर दुसरीकडे, सिद्धांताचे व्यावहारिक उपयोजन व्हावे असे सिद्धांतकारांना वाटते. यासाठी सिद्धांतकार सामाजिक जाणीवांचे वर्णन करणाऱ्या प्रमुख संकल्पना, नियम आणि मुल्ये यांचे स्पष्टीकरण करावे

### ३.५.१ समीक्षात्मक सिद्धांताचे आधार (Tenets of Critical Theory)

समीक्षात्मक सिद्धांताचे स्वरुप हे एकसंध नाही. विविध विचारवंतांनी समीक्षात्मक सिद्धांत आपले योगदान दिले आहे. मात्र, पुढील घटकांना समीक्षावादी सिद्धांतकाराने महत्वपुर्ण आधार मानले आहे हे मात्र निश्चित.

- **साह्यकारी तर्कावर टिका (Critique of Instrumental Reason)**

  मॅक्स हॉर्खेमर आणि थिओडोर अडोर्नो यांनी साह्यकारी तर्क (Instrumental Reason) या संकल्पनेवर कडाडून टिका केली आहे. साह्यकारी तर्क म्हणजे राजकारणात उपयुक्ततावाद, नियंत्रण, किफायतशीरता, आणि साध्य-साधन या घटकांना अवाजवी महत्व देउन मानवी मुल्ये आणि नैतिकतेला बगल देणे होय. अशा तर्काच्या माध्यमातून भांडवलशाही समाज हा व्यक्तीला केवळ आर्थिक तसेच तांत्रिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी केवळ यंत्र बनवते. राजकारणात या तर्काचा आधार घेत तांत्रिक शासन (Technocratic Governance) आणि नोकरशाहीकरण (Bureaucratization) वाढीस लागले आहे.

- **द्वंद्व (Dialectics)**

  समीक्षात्मक सिद्धांत हेगेल तसेच कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक तर्कशक्तीचा आधार घेतो. गतिमान तसेच समाजातील विरोधाभास दर्शवण्यासाठी आणि समस्यांचे समाधान शोधण्यासाठी द्वंद्वाची मदत होते. समाजातील सत्तासंरचना आणि समाजात बदल घडवून आणणारे संघर्ष उलगडण्यात द्वंद्वाची भूमिका महत्वाची असते.

- **आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन (Interdisciplinary Approach)**

  समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र आणि तत्वज्ञान यांसारख्या विषयांतील संकल्पनांचा समावेश करीत समीक्षात्मक सिद्धांत हा खऱ्या अर्थाने आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनावर आधारीत सिद्धांत ठरला आहे. या दृष्टीकोनातून व्यक्ती, सामाजिक संरचना आणी जटील सामाजिक घटकांचे सविस्तर विश्लेषण करणे शक्य होते.

- **दास्यविमोचन आणि प्रत्यक्ष उपयोजन (Emancipation and Praxis)**

  मानवी दास्यविमोचन हे समीक्षात्मक सिद्धांताचे उद्दिष्ट आहे. याकरिता समीक्षात्मक सिद्धांत केवळ सैद्धांतिक दिशा न दाखवता कृतीकार्यक्रम जाहिर करतो. भांडवलशाही व्यवस्थेत व्यक्तीच्या स्वातंत्र आणि क्षमतांना मर्यादीत करणाऱ्या सामाजिक परिस्थिती तसेच व्यक्तीच्या शोषण आणि परात्मभावास (Alienation) कारणीभूत यंत्रणा हेरणे, दमनकारी व्यवस्था टिकावी यासाठी भांडवलशाही व्यवस्थेकडून विचारप्रणाली, प्रसारमाध्यमे, शिक्षण आणि मनोरंजनाची साधने यांचा होणारा वापर पाहता समीक्षात्मक सिद्धांत प्रत्यक्ष उपयोजनेचा मार्ग सुचवते. त्यादृष्टीने व्यक्ती आणि व्यक्तीसमूहांना शोषणमुलक राजकीय संरचनांपासून अभय देणे, सहभागी लोकशाहीसारख्या मार्गांनी सीमांत घटकांना सक्षम करणे, विषमता दूर करण्यासाठी सामाजिक न्यायावर आधारित धोरणांचा अंगिकार करणे यांसारख्या मार्गांचा समावेश आहे.

- **लोकशाही आणि प्रतिनिधीत्व (Democracy and Deliberation)**

  केवळ औपचारिक निवडणुक प्रक्रिया राबवणाऱ्या लोकशाहीपेक्षा सक्रिय नागरी सहभाग आणि प्रतिनिधीत्व दर्शवणारी सर्वसमावेशक लोकशाही अंगिकारण्याचा आग्रह समीक्षात्मक सिद्धांताचे अभ्यासक धरतात. युर्गेन हेबरमस यांनी यापुढे जाऊन लोकशाही प्रक्रियेत तर्कसंगत चर्चाविश्व करु शकणाऱ्या सार्वजनिक ठिकाणांची निर्मिती व्हावी जेणेकरुन मुक्त व समान चर्चा घडून येऊ शकेल. यादृष्टीने हेबरमसने Theory of Communicative Action हा सिद्धांत मांडला.

- **सत्तासंरचना आणि दमन (Powerstructure and Domination)**

  समीक्षात्मक सिद्धांत राजकीय व्यवस्थेमार्फत सत्तेचे होणारे वितरण आणि सत्तेची अंमलबजावणी यांचे परिक्षण करतो. भांडवलशाही व्यवस्थेत धाकतंत्रावर चालणारी राज्यसत्ता, महामंडळे/ कार्पोरेट क्षेत्रांची अजस्त्र आर्थिक क्षमता आणि जनमताला आकार देणारी प्रसारमाध्यमांची सांस्कृतीक क्षमता अशा विविध क्षेत्रात सत्तेचे वितरण झाले आहे. दुसरीकडे राज्यव्यवस्था विशिष्ट घटकांना सीमांत ठरवत व इतरांना विशेष लाभ देत दमन आणि नियंत्रण स्थापित करते. यामध्ये विचारप्रणाली महत्वाची भुमिक पार पाडते. प्रभावी विचारप्रणाली राज्यव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी सत्तासंबंधांचे समर्थन करते व त्यांना अधिमान्यता देते. अंतोनिओ ग्राम्स्कीच्या मते, अभिजन वर्ग नियंत्रण टिकून रहावे यासाठी सांस्कृतिक घटकांचा तसेच विचारप्रणालीचा आधार घेतात.

- **सांस्कृतिक उद्योग (Culture Industry)**

  मॅक्स हॉर्खेमर आणि थिओडोर अडोर्नो यांनी आपल्या *Dialectic of Enlightenment* या ग्रंथाद्वारे भांडवलशाही समाजात व्यापक प्रमाणात होणाऱ्या सांस्कृतिक बदलांच्या निर्मितीस *सांस्कृतिक उद्योग* (Culture Industry) असे संबोधले आहे. संस्कृती हि उपभोग्य वस्तु बनत चालली असून प्रसारमाध्यमे तसेच मनोरंजनक्षेत्राकडून जनसामान्यांना शांत करण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. सांस्कृतिक उद्योगांमार्फत उपभोगवृत्ती वाढस लागून चिकित्सक विचारास खिळ बसते.

## स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. संरचनावादाची ठळक वैशिष्ट्ये सांगून क्लॉड लेव्ही स्ट्रॉसचे योगदान स्पष्ट करा.

२. टिपा लिहा संरचनावादाचे महत्व

३. उत्तर संरचनावादाच्या विकासास कारणीभूत घटकांची चर्चा करा

४. टिपा लिहा- विखंडन

५. समीक्षात्मक सिद्धांताचे आधार स्पष्ट करा

## ३.६ संदर्भ ग्रंथ


१. The Oxford Handbook of Political Science: John Dryzek, Bonnie Hong and Anne Philips (Oxford Publication)

२. Encyclopedia of Political Theory: Mark Bevir (Sage Publication, California)

३. Routledge Companion to Phenomenology: Sebastian Luft and Soren Overgaard (Routledge, London)


❄❄❄❄❄❄❄

# ४

# आधुनिकता व उत्तर आधुनिकतावाद (अर्थ, व्याख्या, संकल्पना, संरचना मूल्यमापन)

**घटक रचना**

४.१ प्रस्तावना

४.२ इतिहासातील आधुनिकता

४.३ आधुनिकतेच्या विकासातील प्रमुख तत्वे

४.४ आधुनिकीकरणाचे स्वरूप

## ४.१ प्रस्तावना

मानवी जीवनाचा इतिहास हा परिवर्तनवादी दिसतो. कोणत्याही काळात मानव जात एका विशिष्ट स्थितीमध्ये कायमस्वरूपी राहिली नाही. मानवाने सतत उत्क्रांती केली आहे. उदाहरणार्थ आपली जीवनशैली, राहणीमान, खानपान हे प्राचीन काळापेक्षा सुखासीन,प्रगत दिसते. म्हणजेच त्यामध्ये आधुनिकतेची छाप आहे.

त्याचप्रमाणे राजकीय विचार हेसुद्धा काळानुसार बदलत गेले विकसित होत गेले. मग ते पाश्चात्त्य असो किंवा भारतीय राजकीय विचार असो. सध्याचे युग हे परिवर्तनाची युग आहे. प्रत्येक क्षेत्रात आधुनिकता, नाविन्य जोपासण्याची वृत्ती विकसित होत आहे. जीवनाचे प्रत्येक क्षेत्र मग ते सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अथवा औद्योगिक असेल या सर्व क्षेत्रात गतीने परिवर्तन होत आहे. आधुनिकीकरणाच्या या प्रक्रियेतून सर्वच राज्ये जात आहेत. हे सत्य आहे की आधुनिकीकरणाची ही महत्त्वपूर्ण आणि व्यापक प्रक्रिया सर्व देशात समान रूपाने होत नाही. काही देशात ही प्रक्रिया तीव्र गतीने होत असलेली दिसते. तर काही देशात तिची गतिमंद असलेली दिसते. आधुनिकीकरणाच्या या संकल्पनेला सामाजिक किंवा राष्ट्रीय जीवनाच्या एका विशिष्ट घटकाशी अथवा विशेष भागाशी सीमित करता येऊ शकत नाही. सर्वच घटकांना आधुनिकीकरणाची प्रक्रिया प्रभावित करीत असते. अधिकांश विकासासाठी आधुनिकीकरणाचा एकच अर्थ घेतला जातो. परंतु या दोन्ही संकल्पनांना सारखेच समजणे योग्य नाही. याचे कारण असे की, विकास राष्ट्रीय जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील संबंधित असू शकतो जसे सामाजिक विकास, आर्थिक विकास, सांस्कृतिक विकास वगैरे. परंतु औद्योगिकरण संपूर्ण सामाजिक बदलाच्या घटकाशी संबंधित आहे.

प्रत्येकाची विचारधारा वेगळी असू शकते. आधुनिकतेला काही लोकांनी पाश्चात्यांकडून आलेली व्यवस्था मानले. तर काहींनी मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक असलेली
स्थिती मानले.

## ४.२ इतिहासातील आधुनिकता

प्राचीन काळी मनुष्य दगडांच्या सानिध्यात त्याच्या उपयोगातून मानवी जीवन व्यतीत करीत होता. परंतु मानवाला प्रारंभी पासूनच प्रगतीची आस असल्याने अश्मयुगापासून ते आधुनिक युगापर्यंत मानवजातीचा गतिशील ऐतिहासिक प्रवास झालेला दिसतो. मध्ययुगीन काळातीलऔद्योगिक क्रांती च्या माध्यमातून विविध क्षेत्रातील आधुनिक विचार व आचार रूढ होऊ लागला. ज्ञानोपासना यास युरोपमध्ये प्रोत्साहन मिळाले. वैज्ञानिक क्षेत्रात अनेक नवनवीन विचार - संकल्पना पुढे आल्या. समाजशास्त्र मध्ये उदारमतवादी विचार हा आधुनिक विचाराचा आधार  मानला गेला. सामाजिक कराराचा सिद्धांत मांडणाऱ्या थामस हाॅब्ज,जीन जॅन रूसो व जाॅन लॉक या विचारवंतांनी जो सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला त्यातून नवीन समाज व्यवस्थेचा विचार रुढ झाला. अठराव्या शतकातील वैज्ञानिक क्रांतीने लोकांच्या विचार करण्याच्या पद्धतींमध्ये बदल घडवून आला या वैज्ञानिक क्रांती लाच आधुनिकतेची जननी समजले जाते. या आधुनिक विचारातूनच सावकारी जमीनदारी घराणेशाही सामंत शाही अस्ताला जाऊन पर्यायी व्यवस्था विकसित होऊ लागल्या. अनिष्ट चालीरीती परंपरा यांना बाजूला ठेवून वास्तववादी, सुधारणावादी व वैज्ञानिकतेच्या कसोटीला घासून नवविचाराला चालना मिळाली. त्यातूनच पुढे शहरीकरणाने वेग धरला.

हे जसे मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात आधुनिकतेचा उदय झाला. तसा राजकीय क्षेत्रातही पारंपारिक राजकीय व्यवस्थे ऐवजी नव व्यवस्था निर्मितीचा विचार पुढे आला. त्यातूनच स्वातंत्र्य, समता व न्याय या संकल्पनासह लोकशाहीकरणला गती मिळाली.

## ४.३ आधुनिकतेच्या विकासातील प्रमुख तत्वे

१)  भांडवलशाही वृत्ती बळावल्या- मध्ययुगीन कालखंडामध्ये जमीनदारी व्यवस्था सावकारी व्यवस्था विकसित झाली होती अलीकडच्या काळात औद्योगिक क्रांतीनंतर मोठ्या प्रमाणात विविध उद्योगांचा विकास झाला त्या अनुषंगाने भांडवलदारांनी आपला पैसा या अधिक नफा मिळवणाऱ्या विविध कंपन्यांमध्ये घातला त्या माध्यमातून अधिकाधिक नफा मिळवण्याची वृत्ती वाढत गेली दुसऱ्या बाजूला गरिबांचे शोषणही वाढले अशाप्रकारे उद्योग आणि बाजार व्यवस्थेने आधुनिकतेच्या विचारास चालना मिळाली.

२)  भांडवलशाहीतून समाजवाद -  वरील मुद्द्यानुसार भांडवलशाहीच्या विकासातून श्रमिक  वर्गाचे शोषण वाढू लागले. भांडवलशाहीला पर्यायी व्यवस्था शोधण्याचे काम काही विचारवंत करीत असतानाच "जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण "या भूमिकेतून समाजवादी विचार या पर्यायी व्यवस्थेचा जन्म झाला. समाजवादाने परिवर्तनवादी विचाराच्या माध्यमातून व्यवस्थेला दिशा देण्याचे प्रयत्न केले.

३)  व्यक्तीवादी विचाराचा वाढता प्रभाव- मध्ययुगीन कालखंडात युरोपीय व्यवस्थेमध्ये ज्या विविध परिवर्तनवादी क्रांती झाल्या त्यातून व्यक्तिवादी विचार बळावू लागला. बहुतांश मानव जातीने समाजाने समाजाचे श्रेष्ठदान वर्गाकडून शोषण झाले आहे या दबलेल्या समाजाने विविध हक्का करिता संघर्ष व कृषी केला.

४) विसाव्या शतकातील ठळक घटना- उदारमतवादी विचार अधिक विस्तारल्याने समाजवादी विचार मागे पडला. सर्वत्र लोकशाही तसेच राष्ट्र- राज्य व्यवस्था आकारास येऊ लागल्या. यातूनच आधुनिकीकरणाची विचारधारा बळावली. विशेष म्हणजे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदारमतवाद खाजगीकरण व जागतिकीकरण या विचाराने जग प्रभावित झाले. परिणामी रशियाचे (१९९१) चे विघटन ही महत्त्वपूर्ण घटना घडली. परंतु जर्मनीचे एकीकरण (१९८९) या सकारात्मकतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**आधुनिकता म्हणजे काय?**

तज्ञांच्या मतानुसार कोणत्या विशिष्ट काळाला आधुनिक काळ म्हणायचे किंवा कोणत्या विशिष्ट काळाला पारंपरिक कालखंड मानायचे याबद्दल एकमत नाही. तरीसुद्धा भारतीय संस्कृतीतील जी चार युगे सांगितली जातात. त्याचाही निश्चित कालखंड नाही. तसेच युरोपातील सुधारणावादी युगाचा प्रारंभ याबद्दलही निश्चित असे वर्ष मानता येत नाही. तरीसुद्धा यापूर्वीचा कालखंड हा आधुनिकतेच्या विपरीत व सध्याचा कालखंड आधुनिकतेच्या संकल्पनेशी मिळताजुळता अशा पद्धतीची लवचिकता आधुनिक ते बाबत असते काही विचारवंतांनी आधुनिकतेची व्याख्या केली आहे .त्याचा अभ्यास केल्यानंतर आधुनिकतेचा अर्थ समजण्यास मदत होते.

१) आय. आर. सीनाय - यांच्या मते,"आधुनिकीकरण म्हणजे परंपरा वादाच्या स्थानावर नवीन व्यवस्था आणि समाजाचा विकास करणारी प्रक्रिया होय".

२) रॉबर्ट ढाल या विचारवंतांच्या मते, आधुनिककरण ही संपूर्ण सामाजिक परिवर्तनाशी संबंधित आहे. यामध्ये आर्थिक,औद्योगिक, शैक्षणिक व राजकीय विकास या संबंधित बदल अपेक्षित आहेत."

आधुनिकीकरणाच्या संदर्भात वरती दिलेल्या विश्लेषण किंवा व्याख्यानानंतर साधारणतः असे समोर येते की या संदर्भात अभ्यासकांमध्ये एकमत आढळत नाही सर्व तज्ञांनी वेगळ्या पद्धतीने आधुनिकीकरणाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

**सारांश**

३) एस. पी. वर्मा हे विचारवंत म्हणतात की," आधुनिकीकरणाची व्याख्या करणे कठीण आहे. असहमती असलीतरी विद्वानांनी आधुनिकीकरणावर सहमती दर्शविली आहे. थोडक्यात आधुनिक कारण म्हणजे समाजातील परीवर्तनाची संकल्पना होय. परंतु प्रत्येक बदलाला आधुनिकीकरण म्हणता येत नाही. कारण काही बदल असेही असू शकतात की, जे समाजाला मागे टाकतात/ ढकलतात. आधुनिकता ही शेवटी समाज परिवर्तनाची प्रक्रिया आहे. त्यामधून समाजाला प्रगतीकडे घेऊन जाणे अपेक्षित असते.

## ४.४ आधुनिकीकरणाचे स्वरूप

१) विवेकवाद-- व्यक्ती जीवना प्रति तर्कशील दृष्टिकोनाची निर्मिती करतात. विचारात व संबंधात कोणत्याही धार्मिक ग्रंथाला, रूढी परंपरेला आधार नसतो. तर विवेकशीलता हा

प्रमुख आधार असतो. विवेकशील व  वैज्ञानिक दृष्टीकोनातुन विचार व निर्णय घेतले जातात. लोकांमध्ये धर्मनिरपेक्ष ते प्रति भावना वाढीस लागत आहे.

२) राज्याच्या भूमिकांचा विस्तार--भांडवलशाहीच्या माध्यमातून तयार झालेल्या प्रश्नानुसार कल्याणकारी राज्याचा सिद्धांत स्वीकारणे गरजेचे बनले. परिणामी जनतेच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या निमित्ताने राज्याला विविध कार्य स्वतः करणे क्रमप्राप्त ठरले . त्यातूनच राज्यांच्या भूमिका विस्तारल्या.

३) नवसमाज अविष्कार - जुन्या चालीरीती परंपरा यावर आधारलेला समाज कालांतराने परिवर्तनाची आस धरू लागला. समाजाचा आधार हा विविध प्रकारच्या परंपरा असतात त्या अनुषंगाने जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न होत असतो. आधुनिकीकरणाच्या संदर्भात औद्योगिक विकास शहरीकरण याच बरोबर समाज व्यवस्था जीवन जगण्याच्या पद्धती बदलत गेल्या. व्यक्ती व्यक्ती मधील भेदभाव या न व समाजामध्ये कमी होताना दिसतो.

४) विविध सिद्धांत यांची सरमिसळ - आधुनिकीकरणाला कोणताही एक आधार नसतो. यामध्ये अनेक संकल्पना, सिद्धांत यांचा संचार असतो. साधारणता यामध्ये शहरीकरण, औद्योगीकरण, शिक्षण संक्रमण संचार साधनांची गतिशीलता, बदलती अर्थव्यवस्था, उद्योग क्षेत्राचा विकास याबरोबरच धर्मनिरपेक्षता या संकल्पनाही आधुनिकीकरणाच्या आधार बनलेल्या दिसतात.

५) वसाहती ऐवजी राष्ट्र -  राज्याचा विस्तार- प्रसिद्ध विचारवंत एडवर्ड सील्स च्या विचारानुसार "समकालीन राष्ट्रांची पाश्चात्त्य पासून मुक्तीची इच्छा म्हणजेच आधुनिकीकरण होय."

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अनेक वसाहती येतील स्वातंत्र्य आंदोलने निर्णायक टप्प्यावर ती होती या राष्ट्रातील नागरिकांच्या आंदोलनाच्या तीव्रतेनुसार त्यांना यश मिळाले वसाहतींचे राष्ट्र राज्यात रूपांतर झाले.

६) नवोदित देशातील परिवर्तनवाद - नवस्वतंत्र झालेल्या देशातील नागरिकांमध्ये उत्साहाचे चैतन्याचे वातावरण होते. वर्षानुवर्ष गुलामगिरी व पारतंत्र्याच्या कालखंडात अनेक बाबींची झालेली पीछेहाट यातून अनेक परिवर्तनवादी विचार, संकल्पनांच्या आधारे आधुनिक जीवनशैली,आधुनिक संस्कृती,पारंपारिक ऐवजी विज्ञानवाद तसेच लोकशाही घटनावाद या माध्यमातून परिवर्तन घडताना दिसते.

**आधुनिकीकरणाचे विभिन्न घटक :-**

१) राजकीय घटक - पूर्वी किंवा मध्ययुगीन काळात विविध राज्यांमध्ये राजा व राजेशाही असाच प्रकार सर्वत्र आढळत होता. राजाच्या आज्ञांचे पालन हे जनतेला करावेच लागत असे. या व्यवस्थेमध्ये जनतेला राज्याच्या राज्यकारभारात सहभागी होण्याची संधी मिळत नसे . परंतु आधुनिक राजकीय प्रवाहामध्ये म्हणजेच लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनतेच्या सहभागाशिवाय राजकीय व्यवस्था कार्यान्वित होऊ शकत नाही . थोडक्यात आधुनिकतेची ही राजकीय बाजू परिवर्तनाची व प्रशासनातील सहभाग वाढवणारी आहे.

२) आर्थिक घटक - वित्त हा विषय मानवाच्या जीवनाची इतर कोणत्याही घटकापेक्षा अधिक जवळून संबंधित आहे. आर्थिक विकास यालाच आधुनिकीकरण असेही मानले गेले आहे. आर्थिक क्षेत्राच्या आधुनिकीकरणाला मध्ययुगीन काळापासून सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीची नाते जोडले गेले आहे. उत्पादनाच्या साधनांमध्ये बदल होत गेला. मानवी श्रमाच्या ठिकाणी यांत्रिक उपयोग वाढला. आर्थिक विकासाच्या क्षेत्रात विशेष करून औद्योगीकरण आणि सेवा व्यवसायात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. थोडक्यात सार्वत्रिक आर्थिक विकास हेच आधुनिकीकरणाचे मुख्य उद्देश आहे.

३) सामाजिक घटक- ग्रीक राजकीय विचारवंत ॲरिस्टोटल मते,"मनुष्य हा राजकीय प्राण्यांबरोबरच सामाजिक प्राणी आहे." माणसाचा विकास हा समाजा मध्येच होऊ शकतो. समाजातील वेगवेगळ्या विषयांचा विकास झाल्याशिवाय आधुनिकीकरण ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. यामध्ये आरोग्य, शिक्षण, धर्म, संस्कृती,भाषा वगैरे विभिन्न बाजू सामाजिक घटकात समाविष्ट आहेत. आधुनिकीकरणामुळे व्यक्तीचे वर्तन व मनोवृत्ती मध्ये बदल अपेक्षित आहे. याचा अर्थ सामाजिक मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून विकसित समाज आधुनिकीकरणाला सामोरे जाऊ शकतो. जोपर्यंत समाजातील सामाजिक भेद व सामाजिक विषमता पूर्ण नष्ट होऊ शकत नाही तोपर्यंत परिवर्तनात द्वारे आधुनिकीकरण संभव नाही. थोडक्यात समाजाचा बौद्धिक स्तर उंचावणे म्हणजेच आधुनिकीकरणाची सामाजिक बाजू होय.

वरील सर्व घटक व उपघटकयांचा अध्ययन केल्यानंतर असे दिसते की, आधुनिकीकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मानवाला स्थिरता अभिप्रेत नाही. बदलत्या काळानुसार बदल हा अपेक्षित असतो. त्याप्रमाणे विविध अंगांनी समाजामध्ये आधुनिकतेची संकल्पना विकसित होत असते. या प्रक्रियेमध्ये प्रत्येक व्यक्ती सहभागी होणे अपेक्षित आहे. यालाच आपण व्यक्ती किंवा समाज हा समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या माध्यमातून आधुनिकीकरणाच्या वाटचालीच्या दिशेने आहे असे मानले जाते.

**राजकीय उत्तर- आधुनिकता (The Post Modernism)**

**पार्श्वभूमी:-**

राज्यशास्त्र मध्ये आधुनिकता ही संकल्पना जशी महत्त्वाची म्हणून अभ्यासली जाते. तसेच उत्तर आधुनिकता या संकल्पनेचा व्यापक अभ्यास होत आहे. देशाच्या किंवा वैश्विक स्तरावर वेगवेगळ्या क्षेत्राच्या नूतनीकरण, आधुनिकीकरण किंवा त्याचे वैज्ञानिकरण ही प्रक्रिया अलीकडच्या काळात निरंतर चालू आहे. यातूनच राज्यशास्त्र मध्ये आधुनिकते नंतर उत्तर आधुनिकता या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या विषयांकडे पाहिले जाते व त्यामध्ये कालसुसंगत अशा पद्धतीच्या सुधारणा सुचविल्या जात आहेत. उदाहरणार्थ राज्यशास्त्राशी संलग्न असलेली विद्याशाखा म्हणजे लोकप्रशासन. यामध्ये ई शासन, सुशासन तसेच जनतेच्या सहभागातून उद्दिष्टपूर्ती असे बदलत्या काळानुसार नवीन संकल्पना या विषयांमध्ये येत आहेत. ही उत्तर आधुनिकतेची तत्त्वे म्हणता येईल. सध्याचे युग हे परिवर्तनवादी आहे. सर्व घटकांमध्ये परिवर्तनाची प्रक्रिया सुरू आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक याबरोबरच राजकीय प्रक्रियांमध्ये ही परिवर्तन हे अपेक्षितच आहे. युरोप अमेरिकेने स्वीकारलेला उत्तर आधुनिकतेचा प्रवेश अलीकडच्या काळातील आहे. तसे आपल्याकडे उत्तर आधुनिकतेला काल पर्यंत उपभोक्तावादी संस्कृतीचे लेबल लागल्याचे दिसते. मागच्या

भागामध्ये आपण आधुनिकतेच्या संकल्पनेची चर्चा केली. यामध्ये आपण उत्तर आधुनिकते बाबत चर्चा करत आहोत.



**उत्तर आधुनिकतेची संकल्पना:**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोप व अमेरिकेत उत्तर आधुनिकतेने प्रवेश केला. सर्वप्रथम अर्नोल्ड टोयन्बा यांनी या संकल्पनेचा उल्लेख केलेला दिसतो. त्यांचा संदर्भ ब्रिटनच्या आधुनिकीकरणशी होता. त्यानंतर १९७९ मध्ये जे. एफ. ल्योतार यांनी आपल्या " दि पोस्टमॉडर्न कंडिशन " या ग्रंथात प्रथमतः उत्तर आधुनिकता एक जातीय (Generic) संकल्पना आहे. अशा पद्धतीची मांडणी केली. ही मांडणी अतिउत्साहाच्या भरात (तत्कालीन वस्तविक कितीचा आधार नसल्याने) केल्याचे दिसले तरी उत्तर आधुनिकता या विषयाला प्रारंभ झाला हे नाकारता येत नाही. कारण ती वास्तवावर आधारित दिसत नाही. टेरी ईगल्टंन सारख्या जागतिक पातळीवरील विद्वानांनी आधुनिक विचारांची एक शैली की, जी सत्यशोधक, तर्क, परिचय आणि वस्तुनिष्ठतेच्या शास्त्रीय कल्पनेवर आधारलेली आहे असे म्हटले आहे. वेगवेगळ्या देशातील साहित्य, कला व आंतरराष्ट्रीय संबंध यासारख्या अभ्यासक क्षेत्रात उत्तर आधुनिकतावाद अत्यंत प्रभावशाली ठरला आहे. परंतु राज्यशास्त्रात त्याचा फारसा परिणाम दिसत नाही. काही लेखकांनी उत्तर आधुनिकता अयोग्य म्हणून नाकारले. त्यातून नव समस्या निर्माण होण्याचा धोका आहे अशी मांडणी केली. तटस्थ संशोधन राजकीय सिद्धांत आणि त्यावर आधारित मूल्य यांचा ग्रहितकांशी संबंध जोडून उत्तर आधुनिकतावादयांनी राज्यशास्त्राच्या गंभीर विश्लेषणास मोठ्या प्रमाणात सहाय्य केल्याचे दिसते. उत्तर आधुनिकतावाद समीक्षा तून निष्कर्षाकडे जाण्याचा मार्ग दाखविला जात आहे. कारण सर्व सिद्धांत आणि संशोधन हे व्यक्तिनिष्ठ व वास्तविक मापदंडावर आधारित असतात व सर्व सिद्धांत व संशोधन जगाच्या दृष्टिकोनातून तटस्थ असतात.

उत्तर आधुनिकतेचा संक्षिप्त अर्थ: आपण आधुनिकतेची व्याख्या अभ्यासली. ती जशी परिपूर्ण नाही तसे उत्तर आधुनिकतेच्या संदर्भातही स्थिती आहे. तरीसुद्धा काही अभ्यासकांनी उत्तर आधुनिक तिचा अर्थ आपल्या परीने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रमुख विचारवंतांमध्ये जे.एफ. ल्योतार, फुको, धरिला, जेमेसन तसेच नॅन्सी फ्रेसर व लींडा निकॉल्सन या महिलाही अग्रेसर होत्या. या सर्व सभासदांनी आपापल्या परीने या संकल्पनेला अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे.

१) जे. ए. ल्योतार (फ्रेंच विचारवंत)- उत्तर आधुनिकतेची प्रथमता मांडणी या विचारवंतांनी केली. ही संकल्पना विकसित करण्यामध्ये त्यांचे योगदान आहे. १९६० च्या प्रारंभीच प्रगत समाज हा आधुनिकतेच्या मार्गावर जाऊ लागला. तत्त्वज्ञानस त्याने केला. त्याच्या मते आधुनिक इतिहासाची संकल्प महान सुद्धा त्यांना विरोध करणारी आहे आपण संपूर्ण त्याच्याविरुद्ध विशिष्टता त्याच्या बाजूने आपण सक्रिय असलेले पाहीजे. विश्वामध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आहे अनेक प्रकारच्या संस्कृती आहेत भाषा संगीत समाजव्यवस्था व्यवस्था व्यवस्था आता यामध्ये तफावत आहे तेव्हा त्यांना आपण आधुनिकता किंवा उत्तर आधुनिकतेच्या माध्यमातून एकत्वाचा सूत्रात बांधण्याचा प्रयत्न करून नये थोडक्यात तो विविधतेचा समर्थक आहे.

लोक इच्छा व जणसहभाग या माध्यमातून लोकशाही शासन प्रकारात जनतेचा सहभाग वाढत आहे. राजकीय क्षेत्रात आधुनिकीकरणाचा अर्थ राजकीय बदलांशी आहे. पूर्वी राजेशाही हुकूमशाही यातून प्रवास करत आपण लोकसहभागातून लोकशाही विकसित करीत आहोत हे उत्तर आधुनिकतेचे लक्षण म्हणावे लागेल. राजकीय संरचना, प्रक्रिया व राजकीय वर्तन यामध्ये बदल होताना दिसतो आहे.

२) जिम मेक्गुगन अभ्यासक्रमावर आधारित शालेय पुस्तकाचे लेखन करणारा विचारवंत होता पुढे त्याने उत्तर आधुनिकतेला अर्थपूर्ण करण्यास भरपूर प्रयत्न केला त्याच्यामध्ये उत्तर आधुनिकता सांस्कृतिक आणि ज्ञान लालसी ची स्थिती आहे त्याचा परिणाम स्वरूप आधुनिक स्थानिक सामाजिक संस्था दबली जाते आणि जागतिक समाजाच्या स्थापनेकडे घेऊन जाणारी ही उत्तर आधुनिकतेची संकल्पना आहे.

**हा विचारवंत ही संकल्पना स्पष्ट करताना काही प्रमुख तत्त्वे मांडतो**

१) ही ज्ञान आणि संस्कृतीची एक स्थिती आहे.

२) या संकल्पनेमुळे पूर्वीच्या आधुनिक सामाजिक संस्था मजबूत होत नाही.

३) ही एक जागतिक समाजाची निर्मिती करू पाहणारी बाब आहे.

३) मायकल फुको हा विचारवंत स्वतःला उत्तर आधुनिकतेचा समर्थक मानत नाही. परंतु त्यांनी जी मांडणी केली ती उत्तर आधुनिक विचारांशी जुळणारी आहे. फुको यांच्या मते, आज आपल्या विचारांत फार मोठे परिवर्तन झालेले आहे. आपण जो विचार करत होतो ते आज सर्वच बदललैले आहे. फुकोची उत्तर आधुनिकतेची व्याख्या विकेंद्रित आहे. ती अंतर यावर विश्वास ठेवणारी आहे. हाच विचार आधुनिकतेच्या आहे.

वरील व्याख्यावरून साधारणता असे दिसते की,

**उत्तर आधुनिकतेचे साधारण स्वरूप**

१) उत्तरआधुनिकता ही समाजाला आधुनिकते पासून मुक्त करणारी आहे.

२) उत्तर आधुनिकता ही अखंड चालणारी चळवळ आहे.

३) उत्तर आधुनिकते मधून अनेक समकालीन संस्था कोसळू शकतात.

४) उत्तर आधुनिकतेरे द्वारे बहु संस्कृती समाज शक्य आहे.

**उत्तर आधुनिकतेची वैशिष्ट्ये (तत्त्वे) :**

उत्तर आधुनिकतावाद आजची व्याख्या अनेक पद्धतीने केली जाते. अजूनही सर्व संमत व्याख्या दिसत नाही. प्रत्येकांनी आपापल्या पद्धतीने उत्तर अआधुनिकतेची व्याख्या केलेली आहे. आधुनिक समाज अतिशय तीव्र गतीने बदलत आहे. समाजाला समजून घेण्याची स्थिती अतिशय नाजूक आहे. ही संकल्पना अतिशय लवचिक वाटते. जसे रबरांचा तंबू आहे. ज्याला जसे पाहिजे तसे ओढा व आत घूसून आपले स्थान बनवा. तशी स्थिती उत्तर आधुनिकतेची वाटते. खूप कमी काळात उत्तर आधुनिकतेने आधुनिकतेची जागा घेतली. कला, संगीत आणि

साहित्य यामध्ये अनेक नवीन प्रयोग झाले आहेत. नवीन तंत्रज्ञान आले. मॅक्स वेबर, कार्ल मार्क्स, परेरो अशा विचारवंतांच्या लिखाणाचा सामान्य व्यक्तींच्या विचार करण्याच्या पद्धतीवर एकदमच प्रभाव घडवून आला. संपूर्ण समाजाला उत्तर अधिक आधुनिकतेने प्रभावित केले. परंतु यातून काही नवीन प्रश्नही समोर आले. डेव्हिड हार्वे या विचारवंताने" कंडिशन ऑफ पोस्टमॉडर्निटी" या १९८४च्या ग्रंथात उत्तर आधुनिकतेची काही तत्त्वे मांडली आहेत.

**ती खालील प्रमाणे –**

१) उत्तर आधुनिकता ही विविधांगी आहे आधुनिकतेचा मुख्य धागा म्हणजे विविधतेला समानतेच्या तत्वाच्या सूत्रांमध्ये बांधण्याचा होता. परंतु उत्तर आधुनिक ते मध्ये असे काही दिसत नाही. ही एक अशी संस्कृती आहे की ज्या मध्ये बहु लता आहे बहुआयामी पणा जाणवतो. याचे उदाहरण साहित्य, कला व तत्त्वज्ञानामध्ये पाहायला मिळते. या संस्कृतीमध्ये स्थानिक आणि आंतरखंडीय असे निश्चित स्वरूप नसते तर बहुआयामी स्वरूप दिसते. उत्तर आधुनिकतेचे मोठे वैशिष्ट्य असेही असू शकते की मोठ्या वृत्तांत वाचा अस्वीकार करू शकते. त्यामुळे इतर सिद्धांतांना बाजूला सारून आपल्याच नव्हे तर दुसऱ्या देशातील लोकांवर किंवा संस्कृतीवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करते. सध्या उत्तर आधुनिकतावादाचे लक्ष उपेक्षित महिला, दलित वर्ग किंवा वंचित घटक हा समुदाय वाटतो.

२) सततची क्रिया आधुनिकतावादा पेक्षा उत्तर आधुनिकता ही प्रक्रिया सतत चालणारी आहे. उत्तर आधुनिकतावादाच्या - अभ्यासकांचे मत आहे की, ही विचारसरणी एक युग निर्माती आहे. म्हणजे आधुनिकते नंतर चा पुढचा टप्पा उत्तर आधुनिकीकरणाचा आहे. थोडक्यात भारतीय प्राचीन काळात सतयुगानंतर द्वापार युग व त्यानंतर कलियुग आले. तशाच पद्धतीने ही उत्तर आधुनिकतेची प्रक्रिया आहे. या क्रियेमध्ये समकालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय घडामोडी यांच्या मध्ये परिवर्तन होते. या विचारसरणीच्या विरोधकांचे असे मत आहे की ही एक भांडवलशाही विचारसरणी आहे.

३) प्रसार माध्यमांची उदारता जेव्हा उत्तर आधुनिकता असे मानते की, भाषेचा संबंध व्यक्तीशी नाही तर शब्दांचा शब्दांबरोबर - असतो तेव्हा याचा परिणाम विखंडित व्यक्ती पाहायला मिळतो. अशा पद्धतीने व्यक्ती एक प्रकारे शिजोफ्रेनिक (मन आणि कृती यामध्ये विसंगती) बनतो. जेव्हा संकेतांचा अर्थ संकेताच्या माध्यमातूनच घेतला जातो तेव्हा त्याचा अर्थ एकत्व होत नाही खंडीत होत असतो. उत्तर आधुनिकता अशा व्यक्तींना तयार करते की जे विभक्त असतात आणि ते कधीही मागे वळून पाहत नाहीत. म्हणजेच सोप्या भाषेमध्ये विखंडित समाज आणि व्यक्तित्व म्हणजेच उत्तर आधुनिकता होय. नव विकसित झालेल्या प्रसारमाध्यमांनी भाषेच्या माध्यमातून अधिक लोकांपर्यंत जाऊन उत्तर आधुनिकता विकसित करण्याचा प्रयत्न केला.

४) प्रसिद्धी व उपभोग संस्कृती- उत्तर आधुनिकतेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कमी वेळेत कमी कष्टात कमी खर्चात प्रसिद्धीझोतात येण्याचा प्रयत्न या कालखंडात होत आहे.

छोटी दुकाने किराणा स्टोअर सुपर मार्केट यांच्यापुढे विविध मॉल, मेला व फेस्टिवलचे आव्हान उभे राहिले आहे. हॉटेल रेस्टॉरंट खानावळ यांना फास्ट फुड, चायनीज, वडापाव गाडी, मॅकडोनाल्ड व होम डिलिव्हरी सेवा यांच्याशी स्पर्धा करावी लागत आहे. यासंदर्भात अमेरिका इंग्लंड सारख्या विकसित देशातील नव खाद्यसंस्कृती लोकसंस्कृती याचा प्रभाव वाढत आहे. त्यातून उत्तर आधुनिकते मध्ये इतर विषयांच्या बदलाबरोबरच खाद्य संस्कृती, वर्तन संस्कृती, उपभोग संस्कृती विकसित होत आहे व त्या माध्यमातून प्रसिद्धी मिळवण्याचा खटाटोप जाणवतो.

५) नवयुवकांच्या द्वारे उत्तर आधुनिकतेला चालना उत्तर आधुनिकते मध्ये आधुनिकतेची सखोल अभ्यास संस्कृती नाही कमी झाली आहे. एखादा सिद्धांत किंवा संकल्पनेच्या मुळाशी जाऊन चिकित्सा करण्याऐवजी त्याचा सध्याच्या व्यवहारिक जगात किंवा परीक्षे पुरता कसा उपयोग करायचा या दृष्टीने हा युवा वर्ग पहात आहे. सामाजिक संस्था व एन.जी.ओ. मध्ये त्यागातून योगदाना ऐवजी छोट्याशा कामातून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न दिसतो. राजकीय पक्षाचे युवा कार्यकर्ते सुद्धा पक्षनिष्ठा, विचारसरणीचा अभ्यास यातून कार्यक्रमांच्या आधारे जनतेप्रती असलेली कर्तव्य कृती यातून पक्ष विकास व नेतृत्व विकास ऐवजी निवडणूक हेच लक्ष ठेवून तात्पुरते सभा संमेलन, हंगामीसमाज बांधणी व प्रसिद्धी याकडे कल वाढला आहे. अशाप्रकारे या उत्तर आधुनिकते द्वारे युवावर्ग एका विशिष्ट क्षेत्रा ऐवजी अनेक क्षेत्रामध्ये कार्यरत राहून प्रत्येक ठिकाणाहून जास्तीचा फायदा कसा मिळेल हे पाहत आहे. (एकाच वेळी कॉलेजमध्ये प्रवेश, रियल इस्टेट चे काम, शेअर मार्केट, पार्ट टाइम जॉब शिवाय फ्रेंड सर्कल पार्ट्या) ही विचारसरणी या उत्तर आधुनिक प्रेम मध्ये बजावताना दिसते.

६) अपरिहार्य उत्तर आधुनिकता - कार्ल मार्क्स या महान विचारवंताच्या विचारावर श्रद्धा ठेवणारे जेमिसन असे म्हणतात की, भांडवलशाही विकासाचा एक मोठा टप्पा म्हणजे उत्तर आधुनिकतेची संस्कृती होय. भांडवल वाल्यांनी उत्तर आधुनिक संस्कृतीच्या साह्याने संपूर्ण जगभर आपले मायाजाळ पसरवले आहे. त्यातून आपला भरपूर स्वार्थ साधत आहेत. आधुनिकतेला बाजूला ठेवून उत्तर आधुनिकता विकसित केल्याशिवाय भांडवलदारांना जगातील वेगवेगळ्या देशांच्या बाजारपेठा उपलब्ध होणार नाहीत. याकरिता अशा प्रकारची संस्कृती, वर्तन व ऐहिकता जाणीवपूर्वक नव तरुण यांच्या मध्ये विकसित करून अधिकचा फायदा मिळवण्याचा प्रयत्न होत आहेत.

उत्तर आधुनिकतेचा राजकीय दृष्टिकोन:- राजकीय विचारवंत उत्तर आधुनिकतेच्या बाबतीत असे म्हणतात की जेव्हा हा सिद्धांत पूर्णपणे विकसित होईल तेव्हा हा वर्गाशी जोडलेले राजकारण समाप्त होईल या समाजातील वर्ग नष्ट होण्याचे कारण म्हणजे सध्या युरोप अमेरिकेत जे वर्गीय राजकारण पाहावयास मिळते त्याचे स्थान सामाजिक समूह घेतील जसे भारतातील वेगवेगळ्या जाती व उपजाती च्या संघटना व त्यातून निवडणूकपूर्व राजकारण आणि त्याचा निवडणुकांच्या मतदानावर होणारा परिणाम यापूर्वी वेगवेगळ्या जाती गटांचे वेगवेगळ्या व्यासपीठावरून होणारे शक्तिप्रदर्शन हे हळूहळू कालबाह्य होईल विकसित देशातील वर्ग राजकारणाशी त्यांचा संबंध असणार नाही. वर्गवर्गीय राजकारण, जात जाती राजकारण याचा या उत्तर आधुनिकीकरणात हळू हळू विलय होईल व या ऐवजी सामाजिक समूह, नागरी समाज व सोसायटी विकसित होतील. उदाहरणार्थ पर्यावरणवादी, स्वातंत्र्यवादी, दलित मागास महिला समूह, (गट ) याशिवाय तृतीयपंथीयांच्या समूहांची वृद्धी

होईल. त्यावेळी विकसित देशातील वर्गीय राजकारण व भारतातील संकुचित जातीय राजकारण कमजोर होईल. यालाच राज्यशास्त्राच्या भाषेमध्ये स्थानिक राजकारण सूक्ष्म, राजकारण किंवा उत्तर आधुनिकतेच्या प्रभावातून नागरी समाज (civil society) विकसित होईल असे मानले जाते.

**सारांश :**

राज्यशास्त्र व समाजशास्त्रज्ञांच्या मते उत्तर आधुनिकता ही विचारसरणी ही वरवरची किंवा तकलादू विचारसरणी आहे. काहीकाळ त्याचा प्रभाव राहू शकेल परंतु कालांतराने उत्तर आधुनिकतेच्या संस्कृतीमध्ये वाहात जाणाऱ्या समाजास याच्यातून होणारे नुकसान किंवा तोटे समजतील आणि पुन्हा समाज ज्ञान, विज्ञान व वास्तववादी भूमिकेतून चिकित्सक विचार करून समाज जीवन विकसित करण्याकडे वळेल.

उत्तर आधुनिकते मध्ये लोकसंस्कृती, लोककला, लोकसाहित्य, पॉप संगीत, उपभोक्तावाद अशा संस्कृतीचा प्रभाव दिसतो. जोमेसन आणि हार्वे अशा लेखकांनी उत्तर आधुनिकतेचा संबंध अर्थव्यवस्थेशी ही जोडला आहे. त्यांच्या मते ही विचारधारा म्हणजे मोकाट सुटलेल्या घोड्याप्रमाणे आहे. विकसित देशातच नव्हे तर भारतातही उत्तर आधुनिकतेचा प्रभाव असलेला तरुणवर्ग आपले शिक्षण, नोकरी, उदरनिर्वाह, आपल्यावर अवलंबून असणार्याचे संगोपन याकडे फारसा विचार न करता, आलेल्या पैशाचा सर्वार्थाने विचार न करता थोडी फार काटकसर ही न करता ऐहिक व उपभोक्ता संस्कृतीच्या प्रभावाखाली वारेमाप पद्धतीचा खर्च केला जातो. व असे करण्यास भांडवलशाही प्रधान उत्तर आधुनिकतेची संस्कृती आशा नव युवकांना विविध जाहिरातींच्या किंवा प्रलोभनांच्या माध्यमातून आकर्षित करीत असते.

असे असले तरी निसर्गाच्या व मानवाच्या उत्क्रांतीच्या तत्वानुसार मानवी विचार व वर्तन याच्या बदलांचा इतिहास जमेस धरल्यास आधुनिकता, त्यानंतरची उत्तर आधुनिकता व त्यानंतर अजुन एखादी विचारधारा किंवा संस्कृती हे चक्र चालत राहू शकते. त्यामुळे या समोर आलेल्या स्थितीचा विचाराचा अभ्यास करून प्रत्येकाने त्याच्याशी समायोजन करायचे किंवा स्वतःच्या ज्ञान चिकित्सा वृत्तीतून विकसित झालेल्या स्वतंत्र वर्तनवाद स्वीकारायचा हे प्रत्येकाला ठरवावे लागेल.

❄❄❄❄❄❄❄